ओ. वा.
१६२२

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ओ. वा.
दा. क्र. १६२२

थोरांची लोकसेवा

BVBK-0401622
BVBK-0401622

BVBK-0401622

# थोरांची लोकसेवा

## ओळख

आपल्या या प्राचीनतम भारतांत अनंत विभूति होऊन गेल्या. विभूति म्हणजेच थोर लोक. या थोर लोकांनीं आपल्या थोर आचारविचारांनीं आपलें जीवन तर सफल केलेंच पण त्याशिवाय त्यांनीं आपल्या जीवनाचा आदर्श जनतेपुढें ठेवून लोकांना नाना प्रकारें मदत करून योग्य मार्गदर्शन केलें. एक प्रकारें ही त्यांची लोकसेवाच होय.

अशा थोरांपैकीं त्रेसष्ट विभूतींचें जीवनकार्य या तीन पुस्तकांत वर्णिलें आहे. प्रत्येक पुस्तकांत एकवीस विभूतींच्या कार्याची माहिती देऊन त्या त्या काळीं त्यांनीं जनतेला कसकसें साहाय्य केलें हें दाखविलें आहे. प्रत्येक कालखंडांतील विभूतींना त्या त्या कालखंडाला अनुरूप अशीं कार्यें करावीं लागलीं; कारण प्रत्येक कालखंडांतील परिस्थिति वेगवेगळी होती, जनतेच्या गरजा वेगळ्या होत्या, आणि विचारसरणीही वेगवेगळी होती.

श्रीरामाला रावणासारख्या बलाढ्य राक्षसाशीं युद्ध करून आपल्या पराक्रमानें त्याचा नाश करावा लागला. प्रजेला सुखकारक होईल अशा रीतीनें राज्यकारभार चालवावा लागला. श्रीकृष्णालाही कंसादि दुष्टांचा वध करून शिवाय कौरव-पांडवांच्या भाऊबंदकीच्या लढ्यांत भाग घ्यावा लागला. या वेळीं श्रीकृष्णानें भगवद्‌गीता गाइली. कोणत्याही प्रसंगीं कोणाही माणसाला यांतील उपदेश कर्तव्यपरायण केल्याविना राहणार नाहीं. गौतम बुद्ध, महावीर जैन, आद्य श्रीशंकराचार्य आणि बसवेश्वर यांना लोकांत आलेली धर्मग्लानी पाहून अति दुःख झालें. त्यांनीं अतुल स्वार्थत्याग करून जनतेला खऱ्या धर्माकडे वळविण्याचें महत्कार्य केलें.

शिवछत्रपतींना महाराष्ट्रांतील पारतंत्र्याची चीड आली. लोकांत स्वातंत्र्याची चाड निर्माण करून जनतेंत नवीन चैतन्य संचारवावें लागलें. यासाठीं त्यांनीं अपरंपार हाल सोसले, धोका पत्करला पण महाराष्ट्र स्वतंत्र केला. बाजीराव व थोरले माधवराव यांनीं शत्रूशीं तोंड देऊन महाराष्ट्राचा दरारा वाढविला. या कालखंडांत ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास यांनीं खऱ्या धर्माकडे जनतेचें मन आकर्षित करून समाजांत एकी वाढविली. त्यामुळें जनमनाचें धैर्य अभंग राहिलें. यवनांच्या जुलमाला आणि अत्याचारांना त्यांनीं न भितां तोंड दिलें. गुरु नानक, महात्मा कबीर या महात्म्यांनीं आणि सम्राट् अकबरानें हिंदु-मुसलमानांत एकी करण्यासाठीं अनंत प्रयत्न केले. कित्येक स्त्रियांनींही आपल्या कर्तृत्वानें थोर विभूतींत मानाचें स्थान पटकाविलें !

भारतानें स्वातंत्र्य गमावल्यानंतरच्या काळांतील विभूतींपैकीं एकवीस थोरांचीं आदरणीय तेजस्वी चरित्रें तिसऱ्या पुस्तकांत सांगितलीं आहेत. स्वातंत्र्याची चाड उत्पन्न करून, गमावलेलें

स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं जनतेला तयार करणें ही या काळांतील थोरांची विशेष कामगिरी. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, देशबंधु दास आणि लाला लजपतराय वगैरे पुढाऱ्यांनीं केवढे कष्ट सोसले आणि जिवाचें रान केलें ! कशासाठीं ? जनतेच्या हितासाठीं. या काळांतच कित्येक थोरांनीं आपलें जीवन धार्मिक आणि सामाजिक सुधारणा करण्याकडे लाविलें. राममोहन रॉय यांनीं धार्मिक सुधारणांकडे विशेष लक्ष दिलें, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीं अस्पृश्य मानलेल्या समाजाचा उद्धार करण्यासाठीं जंगजंग पछाडले. या काळांतही चांगला राजा आपल्या प्रजेची कशी उन्नति करूं शकतो हें सयाजीमहाराज गायकवाडांनीं दाखविलें, तर आपल्या भव्य आणि दिव्य प्रतिभेनें रवीन्द्रनाथांनीं रसिकांना डोलविलें, आणि आपलें आणि भारताचें नांव त्रिखंडांत उज्ज्वल आणि अमर केलें.

सरदार पटेल आणि सुभाष बोस यांचा पोलादी कणखरपणा आणि मनोधैर्य, यांचें कोणते शब्द वर्णन करूं शकतील ? श्री. गोखले यांचें नांव त्यांनीं स्थापित केलेल्या भारत सेवक समाजानें निश्चित अमर केलें आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजतागायत आपल्या देशाचें पंतप्रधानपद स्वीकारून जनतेची आर्थिक, सामाजिक उन्नति घडवून आणण्याचें प्रचंड कार्य कोणीं चालविलें आहे ? पंडित जवाहरलालजींचें नांव पृथ्वीवरील झाडून साऱ्या देशांत आदरास पात्र झालें आहे.

भगवान् श्रीकृष्णानें अमर गीता गाइली. तीच ज्ञानेशांनीं मराठी जनतेसाठीं मराठींत खुलविली. लोकमान्यांनीं आजच्या जनतेसाठीं गीतारहस्य लिहिलें.

या साऱ्या विभूतींनीं केलेले अनंत प्रयत्न, त्यांचें

उज्ज्वल, निष्पाप चारित्र्य, अथांग मनोधैर्य यांमुळें आज स्वतंत्र भारताला जगांत मोठ्या सन्मानानें मिरवितां येतें.

या साऱ्या थोरांनीं केलेली ही लोकसेवा किती उच्च दर्जाची आहे बरें ! या सर्वांना सादर वंदन करून ही ओळख पुरी करतों.

ता. १४–३–६४ **ग. म. वैद्य**

# अनुक्रम

| | | |
|---|---|---|
| | ओळख | ३ |
| १ | आर्यवीर राम | ९ |
| २ | भगवान् श्रीकृष्ण | १६ |
| ३ | धनुर्धर अर्जुन | २३ |
| ४ | राजा बिंबिसार | २९ |
| ५ | गौतम बुद्ध | ३५ |
| ६ | महावीर वर्धमान | ४२ |
| ७ | सम्राट् चंद्रगुप्त | ४७ |
| ८ | चक्रवर्ती अशोक | ५३ |
| ९ | महाराजा कनिष्क | ५९ |
| १० | शतकर्ता शालिवाहन | ६३ |
| ११ | विक्रमादित्य अथवा दुसरा चंद्रगुप्त | ६७ |
| १२ | कवि गुणाढ्य | ७२ |
| १३ | पराक्रमी स्कंदगुप्त | ८० |
| १४ | कविकुलगुरु कालिदास | ८६ |
| १५ | सम्राट् हर्षवर्धन | ९२ |
| १६ | राजा दाहीर | ९७ |
| १७ | बाप्पा रावळ | १०२ |
| १८ | आद्य शंकराचार्य | १०५ |
| १९ | राजा भोज | १११ |
| २० | राजा कुमारपाळ | ११६ |
| २१ | राणी दिद्दा | १२२ |

वा क्र ९६२२ — ३।५।६८
विषय आ. वा

# आर्य वीर राम

मिथिला नगरींत राजकन्या जानकी हिच्या स्वयंवराचा सोहळा सुरू होता. समारंभासाठीं खास उभारलेल्या सभामंडपांत उच्चासनावर राजे बसले होते. वेगवेगळ्या देशांचे प्रसिद्ध, पराक्रमी व वैभवशाली राजे ह्या समारंभाला आले होते. जनक राजाशीं नातें जोडावें असें प्रत्येकाला वाटत होते. समारंभाची सिद्धता होतांच राजांना उद्देशून जनक म्हणाला, " राजे हो, मी तुमचं स्वागत करतों. हें समोर शिवधनुष्य ठेवलं आहे. ह्याला दोरी लावून जो बाण मारून दाखवील त्याला राजकन्या माळ घालील. " जनकाचें हें बोलणें पुरें होतांच एकेक राजा पुढें होऊन तें धनुष्य उचलण्याचा प्रयत्न करूं लागला. कित्येकांना तर तें हललेंसुद्धां नाहीं. कित्येक अर्धवट उचलूं शकले. शेवटी लंकेचा बलाढ्य राजा रावण हा पुढें झाला. मोठ्या शिकस्तीनें त्यानें तें

धनुष्य कसेंबसें उभें केलें. त्याला तो दोरी चढविणार तोंच त्याचा तोल गेला; तर खालीं उताणा व छातीवर तें प्रचंड धनुष्य असा जमिनीवर आदळला !

तें धनुष्य दूर कोण करणार ? रावण तर धनुष्याच्या दडपणामुळें रक्तच ओकूं लागला होता ! जिकडे तिकडे हाहाःकार झाला. तोंच एक राजपुत्र पुढें झाला. जनकाला वंदन करून त्यानें तें धनुष्य उचललें. अगदीं सहज त्याला दोरी चढवून तो बाण सोडणार तोंच 'कडाड्' असा आवाज होऊन तें मोडलेंसुद्धां ! हें पाहून सर्व राजे स्तिमित झाले ! जनककन्या जानकी पुढें झाली व तिनें त्या राजपुत्राला माळ घातली ! हा राजपुत्र कोण होता बरें ?



तोंच ऋषिवर्य विश्वामित्र पुढें झाले व 'सूर्यकुलोत्पन्न दशरथपुत्र रामचंद्राचा जयजयकार' अशी त्यांनीं गर्जना केली. तो राजपुत्र अयोध्येचा राजा दशरथ ह्याचा मुलगा होता.

सूर्यवंशांत दिलीप, अज, रघु, दशरथ वगैरे अनेक पराक्रमी राजे झाले. राजा दशरथ ह्याला तीन स्त्रिया होत्या. कौसल्या, सुमित्रा व कैकेयी. बरेच वर्षे मूल झालें नाहीं म्हणून दशरथानें पुत्रकामेष्टि यज्ञ केला. त्यानंतर कौसल्येला राम, सुमित्रेला लक्ष्मण आणि कैकेयीला भरत व शत्रुघ्न असे चार मुलगे झाले. हे चारी मुलगे राजाचे आवडते होते. पण त्यांतल्या त्यांत रामावर त्याचें विशेष प्रेम होतें. ते चारी मुलगे गुण्यागोविंदानें राहात. तिन्ही भावांची रामावर भक्ति होती. रामही त्यांच्याशीं प्रेमानेंच वागे.

दशरथानें त्यांच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था ठेविली होती. क्षात्र-धर्माचें म्हणजे लढाईचें उत्तम शिक्षण त्यांना दिलें. एकदां विश्वामित्र ऋषि दशरथ राजाकडे गेले व त्याला म्हणाले, " आमच्या यज्ञांत राक्षस विघ्न करतात, ह्यासाठीं त्यांचा नाश करून यज्ञाचें रक्षण करण्यासाठीं राम-लक्ष्मणांना आश्रमांत पाठव. " विश्वामित्रांच्या अति आग्रहामुळें दशरथानें त्यांना पाठविलें. आपल्या पराक्रमानें अनेक दुष्ट राक्षसांना ठार मारून त्यांनीं विश्वामित्रादि ऋषींना खूष केले.

रामाच्या लग्नानंतर कांहीं वर्षांनीं दशरथ राजाला वाटलें कीं, रामाला ' युवराज ' म्हणून अभिषेक करून त्याला भावी काळाचा राजा बनवावें. त्याप्रमाणें सगळीकडे द्वाही फिरवून राजा समारंभाच्या तयारीला लागला. राजाची सर्वांत लहान राणी कैकेयी हिला तें आवडलें नाहीं. तिला पूर्वी एकदां राजानें दोन वर देऊं केले होते. ती दशरथाला म्हणाली, " मला ते दोन्ही वर आजच द्यावे, एका वरानें रामाला चौदा वर्षे वनवासाला पाठवा आणि दुसरा वर म्हणजे भरताला राज्यावर बसवा. "

कैकेयीची ही इच्छा रामाला समजतांच ' मातेची आज्ञा पाळणं हें

पुत्राचें कर्तव्य होय,' असें म्हणून तो वनवासाला निघाला. त्याच्या-बरोबर त्याची पत्नी सीता व बंधु लक्ष्मण हींही गेलीं.

राम-लक्ष्मण वनांत गेल्यावर त्यांच्या दुःखानें राजा दशरथ मरण पावला. भरत आजोळीं होता; तो परत आला. त्याचें रामावर फार प्रेम होतें. त्याला राज्यावर बसवावें असा कैकेयीचा बेत होता. पण भरताला तें कबूल नव्हतें. तो रामाला भेटावयास वनांत गेला. रामानें त्याची कशीबशी समजूत घातली. शेवटीं रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून भरतानें कारभार चालविला.

राम वनांत गेल्यावर ऋषींच्या आश्रमांत राहिला. ऋषींना राक्षस त्रास देत, त्यांपासून त्यानें त्यांचें रक्षण केलें. शेवटीं सर्वांचा आशीर्वाद घेऊन तो नाशिकजवळ पंचवटींत आश्रम बांधून राहिला.

एकदां राम शिकारीस गेला असतां, रावणानें साधूचें सोंग घेऊन सीतेला पळवून नेलें. त्या वेळीं लक्ष्मणही तेथें नव्हता. राम परत आश्रमांत आल्यावर सीता नाहीं हें पाहून त्याला फार दुःख झालें. मग तो व लक्ष्मण सीतेच्या शोधार्थ भटकत फिरले. वाटेंत हनुमान आणि वाली-सुग्रीव ह्या वानरवीरांची गांठ पडली. हनुमंताच्या मदतीनें रामानें सीतेचा शोध लावला. रावणानें तिला लंकेंत नेऊन ठेवलें आहे, अशी बातमी मारुतीनें सांगतांच राम-लक्ष्मण तिकडेच जावयास निघाले. त्यांचेबरोबर वानरसैन्यही निघालें. वानरसैन्याच्या मदतीनें समुद्रावर पूल बांधून राम-लक्ष्मणांनीं लंकेंत जाऊन रावणाशीं लढाई केली. एक दोन वेळां राम-लक्ष्मणांवरही संकट आलें होतें. शेवटीं खूप मोठी लढाई होऊन तींत रामानें रावणाला ठार मारलें आणि सीतेची सुटका केली.

त्यानंतर मोठ्या विजयानें ती सर्व मंडळी अयोध्येस आली. त्यांच्याबरोबर बरेंच वानरसैन्यही आलें. हनुमंत तर रामाचा कायमचा सेवक होऊन राहिला. राम अयोध्येंत येऊन मोठ्या थाटानें सिंहासनावर



बसला. गरिबांना तो मदत करी; दुष्टांना शासन करून त्याना त
चांगल्या मार्गास लावी; राज्यांत चोरांचा त्रास नव्हता; भूमि समृद्ध
असून धान्य पुष्कळ पिके; लोक आपल्या कर्तव्यांत मग्न असून जो त
दुसऱ्याला मदत करी; असत्य कोणी बोलत नसे; प्रजा अतिशय
आनंदांत होती. तो इतका लोकप्रिय झाला कीं 'रामराज्य' म्हणजे
उत्तम राज्य असा अर्थ त्याच्या वेळेपासूनच प्रचारांत आला.

श्रीरामाच्या गुप्त हेरांनीं त्याला एकदां सांगितलें कीं, सीता राव
णाच्या घरीं कैदेंत होती, तेव्हां ती शुद्ध राहिली कीं नाहीं अश
कित्येक लोक शंका घेतात व आपली निंदा करतात. वास्तविक सीतेल
परत आणतांना रामानें सर्वांदेखत अग्निदिव्य करविलें होतें. तरी प



लोक शंका घेतात ह्याचें रामाला वाईट वाटलें. त्यानें लक्ष्मणास सांगून सीतेला रानांत सोडून दिलें. ह्या वेळीं सीता गरोदर होती. लक्ष्मण तिला वनांत सोडून गेल्यावर ती मोठ्यानें दुःख करूं लागली. त्या बाजूनें वाल्मीकि ऋषि जात होते. त्यांना तिची दया आली आणि ते तिला आश्वासन देऊन म्हणाले, ' चल, मी तुझें कन्येप्रमाणें पालन करीन. '

तिला दोन जुळे मुलगे झाले. मोठ्या मुलाचें कुश आणि धाकट्याचें लव अशीं नावें ठेवलीं. ते मुलगे ऋषींच्या आश्रमांत वाढूं लागले. ते फार सुंदर व तेजस्वी होते. वाल्मीकि ऋषींनीं आश्रमांतील इतर विद्यार्थ्यांप्रमाणें त्यांना शिक्षण दिलेंच. पण शिवाय त्यांना क्षात्रधर्माचें शिक्षण देण्याचीही व्यवस्था केली.

इकडे रामानें अश्वमेध यज्ञ सुरू केला. यज्ञाचा अश्व पृथ्वीप्रदक्षिणेस निघाला. बरोबर मोठें सैन्य होतें. ठिकठिकाणचे राजेमहाराजे पुढें येऊन त्यांनीं रामाचें सार्वभौमत्व पत्करिलें. फिरतां फिरतां तो घोडा वाल्मीकि ऋषींच्या आश्रमांत आला. तो त्या बालवीरांनीं पकडला. नंतर त्यांचें व रामाच्या सैन्यांतील वीरांचें युद्ध झालें. शेवटीं वाल्मीकींनीं रामाची व त्याच्या मुलांची ओळख करून दिली. मुलांनीं बापाला वंदन केलें. सीता राणी शुद्ध आहे असें वाल्मीकींनीं सांगतांच रामानें तिचा स्वीकार करण्याचें कबूल केलें. पण ह्याच वेळीं सीतेनें पृथ्वीची प्रार्थना केली, कीं ' माते, मला पोटांत घे. ' त्याप्रमाणें पृथ्वी दुभंग होऊन सीता गडप झाली.

नंतर, लव-कुशांच्या हातीं राज्य सोंपवून राम स्वर्गलोकीं गेला. श्रीरामाचें चरित्र इतकें पवित्र, सुंदर आणि श्रेष्ठ होतें कीं, कालांतरानें लोक रामाला देवच मानूं लागले.

* * *

※

२

※

# भगवान् श्रीकृष्ण

सुमारें पांच हजार वर्षें झालीं. त्या वेळीं मथुरेला उग्रसेन नांवाचा यादव राजा राज्य करीत होता. त्याचा भाऊ देवक याच्या मुलीचें नांव देवकी असें होतें. उग्रसेनाचा मुलगा कंस हा राजपुत्र होता. वसुदेव नांवाचा एक गोपांचा नायक होता. देवकानें आपली मुलगी देवकी ही वसुदेवाला देऊन त्यांचा विवाहसमारंभ मोठ्या थाटामाटानें साजरा केला. राजपुत्र कंस याचें आपल्या चुलत बहिणीवर विशेष प्रेम होतें. लग्नसमारंभ साजरा करतांना त्यानें खूपच श्रम केले होते. शिवाय राजाकडून पुष्कळ देणग्याही देवविल्या !

लग्नसमारंभ पूर्ण झाल्यावर वधूवरांना त्यांच्या घरीं पोंचविण्याची कामगिरी त्यानें आपणांवरच घेतली. स्वतःच्या रथांत त्यांना बसवून तो स्वतःच त्यांचा सारथी बनला आणि मोठ्या प्रेमानें गप्पा

मारीत तो आपला रथ हांकीत होता. रथ शहराबाहेर वसुदेवाच्या वाड्याकडे निघाला तोंच आकाशवाणी कानीं पडली, " रे कंसा, ज्या या बहिणीला तूं मोठ्या प्रेमानें सासरी पोंचविण्यास निघाला आहेस तिचाच आठवा मुलगा तुझा वध करील ! "

ही आकाशवाणी कानीं पडतांच कंस रागानें खवळून गेला.



आपली तलवार चटकन् म्यानांतून काढून तो देवकीलाच ठार मारण्यास उद्युक्त झाला. पण वसुदेव म्हणाला, " तूं व्यर्थ स्त्रीहत्या क करतोस ? फार झालें तर हिचें आठवें मूल होतांच त्याला तू ठार मार ! "

शेवटीं नाहीं होय करतां करतां देवकीला होणारी सारीं मुलें त्याला द्यावयाचीं ही अट पतकरून वसुदेवानें आपली दोघांची सुटका करून घेतली. देवकीला झालेलीं पहिलीं सात मुलें कंसानें ठार मारलीं आणि आठव्यानें देवकी गरोदर आहे हें कळतांच त्या दोघांना कंसानें कारावासांत पक्का बंदोबस्त करून ठेवलें.

श्रावण महिन्याच्या वद्य अष्टमीच्या रात्रीं देवकी प्रसूत होऊन तिला सुंदरसा मुलगा झाला. त्याच वेळीं कोणीं म्हटलें, " या मुलाला आतांच्या आतां गोकुळांत नंदाकडे घेऊन जा. " त्या मुलाचें मरण चुकवावें असें त्यांना वाटतच होतें. वसुदेवानें तेवढ्या रात्रीं त्या मुलाला टोपलींत घालून गोकुळांत नेलें. सर्व तुरुंगावरील पहारेकरी या वेळीं गाढ

झोंपीं गेले होते. तुरुंगाचीं दारें आपोआप उघडलीं आणि वसुदेव बाहेर पडतांच लागलींही. मध्यरात्रींची वेळ. जोरजोरानें पाऊस पडत होता. केवळ वीजच त्याला रस्ता दाखवीत होती अन् पूर आलेल्या यमुनेनें श्रीकृष्णाच्या पायीं नम्र होऊन त्याला पलीकडे जावयास उतार दिला. नंदाच्या घरींही सर्व मंडळी गाढ झोंपेंत होती. नंद-पत्नी यशोदा याच वेळीं प्रसूत होऊन तिला कन्या झाली होती. ती संभ्रमातच होती. तिच्या पुढें मुलाला ठेवून मुलीला उचलून वसुदेव निघाला. तो आपल्या कैदखान्यांत पोंचल्यावर सर्वांना जाग आली. मुलगी रडूं लागली. देवकी प्रसूत झाली हे कंसाला कळलें. तो धांवत तेथे आला. देवकीपासून झालेलें बालक त्यानें हिसकावूनच घेतलें. पाहतो तों कन्या ! तरीही कांहीं विचार न करतां त्यानें तिला शिळेवर हापटली. तात्काळ विद्युल्लतेच्या रूपानें ती आकाशांत चमकली आणि आकाशांतून वाणी उठली, " कंसा, तुझा वध करणारा आज जन्माला आला आहे आणि तो सुखरूपही आहे ! "

यापुढें श्रीकृष्णाचें पालन नंदयशोदा यांनीं केलें. त्याच्या अनंत बाललीलांनीं त्यांना आनंदी केलें. तें भाग्य त्यांना लाभलें. बाळ अति सुंदर आणि अचपळ होता. नंदयशोदाच नव्हे तर गोकुळांतील सारीं माणसेंच त्याजवर प्रसन्न असत. त्याला उचलून घेण्यासाठीं गोपींमध्यें मोठी अहमहमिकाच चाले.

साऱ्याच त्याला उचलून घेत आणि त्याच्या गोड चुंबनानें परमानंद उपभोगीत ! मोठ्या भाग्यवानच होत्या त्या गोपी !

तो लहान असतांनाच पूतनाराक्षसी सुंदर गोपीचें रूप घेऊन आली. स्तनांना तिनें विष लाविलें होतें. श्रीकृष्णाला दूध पाजण्यासाठीं तिनें उचललें आणि तोही मोठ्या उत्साहानें तिच्याकडे हंसत हंसतच

गेला. तिनें त्याच्या तोंडांत स्तन दिला मात्र पूतना जमिनीवर पडली आणि निःप्राण झाली !

थोडा मोठा झाल्यावर तो इतर गवळ्यांच्या मुलांप्रमाणें गुरें चारण्यासाठीं वनांत जाऊं लागला. तेथें इतर गुराखी मुलांत तो नाना प्रकारचे खेळ खेळे. वाटेंत कुणा गवळणीचें लोणी चोरून खाई तर कुणा गवळणीचें ताक-दही हंडा फोडून जमिनीवर सांडून देई. या वेळीं सारीं मुलें त्याची साथ करीत. त्याला मुरली फार गोड वाजवितां येई. त्या मुरलीच्या आवाजानें गुराखी मुलेंच काय पण त्यांच्या गाईही कृष्णाभोंवतीं जमत. इतकीं गोड गाणीं तो गाई.

आपला शत्रु गोकुळांत वाढत आहे ही बातमी कशी तरी कंसाच्या कानीं गेली. श्रीकृष्णाचा नाश करावा म्हणून त्यानें तृणावर्त, बकासुर, अघासुर, धेनुक वगैरे अनेक राक्षस त्याजवर पाठविलें. विविध रूपें घेऊन ते गोकुळांत गेले आणि श्रीकृष्णाचा नाश करण्याचा त्यांनीं कसून प्रयत्न केला, पण त्यांत कोणालाही यश न येतां त्यांचाच श्रीकृष्णानें नाश केला !

या वेळीं यमुना प्रवाहांत कालिया नांवाचा भयंकर विषारी साप राहात असे ! त्याचें विष इतके जहाल होतें कीं, त्याचा फूत्कार अंगावर आला तरी प्राणी मरून जात. यमुनेच्या प्रवाहांतल्या एका डोहांत तो राहात असे. त्या डोहांतलें पाणी प्यावयास कोणी गेलें तर कालिया त्यांना मारून टाकी ! एकदां श्रीकृष्णाचे मित्र कांहीं गोपबालक चुकून त्या डोहावर गेले. पाणी पितां पितां ते बेहोष होऊन पडले. ही वार्ता श्रीकृष्णाला समजतांच तो धांवत त्या डोहावर गेला आणि त्यानें एकदम डोहांत उडी घेतली ! श्रीकृष्णाच्या जिवाला अपाय होणार या भीतीनें गोपगोपी घाबरून गेलीं ! नंद-यशोदा तर धांवत तेथें

येऊन रडूंच लागलीं. त्यांना कृष्ण कोठें दिसेना ! पण थोडयाच वेळांत कालिया वर आला. त्याच्या फण्यावर श्रीकृष्ण उभा असलेला त्यांना दिसतांच त्यांचीं हृदयें आनंदानें भरून आलीं. श्रीकृष्णानें कालियाला तो डोह सोडून जाण्याची आज्ञा केली. 'गरुडाच्या भीतीनें मी येथें दडून आहें. तेवढी भीति दूर करा' असें कालिया म्हणतांच श्रीकृष्ण म्हणाला, "तुझ्या फणेवर माझ्या पावलांच्या खुणा उठल्या आहेत, त्या गरुडाला दिसल्या कीं, तो तुला कांहीं त्रास देणार नाहीं." कालिया आपलीं बायकामुलें घेऊन त्या डोहांतून निघून गेला. अशा रीतीनें गोकुळाचा त्रास कायमचा नष्ट झाला !

श्रीकृष्णाचा नाश करण्यास सोपें जावें म्हणून राजसत्ता आपल्या हातीं असावी असा विचार करून कंसानें आपला पिता राजा उग्रसेन याला कैदेंत ठेवलें आणि आपणच राजा झाला. त्याचा सासरा जरासंध याचें या कामीं त्याला साहाय्य होतें. जरासंध हा महापराक्रमी राक्षसराज असून त्याजवळ खूप मोठी राक्षस-सेना नेहमीं जय्यत तयार असे.

यानंतर कंसानें श्रीकृष्णाला ठार मारण्यासाठीं नव्यानव्या युक्त्या योजण्यास सुरुवात केली ! कंसानें असें ऐकलें होतें कीं, श्रीकृष्ण आणि बलराम यांनीं व्यायमानें आपलें शरीर कमावलें असून कुस्तीचे डावपेंचही ते शिकले आहेत. त्यानें मथुरेला कुस्त्यांच्या स्पर्धा ठेवल्या. श्रीकृष्ण-बलरामांना आव्हान देऊन निमंत्रण केलें. राजाच्या आश्रयाखालचे अनुभवी व सशक्त मल्ल तयार ठेवले आणि या स्पर्धांचे प्रसंगीं त्यानें तेच मल्ल श्रीकृष्ण-बलरामांजवळ कुस्त्या खेळण्यासाठीं रंगणांत पाठविले; पण श्रीकृष्ण-बलरामांनीं त्यांचा पूर्ण पराभव केला. कंस घाबरला आणि त्यानें श्रीकृष्णाला पकडा अशी आज्ञा दिली. पण श्रीकृष्णच कंसावर चालून गेला. त्याचे केस धरून त्यानें त्याला आसनाखालीं पाडलें. त्यामुळें तो घाबरून मृत झाला !

श्रीकृष्णानें राजा उग्रसेनाला बंधमुक्त करून त्यालाच पुन्हा मथुरेच्या सिंहासनावर बसविलें. त्यानें आपले वडील व माता यांना बंधमुक्त केलें. कंसाच्या वधामुळें त्याचा सासरा राजा जरासंध हा रागावला आणि त्यानें मथुरेवर स्वारी केली. श्रीकृष्णाला या वेळीं आपलें युद्धकलानैपुण्य त्याला दाखवितां आलें. त्यानें अनेक वेळां जरासंधाचा त्याच्या विशाल सेनेसह पराभव केला आणि त्यांना हांकून लाविलें. मथुरेला राहिल्यानें जरासंध आणि त्याचे मित्र राक्षस पुन्हा पुन्हा हल्ले करून प्रजेला विनाकारण हैराण करणार त्यापेक्षां आपण मथुरा सोडून जावें हें बरें असा विचार करून त्यानें समुद्रांत द्वारकानगरी निर्माण केली आणि तो तिकडे राहावयास निघून गेला !

श्रीकृष्ण आणि बलराम हे दोघे गुरु सांदीपनीकडे पूर्वी शिकावयास राहिले होते. त्या ठिकाणीं सुदामा नांवाचा एक गरीब ब्राह्मण कुमार त्यांच्याबरोबर गुरुगृहीं विद्या शिकत होता. श्रीकृष्ण-सुदाम यांची मोठी मैत्री जुळली. पुढें श्रीकृष्ण राजा झाल्यावर सुदामा त्याला भेटावयाला गेला. त्या वेळीं तो अत्यंत दारिद्र्यांत दिवस काढीत होता. श्रीकृष्णानें त्याचा मोठा सत्कार केला; त्याला पुष्कळ धन देऊन त्याचें दारिद्र्य त्यानें दूर केलें !

पांडव हे त्याचे नातेवाईकच होते. त्यांना त्यानें अनेक प्रकारें मदत केली. ते बारा वर्षें वनवासांत असतां त्यानें घोर नांवाच्या ऋषींकडे तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. प्रसंगविशेषीं तो त्यांच्या साह्यासाठीं धांवूनही गेला. वनवासांहून ते परत आल्यावर कौरव त्यांना त्यांचें राज्य परत देत ना. या प्रसंगीं त्यानें शिष्टाई करून दुर्योधनादि कौरवांनीं पाडवांना थोडें फार राज्य देऊन समेट करावा असा प्रयत्न केला. पण कौरवांच्या दुराग्रहानें तो निष्फळ ठरला. पुढें कौरव-पांडवांमध्यें महायुद्ध झालें. त्या वेळीं श्रीकृष्णानें अर्जुनाचें सारथ्य केलें. युद्धा-

रंभीं कौरव सैन्यावर नजर टाकतांच आपणांस भीष्म द्रोणादि आप्त गुरूंचा वध करावा लागणार या विचारानें अर्जुनानें हातपाय गाळले त्या वेळीं श्रीकृष्णानें त्याला तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगून पुन्हा युद्धाला तयार केलें. या वेळीं त्यानें केलेला उपदेश म्हणजेच भगवद्गीता होय. ‘प्रत्येकानें आपापलें कर्तव्यकर्म करावें. फलाशा धरूं नये’ हा या उपदेशाचा सारांश आहे. हा उपदेश कोणत्याही काळीं, कोणत्याही प्रसंगीं उपयोगी पडणारा असा आहे. भगवद्गीता ग्रंथ अत्यंत पवित्र मानतात. ज्ञानदेवांनीं त्याच ग्रंथांतील उपदेश मराठींत आणला. लोकांत ज्ञानेश्वरी या नांवानें तो प्रसिद्ध आहे. लोकमान्य टिळकांनीं याच उपदेशावर गीतारहस्य रचलें.

श्रीकृष्णानें पांडवांना विजय मिळवून दिला. आणि त्यांची नीट व्यवस्था लागल्यावर त्यांचा निरोप घेतला. द्वारकेंत अनेक वर्षें राज्य करून त्यानें सर्वांचा प्रतिपाळ केला, दुष्टांना शासन केलें, गरिबांस साहाय्य केलें. श्रीकृष्णाच्या साहाय्यानेंच यादवांची भरभराट झाली, पण प्राप्त झालेल्या वैभवामुळें यादव हे दुराचरणी बनले. त्यांना दारूचें भयंकर व्यसन जडलें आणि त्या व्यसनापायीं आपसांत लढून त्यांनीं समस्त यादव कुलाचा नाश करून घेतला.

अवतारसमाप्तीची वेळ आली हें जाणून भगवान् श्रीकृष्ण अरण्यांत एका वृक्षाखालीं पाय लांब करून बसले होते. त्यांच्या पायाचे आरक्त तळवे हेच हरिणाचे डोळे असें कोणा शिकाऱ्याला भासलें. त्यानें एक तीक्ष्ण बाण सोडला. तो पाय भेदून आरपार गेला. त्यांचा आत्मा देह सोडून परलोकीं गेला !

* * *

※

२

※

# धनुर्धर अर्जुन

हस्तिनापुरीं कौरव व पांडव ह्या राजपुत्रांची परीक्षा चालली होती. त्यांचे गुरु द्रोणाचार्य ह्यांनीं त्यांना निरनिराळ्या शस्त्रास्त्रांचा उपयोग कसा करावा हें शिकविलें होतें. एका झाडावर एक कृत्रिम पक्षी ठेवला होता आणि त्या पक्ष्याचा डोळा बाण मारून नेमका फोडावयाचा. सर्व राजपुत्र धनुष्य सज्ज करून त्याला बाण लावून तयार झाल्यावर आचार्यांनीं प्रत्येकाला विचारलें, " तुला काय दिसतं समोर ? " कोणी म्हणाले, " झाड नि त्यावर पक्षी दिसतो. " दुसरे कोणी म्हणाले, " आम्हांला फक्त पक्षी दिसतो. " एकटा अर्जुन म्हणाला, " मला फक्त पक्ष्याचा डोळा दिसतो. " सूचना मिळतांच सर्वांनीं बाण सोडले. पण एकट्या अर्जुनानेंच ' लक्ष्य ' बरोबर वेधलें ! सर्वांनीं अर्जुनाचा जयजयकार केला. द्रोणाचार्यांनीं त्याला शाबासकी दिली.

सोम ( चंद्र ) वंशांतील राजांनीं हस्तिनापुरीं राज्य स्थापिलें. त्या वंशांतील एका राजाचें नांव हस्ति असें होतें. त्यानें हस्तिनापूर हें शहर बसविलें. ह्या वंशांत धृतराष्ट्र व पंडु हे दोन राजपुत्र जन्मले. धृतराष्ट्र हा जन्मापासून अंधळा होता. त्याला शंभर पुत्र झाले. त्यांना कौरव म्हणत. पंडुराजाला पांच पुत्र झाले. त्यांना पांडव म्हणत. युधिष्टिर, भीम, अर्जुन, नकुल व सहदेव हीं त्यांचीं नांवें. कौरवांत दुर्योधन, दुःशासन हे वडील होते.

कौरवांपेक्षां पांडव बुद्धिमान व पराक्रमी होते म्हणून लोक त्यांची स्तुति करूं लागले. कौरवांना त्यांचा हेवा वाटूं लागला. कांहींतरी निमित्त करून पांडवांचा नाश केल्याशिवाय आपण पुढें येणें शक्य नाहीं असें त्यांस वाटलें व त्यांनीं त्यांचा नाश करण्याचे अनेक प्रयत्न केले. दुर्योधनानें लाखेचा एक सुंदर बंगला बांधविला आणि त्यांत त्यानें पांडवांना राहावयास लाविलें. पांडवांना दुर्योधनाचें कपट माहीत होतें. त्यांनीं जमिनींतून एक भुयार खणून बाहेर जाण्यासाठीं रस्ता करून ठेवला होता. पुढें दुर्योधनानें राजवाड्यास आग लावविली. पांडव गुप्त मार्गानें निघून गेले. पुढें तो सर्व बंगला जळून त्याची राख झाली. पांडव आंत जळून मेले असतील, असें वाटून कौरवांना फार आनंद झाला.

पांडव गुप्तपणें निघून गेले, ते पुढें ब्राह्मणवेषानें भटकत द्रुपद राजाच्या दरबारीं गेले. द्रुपद राजानें आपल्या मुलीचें स्वयंवर मांडलें होतें. मत्स्यवेध करण्याचा त्याचा पण कोणालाच पुरा करतां येईना. सर्व राजे निराश झाले. हें पाहतांच अर्जुन पुढें झाला. त्यानें मत्स्यवेध करून द्रौपदीला वरिलें. पुढें त्याच्या आईच्या आज्ञेनें ती पांचही बंधूंची पत्नी मानली गेली.

पांडव जिवंत आहेत ही गोष्ट दुर्योधनाला लवकरच समजली.

धृतराष्ट्रानें त्यांना बोलावून अर्धें राज्य दिलें. तरीपण पांडवांचा नाश करून तें राज्य परत मिळविण्याचा दुर्योधनाचा प्रयत्न चालूच होता.



अर्जुनाचें लग्न श्रीकृष्णाची बहीण सुभद्रा हिच्याशीं झालें. त्यामुळें त्याला श्रीकृष्णासारख्या बलवान् राजाची मदत मिळाली.

पुढें धर्मराजाला आग्रह करून कौरव त्यांच्याशीं द्यूत खेळले. त्यांत कौरवांचा मामा शकुनि ह्यानें लबाडीनें कौरवांना यश मिळवून दिलें; धर्मानें आपले राज्य घालविलें. शेवटीं द्रौपदीलाही पणास लाविलें! आणि अखेरीस बारा वर्षें वनवासाला जाण्याची अटही त्यानें पत्करली. कौरवांनीं द्रौपदीची भरसभेंत विटंबना केली!

पाडव वनवासांत असतांना कौरवांनीं त्यांना ठार मारण्याचा नेक वेळां यत्न केला. पदोपदीं त्यांचा अपमान केला आणि ळीं अवेळीं त्यांचा छळही केला! बारा वर्षांनंतर एक वर्ष पांडव ज्ञातवासांत राहिले. त्यानंतर प्रकट होऊन त्यांनीं आपलें राज्य परत गितलें. श्रीकृष्णानें त्यांच्या बाजूनें शिष्टाई केली; पण सर्व व्यर्थ! र्योधन अगदीं दुराग्रही होता. तो राज्यच काय पण एक गावही ावयास तयार होईना. त्यामुळें नाइलाजास्तव कौरवांशीं पांडवांना युद्ध रावें लागलें!

ह्या युद्धांत कौरवांनीं आपल्या बाजूला बरेच राजे मदतीला बोलाविले. अंग देशाचा राजा कर्ण, सिंधचा जयद्रथ, भगदत्त, शल्य हे सर्व राजे ौरवांना मदत करण्यासाठीं अपापली सेना घेऊन आले. त्याचप्रमाणें ीष्म, द्रोण, अश्वत्थामा वगैरे बरेच वीर त्यांच्या बाजूला होते. उलट ांडवांचे बाजूला मथुरेचा राजा श्रीकृष्ण, द्रुपद वगैरे अनेक राजे होते.

युद्धाच्या आरंभीं अर्जुन रथांत बसून सैन्याची रणांगणावर पाहणी रीत होता. त्या वेळीं त्यानें पाहिलें कीं, हें युद्ध म्हणजे भावाभावांतील ढाई. ह्यांत परस्परांचे अनेक आप्त आहेत. आप्तांनीं एकमेकांना मदत रावयाची तें सोडून केवळ राज्यलोभानें ते एकमेकांस मारावयास प्रवृत्त ाले आहेत, ह्याबद्दल अर्जुनास अति वाईट वाटलें. त्या वेळीं श्रीकृष्ण ाचा सारथी होऊन रथांत बसला होता. त्याच्यावर अर्जुनाची

अतिशय निष्ठा होती, ती इतकी कीं, तो त्याला देवच मानीत असे. म्हणून अर्जुनानें मोठ्या दुःखानें आपलें म्हणणें कृष्णास सांगून म्हटलें,



"कृष्णा, माझ्यानें लढाई करवत नाहीं. केवळ राज्यलोभानें आपले वडील, संबंधी, स्नेही ह्यांना ठार मारणं पाप आहे."

त्यावर श्रीकृष्णानें अर्जुनास उपदेश केला, तो श्रीमद्भगवद्गीता-रूपानें सर्वप्रसिद्ध आहे. ह्या उपदेशानें लढाई करणेंच भाग आहे, अशी अर्जुनाची खात्री झाली. भीष्म, द्रोण अशा वडील व पूज्य माणसांशी लढावें लागत आहे, ह्याबद्दल अर्जुनानें त्यांची प्रथम क्षमा मागितली आणि त्यानंतर त्या घनघोर युद्धास सुरुवात झाली. उभयतांच्या मदतीला आलेलें लक्षावधि सैन्य नाश पावलें. दुर्योधनादि कौरवांचा नाश झाला. पांडवांकडील सैन्यहि नष्ट झालें. फक्त ते पांच भाऊ जिवंत राहिले.

लढाई अठरा दिवस चालली होती. तींत पांडव विजयी होऊन युधिष्ठिर राज्यावर बसला. धृतराष्ट्र, त्याची पत्नी गांधारी, पांडवांची आई कुंती हीं सर्व वृद्ध माणसें तप करण्यासाठीं वनांत निघून गेलीं. कांहीं दिवसांनी अरण्याला एकाएकीं आग लागून ही सर्व मंडळी त्यांत नष्ट झाली.

वडील मंडळींच्या मृत्यूची बातमी आल्यानें पांडवांचें मन अगदीं उदास झालें. पुढें थोडक्याच दिवसांत असें वर्तमान समजलें कीं, द्वारकेचा राजा श्रीकृष्ण हाही निजधामास गेला आणि यादवांनीं व्यसनी बनून परस्परांना ठार मारून सर्वस्वाचा नाश केला. हें ऐकून आपणही राज्यत्याग करणेंच उचित असें वाटून पांडवांनीं आपला नातू राजा परीक्षित ह्याला राज्यावर बसविलें आणि ते सर्व वनांत निघून गेले.

* * *

❀

४

❀

# राजा बिंबिसा

आपला देश प्राचीन काळीं वैभवशिखरावर होता त्यांत पराक्रमी, वैभवशाली आणि प्रजावत्सल अने राजे होऊन गेले. राजा बिंबिसार हाही त्यांच्य मालिकेंत शोभण्यासारखाच होता. सुमारें पंचवीस वर्षें झालीं. त्या वेळीं मगध देशावर शिशुनाग वंशा राजे राज्य करीत होते. राजा बिंबिसार हा त्य वंशांतला पांचवा राजा होता. तो सिंहासनारू झाला तेव्हां त्याची सत्ता फक्त मगध देशावर होती. पराक्रमी असल्यामुळें एवढ्या छोट्या राज्या त्याचें समाधान होईना. त्यानें राज्य वाढविण्या सुरुवात केली. शेजारींच अंग देश होता. तेथी राजाचा पराभव करून तो देश त्यानें आपल्य राज्यास जोडला. त्यानंतर शेजारच्या कोसल आ वैशाली ह्या देशांच्या राजकन्यांशीं लग्न करून त्य राजांशीं त्यानें सख्य केलें.

राजा बिंबिसार अति सुखलोलुप होता. त्यामुळें तिजोरींत कितीही पैसा आला तरी तो त्याला पुरा पडेना. लवकरच त्याच्या पाहण्यांत एक मेंढपाळ आला. त्याच्याजवळ एक मेंढी होती. ती सोन्याची लीद टाकीत असे. ती संपत्ति आपल्याला मिळावी अशी त्याला इच्छा झाली. त्यानें एका राजकन्येचें त्या मेंढपाळाशीं लग्न लावून त्याला आपला जांवई बनविलें. मेंढीपासून प्राप्त होणारें सुवर्ण तो राजाला देऊं लागला. मेंढपाळ आतां राजाचा जांवई झाला होता. तो लोकांशीं ताठ्यानें वागूं लागला. त्यामुळें त्याला अनेक शत्रु उत्पन्न झाले.

वैशालीच्या लिच्छवी राजकन्येपासून राजाला एक मुलगा झाला. त्याचें नांव अजातशत्रु असें ठेवलें होतें. हा मोठा पराक्रमी निघाला



ानें त्याच्या शिक्षणाची उत्तम सोय केली. तो वयांत येतांच राज्यभाराचें कामही थोडथोडें राजा त्याच्यावर टाकूं लागला. पुढें पुढें अजातशत्रु सर्वच कारभार पाहूं लागला आणि बिंबिसार विलासांत ग्न झाला.

महात्मा गौतम बुद्ध हा नुकताच आपले राजवैभव टाकून गेला होता. तो अरण्यात तप करीत होता. बिंबिसारानें त्याला ही व्यर्थ खटपट कशाला करतोस असा उपदेशही केला. पण विलासांत खरें सौख्य नाहीं असें गौतमानें त्याला सांगितलें. अरण्यवासांत जर तुला अक्षय सुख प्राप्त झालें तर सांग म्हणजे मीही तुझ्या मागें येईन असें बिंबिसारानें त्याला सांगून राजधानीजवळच्या एका जंगलांत राहण्याची त्याला परवानगी दिली.

कांहीं दिवसांनीं राजाच्या मनांत आपल्या वैशाली राणीबद्दल कांहीं किन्तु आला. तिला जगांतून गुप्तपणें नाहींशी करावी असें ठरवून त्यानें ती कामगिरी तिच्या सावत्र मुलाला सांगितली. राणीच्या महालाला रात्रीं आग लावून दे म्हणजे ती जळून नाहींशी होईल हा त्याचा उपदेश मुलाला पटला नाहीं; पण उघड नाहीं म्हणून राजाला मोडणें त्याला शक्य नव्हतें. राजाला प्रसन्न करण्यासाठीं राणीच्या महालाला त्यानें आग लावण्याचें कबूल केलें. मात्र तसें करण्यापूर्वीं वैशालीदेवीला कांहीं कारणानें अगोदरच बाहेर जाण्याला त्यानें गुप्तपणें भाग पाडलें. त्यामुळें वर वर तर राजाला खूष केलें आणि स्वतःच्या हातून मातृहत्या व विश्वासघात होऊं दिलीं नाहींत. राणी तर सुरक्षित राहिलीच.

राजाच्या विलासलोलुपतेनें राज्याची तिजोरी रिकामी पडली होती. कितीही पैसा मिळाला तरी तो त्याला पुरेसा वाटेना. त्यामुळें अजातशत्रूवर राज्याची सर्व जबाबदारी असून ती पार पाडण्यासाठीं द्रव्य मुळींच मिळेना! तिजोरींत द्रव्य नसतांही राजा स्वतःच्या विलासासाठीं पाण्यासारखा पैसा खर्च करतो हें पाहून त्याच्या तळपायाची आग मस्तकांत शिरली. खजिना रिकामा असतां तो हें द्रव्य कोठून आणि कसें मिळवितो हेंच त्याला कळेना लवकरच त्या मेंढपाळाची हकीकत

त्याच्या कानांवर आली. त्याबरोबर अजातशत्रूनें त्या मेंढपाळाकडे द्रव्याची मागणी केली. त्याला बिंबिसाराचा जोर असल्यानें त्यानें ती मागणी झिडकारिली. अजातशत्रूच्या धमकावणीला त्यानें भीक घातली नाहीं व उलट उत्तर दिलें कीं, " मी महाराज बिंबिसार ह्यांचा प्रजाजन आहे. प्रजेचं रक्षण करणं हें राजाचं काम आहे. मीं जोंपर्यंत कांहीं गुन्हा केला नाहीं तोपर्यंत माझं कोण काय करणार आहे ? " ह्या उत्तरानें अजातशत्रु खवळून गेला. लवकरच त्यानें आपल्या गुप्तहेरांच्या मदतीनें एका सोनाराकडून त्या मेंढपाळावर चोरीची फिर्याद करविली. न्यायाधीशाकडून त्याला दोषी ठरवून देहान्त प्रायश्चित्त दिलें व ती मेंढी आपणांकडे आणली ! मेंढपाळाला मारतांना आपण अन्याय करीत आहोंत पण आपल्या भगिनीला वैधव्यांत लोटीत आहोंत ह्याची त्यानें तिळमात्र कदर केली नाहीं. अजातशत्रूनें ती मेंढी आणली तों काय आढळून आलें ? त्यानंतर ती मेंढी इतर साध्या मेंढयांप्रमाणें लेंडया टाकूं लागली ! लोकांवर अन्याय केले कीं त्याचें प्रायश्चित्त असेंच मिळावयाचें असें राजा बिंबिसारानें त्याला बजाविलें !

आपल्या मातेच्या महालाला राजानेंच अग्नि लावला ही गोष्ट लवकरच त्याला कळली. आधींच मेंढपाळप्रकरण व त्यांत आलेलें अपयश ह्यांमुळें तो रागावला होताच. त्या सगळ्याचा सूड राजावर म्हणजे प्रत्यक्ष पित्यावर उगविण्याचें त्यानें ठरविलें. राज्याचा बहुतेक कारभार त्याच्याच हातीं होता. त्यानें राजाला कैद करून तुरुंगांत टाकिलें व तेथें त्याचे हाल मांडले ! खाणें बंद करून राजाच्या हातांपायांत जड बेडया घातल्या ! शेवटीं राणीनें रदबदली केल्यावर बेडया तेवढया काढविल्या. त्याची आई राणी वैशाली ही पतीला गुप्तपणें अन्न पोंचवी व त्याचे हाल शक्य तितके कमी होण्याचा प्रयत्न करी. आपल्या पतीला प्रत्यक्ष पुत्रानें कैदेंत ठेवावें हें केवढें दुर्दैव असें तिला वाटे !

अजातशत्रूनें राजावर करडी नजर ठेवून त्याचे हालहाल होऊन तो लवकर मरावा, अशी खटपट चालविली. राजाला अन्नपाणीही वेळेवर मिळेना, मिळालें तर तें अगदीं भिकार असावयाचें! निजायला फटकूर!

अजातशत्रु एकदां राजमहालांत बसला होता. जवळच त्याची आई होती. त्याच्या मांडीवर मुलगा बसला होता. राजा त्याच्याशीं बोबडें बोलून त्याचें कौतुक करीत होता. इतक्यांत त्यानें राजाचे कपडे खराब केले. तरी तो रागावला नाहीं! मोठ्या अभिमानानें तो आईला म्हणाला, "आई, पाहा, माझी मुलावर किती माया आहे ती! नाहीं तर आमचे वडील!"

राणी म्हणाली, "ऊं! ह्यांत रे तूं मोठंसं काय केलंस? तुझ्या प्रेमळ नि उदार वडिलांच्या एखाद्या केसाचीही सर तुला येणार नाहीं, समजलास! तूं जन्माला आलास त्याच वेळीं राजज्योतिषानें सांगितलं, कीं हा मुलगा तुमचा घात करील, ह्याचं तोंडही न पाहतां ह्याला अरण्यांत सोडून द्यावा! त्याच वेळीं जर त्यांनीं तसं केलं असतं तर! त्यांचे आजचे भयंकर हाल चुकले असते पण पुत्रप्रेमामुळेंच त्यांनीं तसं केलं नाहीं! आपल्या हातानें त्यांनीं आपलं दुर्दैव ओढवून घेतलं! सांग पाहूं थोर कोण नि कुणाचं आपल्या मुलावर जास्त प्रेम आहे तें?"

आपल्या वडिलांचें आपल्यावर केवढें प्रेम होतें हें आतां त्याला कळलें! केवढा हा त्यांचा थोरपणा! त्याला स्वतःच्या वर्तनाची आतां लाज वाटूं लागली! पश्चात्तापानें तो उठला आणि त्यानें एकदम तुरुंगाची वाट धरली. जातांना एक गदा हातीं घेतली. ती कुलपावर मारून कुलूप फोडून वडिलांस मुक्त करावें व त्यांचे पाय धरावें असें त्यानें ठरविलें! तुरुंगाच्या अधिकाऱ्याला बोलावून किल्ल्या आणून तुरुंगाचें दार उघडण्यास वेळ लागेल! एवढाही विलंब त्याला सहन होत नव्हता!

तुरुंगावरील पहारेकऱ्यानें अजातशत्रूला दुरूनच पाहिलें. हातांत गदा आहे आणि तो वेगानें तुरुंगाकडे येत आहे हें पाहून तो घाबरला ! त्यानें लागलीच राजाला तशी सूचना दिली. आपल्या डोक्यांत गदा घालून आपला जीव घेण्यासाठीं तो येत आहे असें त्याला वाटलें ! तरीही आपल्या मुलाला पितृहत्येचें पाप लागूं नये अशी राजाची फार फार इच्छा होती. असा प्रसंग टाळण्यासाठीं राजानें एक जहाल विषानें भरलेली कुपी आपल्याजवळ बाळगिली होती. ज्याला आपण भीत होतो तोच प्रसंग जवळ आला असें वाटून त्यानें ती कुपी तोंडांत ओतून विष गट्ट केलें ! अजातशत्रूनें तुरुंगाच्या दाराचें कुलूप गदा मारून फोडलें आणि तो आंत आला ! त्याचें हें कृत्य पाहून पहारेकरी तर घाबरूनच गेले ! अजातशत्रु आंत आला तों राजा बिंबिसार मरून पडलेला त्याला दिसला ! अशा दुर्दैवी परिस्थितींत ह्या पराक्रमी राजाचा अंत झाला.

मगध देशाची मूळची राजधानी राजगृह ही होती. पण राज्य वाढल्यावर त्यानें जुन्या राजगृहाजवळच्या टेकडीवर मोठें शहर वसविलें त्याचेंही नांव राजगृहच ठेवलें होतें !

* * *

❋

५

❋

# गौतम बुद्ध

कपिलवस्तु शहरांत शुद्धोदन राजा राज्य करीत होता. त्याला दोन स्त्रिया होत्या. एकीचें नांव मायादेवी आणि दुसरीचें गौतमी. त्या राजाला पुष्कळ दिवसपर्यंत संतति झाली नाहीं. त्यामुळें तो फार खिन्न झाला होता. बऱ्याच वर्षांनीं मायादेवीच्या पोटीं गर्भ राहिला. बाळंतपणासाठीं मायादेवी आपल्या माहेरीं जावयास निघाली. पण ती बापाच्या घरीं पोंचण्यापूर्वींच वाटेंत एका लाल वृक्षाखालीं बाळंत झाली आणि तिला एक सुंदर मुलगा झाला.

असें सांगतात कीं, हा मुलगा जन्मला त्या वेळीं सर्वत्र पुष्पवृष्टि झाली. जिकडे तिकडे गंभीर शांतता पसरली आणि सगळें जग जणूं काय आनंदानें स्मित करीत आहे असा भास झाला. मायादेवी बाळंत होतांच तिला राजवाडयांत आणविलें व मुलाचे ग्रह पाहण्यासाठीं राजानें राजज्योतिष्याला बोलाविलें.

राजपुत्राची कुंडली मांडून ज्योतिषी म्हणाला, "महाराज, आपण फार भाग्याचे! हा मुलगा दुनियेला ज्ञानामृत पाजून तारण्याकरितां अवतरला आहे!" हें ऐकतांच राजाचा आनंद गगनांत मावेनासा झाला! त्यानें राजधानींत गुढ्या-तोरणें उभारून पुत्रजन्मोत्सव साजरा करविला.

पुत्रप्राप्तीचा हेतु सिद्ध झाला म्हणून मुलाचें नांव सिद्धार्थ असें ठेविलें. तो एकुलता एक असल्यानें राजा त्याला जीव कीं प्राण करीत असे! तो देखणा होता, तसाच बुद्धिमानही होता. थोडा मोठा झाल्यावर राजानें त्याला गुरूच्या हातीं दिलें. पण आपण जें शिकविणार तें सर्व त्याला अगोदरच येत आहे, असें गुरूला आढळून येतांच त्याला अचंबा वाटून तो राजास म्हणाला, "महाराज, सिद्धार्थ खचित दैवी पुरुष आहे!"

सिद्धार्थ क्षत्रिय असल्यामुळें क्षात्रविद्येचें शिक्षणही त्याला मिळालें. लवकरच तो घोडयावर बसण्यांत मोठा पटाईत झाला. लहानपणापासूनच तो अत्यंत दयाळू होता. घोडयावर बसून दौडत असतांना घोडा दमला तर तो लागलीच थांबे आणि त्याच्या अंगावरून हात फिरवी व त्याला विश्रांति देई.

एके दिवशीं तो राजवाडयाजवळील बागेंत फुलांची शोभा पाहात आसतां आकाशांतून एक हंस खालीं पडला. त्याच्या अंगांत कोणाचा तरी एक बाण घुसला होता. हंसाला पाहतांच सिद्धार्थाचें मन कळवळलें. तो लगेच हंसापाशीं गेला. त्यानें त्याच्या अंगांत रुतलेलें बाणाचें टोंक काढलें आणि त्याची जखम बांधून त्याला पाणी पाजलें. इतक्यांत त्याचा चुलतभाऊ देवदत्त ह्याच्याकडून एक नोकर तो हंस नेण्यासाठीं आला. देवदत्तानेंच बाण मारून हंसाची शिकार केली होती. सिद्धार्थानें हंस देण्याचें नाकारलें. पुढें देवदत्तानें शुद्धोदन राजाकडे तक्रार केली.

शेवटीं एका ऋषीनें न्याय दिला कीं, "प्राण्याला मारणाऱ्यापेक्षां जगविणाराचाच त्यावर जास्त हक्क पोंचतो; म्हणून हंस सिद्धार्थाला मिळावा."

सिद्धार्थाच्या दृष्टीला कोणतेंही दुःख पडूं नये, ह्यासाठीं राजा फार दक्षता घेई. त्याच्यासाठीं त्यानें मोठमोठे राजवाडे बांधले. हेतु हा कीं राजवाड्यांतच त्याचा वेळ जावा. पुढें राजानें यशोधरा नांवाच्या सुंदर राजकन्येशीं त्याचें लग्न लावून दिलें. थोड्या दिवसांनीं तिला एक मुलगा झाला.

एके दिवशीं सिद्धार्थ शहराची शोभा पाहण्यास निघाला. त्या दिवशीं शहरांतील सर्व रस्ते व घरें शृंगारिलीं होतीं. जिकडे तिकडे पताका आणि ध्वज फडकत होते. शहरवासीयांनीं आपलीं घरें रंग लावून सुंदर केलीं होतीं व रस्त्यांवर रांगोळ्या घातल्या होत्या. राजपुत्र रस्त्यानें जात असतां त्याला एक वृद्ध माणूस दिसला. थोडा पुढें जातांच एक रोगपीडित मनुष्य कासावीस झाला आहे असें त्यानें पाहिलें. ह्या दोघां-विषयीं तो विचार करीत आहे, तोंच एक प्रेत त्याला दिसलें. त्यानें मनुष्याची अशी स्थिति होण्याचें कारण एका साधूस विचारलें. तेव्हां त्यानें सांगितलें, "सर्वांसच अशी स्थिति प्राप्त होते आणि आपणांसही होणार." हें ऐकतांच तो एकदम विचारमग्न झाला. लागलीच निर्वाणपदप्राप्तीसाठीं सर्वस्वाचा त्याग करण्याचें त्यानें मनांत ठरविलें.

त्याच दिवशीं मध्यरात्रीं सिद्धार्थ राजवाड्यांतून गुप्तपणें जावयास निघाला. आपली प्रेमळ पत्नी व नुकताच झालेला मुलगा ह्यांना एकदां शेवटचें पाहून जावें, असा विचार करून तो पत्नीच्या महालांत गेला. गाढ झोपलेल्या त्या दोघांच्या दर्शनानें त्याला मोह पडून 'ह्यांना सोडून



कसं जावं ? ' असा विचार क्षणभर त्याच्या मनांत आला पण दुसऱ्याच क्षणांत त्यानें आपलें मन आवरलें. नंतर तो बाहेर पडला. एका नोकराकडून एक घोडा घेऊन तो नोकरासह अरण्यांत गेला. पहांटेच्या सुमारास आपल्या अंगावरील अलंकार व वस्त्रें त्यानें त्या नोकरास दिलीं. आणि त्याचे फाटके कपडे आपण घालून तो एकटाच पुढे गेला. तो नोकर त्याच्या आज्ञेप्रमाणें राजधानीस परत आला.



सिद्धार्थानें नंतर साधुवेष धारण केला व गौतम असें नांव घेतलें. फिरतां फिरतां तो राजगृह नांवाच्या नगरींत आला. तेथें बिंबिसार राजा राज्य करीत होता. हें राजगृह नगर विंध्य पर्वताच्या पांच शिखरांवर वसलें होतें. हा राजा मोठा धर्मनिष्ठ असून यज्ञयाग पुष्कळ करीत असे. एकदां कांहीं धनगर पुष्कळशीं मेंढरें घेऊन चालले होते. ही सर्व मेंढरें यज्ञांत बळी दिलीं जाणार आहेत असें गौतमानें ऐकलें,

लागलीच तो बिंबिसाराच्या यज्ञगृहांत गेला. त्यानें पशुहत्येपासून राजाचें मन वळविलें. गौतम मुनीची तेजस्वी गंभीर मुद्रा पाहून राजाचा भाव त्याच्या ठिकाणीं जडला.

नंतर गौतम साधूंच्या आश्रमांत गेला. त्यांच्या सांगण्यावरून मोक्षनिर्वाणपद मिळावें, म्हणून त्यानें उपवास केले. नानाप्रकारें तप केलें, पण त्यामुळें त्याच्या मनास समाधान वाटलें नाहीं. म्हणून त्यानें उपास करणें सोडून दिलें.

पुढें फिरत फिरत तो गया शहरांत गेला. निर्वाणपद कसें मिळेल ह्याचा त्याला आतां ध्यास लागला होता. तेथें एका पिंपळाच्या झाडाखालीं बसून तो ध्यानमग्न झाला. तो ध्यानमग्न असतां त्याला एकाएकीं सत्यज्ञान झालें. तो ज्ञानी झाला आणि त्या वेळेपासून त्याला बुद्ध असें नांव मिळालें.

नंतर तो सत्यज्ञानाचा उपदेश करीत फिरूं लागला. त्याचें अद्भुत ज्ञान, शांत व गंभीर मुद्रा आणि सुंदर उपदेश ह्यांमुळें त्याला पुष्कळ शिष्य मिळाले. मोठमोठे ऋषि व राजे ह्यांना त्याचा उपदेश पटला आणि ते पटापट त्याचे शिष्य बनले. राजा बिंबिसार त्याचा शिष्य झाला व त्यानें बुद्ध धर्म स्वीकारला. नंतर तो कपिलवस्तु शहरांत आला. त्याच्या बापानें त्याला पुष्कळ आग्रह केला, तरी स्वगृहीं भोजन न करतां भिक्षा मागूनच त्यानें अन्नसेवन केलें. राजा शुद्धोदन त्याचा शिष्य बनला. त्याच्या पत्नीनें संसार सोडून दिला व ती बुद्ध धर्म स्वीकारून भिक्षुणी झाली. त्याचा मुलगा राहुल हा पण बौद्ध धर्माचा अनुयायी बनला.

गौतम बुद्ध यज्ञ करणें वगैरे गोष्टींच्या विरुद्ध उपदेश करी, म्हणून त्याला अनेक शत्रु उत्पन्न झाले. त्याचा चुलत भाऊ देवदत्त त्याचा फार द्वेष करी. त्यानें एकदां त्याला विष घालण्याचा प्रयत्न केला. पण

विषाचा कांहींच उपयोग झाला नाहीं. पुढें बुद्धाची शांति पाहून त्याचे सर्व शत्रु त्याला शरण आले.

अशा प्रकारें आपल्या धर्माचा उपदेश करीत तो ऐंशीं वर्षांचा होईपर्यंत फिरत होता. वृद्ध होऊन त्याचा मृत्युकाळ जवळ आला म्हणून त्याचा शिष्य आनंद रडूं लागला. तेव्हां गौतम म्हणाला, "आनंद, रडण्याचं कारण काय? मृत्यु हा सर्व वस्तूंचा शेवट आहे. जें जन्मास आलं, तें मरणार. मग रडून काय उपयोग?" त्याच्या मृत्यूनंतरही त्याचा धर्मप्रसार जोरानें झाला. ब्रह्मदेश, चीन, जपान, सीलोन, तिबेट ह्या देशांत हा धर्मप्रसार विशेष झाला आणि अजूनही त्या देशांतील लोक बौद्ध धर्मीच आहेत.

प्राण्यांवर दया करावी, हिंसा करूं नये, खरें बोलावें, वडिलांस मान द्यावा, चोरीचहाडी, परनिंदा करूं नये, म्हणजे सुख मिळतें; त्यासाठीं तप करण्याची जरुरी नाहीं, असा उपदेश तो लोकांस करी. त्याच्या शिष्यांना भिक्षु म्हणतात. ते भिक्षा मागून निर्वाह करतात. हिंदु लोक बुद्धाला विष्णूचा नववा अवतार मानतात.

गौतम बुद्ध कुशीनगर येथें इ. स. पूर्वी ४८७ चे सुमारास मरण पावला.

* * *

※

६

※

# महावीर वर्धमान

क्षत्रियकुंड नगरांत सिद्धार्थ नांवाचा धर्मिष्ठ राजा होता. त्याची पत्नी राणी त्रिशलादेवी. त्यांना दोन मुलगे होते, एकाचें नांव नंदिवर्धन आणि दुसऱ्याचें नांव वर्धमान. सुदर्शना नांवाची एक मुलगी पण त्यांना होती.

वर्धमान सुमारें सात आठ वर्षांचा झाल्यावर त्याला गुरुगृहीं ठेविलें. पण तो इतका बुद्धिमान होता, कीं गुरूनें कोणतीही गोष्ट शिकविण्यास आरंभ करावा तोंच ती वर्धमानाला येत आहे, असें आढळून येई. त्यामुळें गुरुगृहांतून त्याची लवकरच सुटका झाली.

लहानपणापासूनच तो निर्भय वृत्तीचा होता. एकदां राजप्रासादाजवळच्या मैदानांत तो दुसऱ्या राजकुमारांसह खेळत होता. तेथें एक वडाचें झाड होतें. ते खेळत असतां त्या वडाच्या झाडाच्या बुंधांतील एका बिळांतून एक साप फूत्कार करूं लागला. तें पाहून

इतर सर्व मुलें भिऊन पळालीं. पण वर्धमान आपला जागच्या जागींच उभा होता! साप रागानें फूत्कार करीत त्याच्याकडे जाऊं लागला. वर्धमानानें जोरानें त्याचें तोंड घट्ट पकडलें व त्यास दूर भिरकावून दिलें!

तो आईबापांना अतिशय पूज्य मानी. त्यांची आज्ञा मानण्यांत व त्यांची सेवा करण्यांत त्याला आनंद वाटे. तो वयांत आल्यावर त्याचें लग्न करावें असें त्याच्या मातापितरांस वाटूं लागलें. पण वर्धमानाला संसाराची आवड नव्हती. तो उदास वृत्तीनें राहात असून जन्मभर संन्यासवृत्तीने राहावें अशी त्याची इच्छा होती.

राजा समरवीर हा सिद्धार्थ राजाचा मांडलिक होता. त्याला यशोदा नांवाची सुंदर कन्या होती. तिचें लग्न वर्धमानाशीं व्हावें अशी त्याची इच्छा होती; म्हणून तिला एका सुंदर रथांत बसवून व बरोबर आपला प्रधान देऊन राजानें तिला सिद्धार्थ राजाकडे पाठविलें. तेथें पोंचतांच प्रधानानें समरवीर राजाची इच्छा सिद्धार्थ राजाला कळविली. राजा विचारांत पडला. त्यानें वर्धमानाला त्या बाबतींत विचारलें. त्यानें प्रथम नकार दिला. पण आईनें अति आग्रह केल्यामुळें तो लग्नास तयार झाला. पुढें त्या दोघांचें मोठ्या समारंभानें लग्न झालें. कांहीं काळ त्यानें सुखानें संसार केला. त्याला एक कन्यारत्न पण झालें. इतकें झालें तरी त्याच्या मनास खरा आनंद होत नव्हता. संसार असार आहे, परमेश्वरप्राप्तीसाठीं यत्न करणें हेंच आपलें कर्तव्य आहे, ह्याची जाणीव त्याच्या मनाला रात्रंदिवस टोंचीत होती! यशोदेला तर नेहमीं भीति वाटत असे, कीं आपला पति कधीं संसारत्याग करील ह्याचा नेम नाहीं!

कांहीं दिवसांनीं राजा सिद्धार्थ आणि राणी त्रिशला स्वर्गवासी झालीं. त्या वेळीं वर्धमान अठ्ठावीस वर्षांचा होता. त्यानें आपला बंधु नंदिवर्धन ह्याच्याजवळ सर्वस्वत्याग करून संन्यास घेण्याची परवानगी मागितली! वडिलांच्या दुःखानें व्याकुळ झालेल्या नंदिवर्धनानें तसें करूं

नको म्हणून काकुळतीनें सांगितलें. म्हणून वर्धमानानेंही आपला बेत थोडे दिवस थांबविला. तरी पण त्याच्या मनाला शांतता नव्हती! रात्रंदिवस संसार असार आहे, परमेश्वराचा शोध करणेंच आपलें कर्तव्य आहे व त्यासाठीं संन्यास घेणें जरूर आहे, हे विचार त्याला चैन पडूं देत नसत.

त्यानंतर त्यानें राजवाड्यांत राहूनच तपस्वी जीवन सुरू केलें! प्रथम सुग्रास भोजनाचा त्यानें त्याग केला! तो दिवसचे दिवस उपवास करूं लागला! कधीं कधीं तर नुसतें गरम पाणी पिऊनच तो राहूं लागला! अशा प्रकारें एक वर्ष राहिल्यानंतर त्यानें आपली संपत्ति गरीबगुरिबांना वांटून टाकण्यास सुरुवात केली! ह्याही स्थितींत एक वर्ष गेलें. आतां मात्र त्याच्यानें धीर धरवेना. संसार सोडून आत्मसाधनासाठीं वनांत गेलेंच पाहिजे असें त्याला वाटूं लागलें! पुन्हां एकदां त्यानें वडील बंधूची आज्ञा मागितली. ह्या वेळीं नंदिवर्धनानें त्याचा निश्चय पाहून त्याला आज्ञा दिली. ही आज्ञा मिळतांच मार्गशीर्ष वद्य १० ह्या दिवशीं त्यानें महाभिनिष्क्रमणाची तयारी केली!

मोठ्या समारंभानें अश्वारोहण करून तो राजधानीबाहेरच्या एका उपवनांत गेला. तेथें त्यानें आपल्या अंगावरील दागिने व मौल्यवान् वस्त्रें काढलीं आणि सर्वस्वाचा त्याग करण्याची प्रतिज्ञा केली! अशा रीतीनें हजारों नोकरचाकर असलेला वर्धमान सर्वस्व त्यागून संन्यासी बनला! नंतर सर्वांचा निरोप घेऊन तो तप करण्याकरितां निघून गेला.

आत्मज्ञानासाठीं त्यानें भीषण तपश्चर्या केली. त्यानें उपासतापास केले. वनांत, गुहांत आणि घोर जंगलांत अनेक वेळां तो ध्यान लावून बसला. ध्यानमग्न असतां तो इतका एकचित्त होऊन जाई कीं कितीही संकटें आलीं, क्रूर श्वापदांनीं हल्ला केला, रानटी लोकांनीं त्रास दिला, तरी तो डगमगत नसे. त्याच्या शरीरावर अनेक


पक्षी व माशा येऊन बसत, पण त्याचें त्याला भानच नसे. तो एकाच जागीं फार दिवस राहात नसे. अशा रीतीनें एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं जाण्याचा त्यानें सारखा क्रम चालू ठेवला होता.

एकदां एका निबिड जंगलांतून जात असतां एक भयंकर विषारी साप त्याजवर धांवून आला. वर्धमान मुळींच डगमगला नाहीं. उलट आपल्या अधिकारयुक्त वाणीनें त्यानें त्या सापाला थांबविलें. महावीराचे शब्द ऐकतांच आपला दुष्ट व भयंकर स्वभाव सोडून तो साप त्याच्या चरणीं लीन झाला.

फिरतां फिरतां तो बिहार प्रांतांत शिरला. तेथें अत्यंत क्रूर लोक राहात असत. तेथें जाऊन स्वतःच्या सहनशीलतेची कसोटी पाहावी, असा त्याचा उद्देश होता. तेथें त्याला कोणी खावयास देईना; उलट लोक आपले जंगली कुत्रे त्याच्या अंगावर सोडीत. पण अशाही दिव्यां-तून तो पार पडला.

एकदां तो ध्यानमग्न असतां जवळच एक धनगर होता. धनगरानें त्याला म्हटलें, 'जरा माझ्या बैलावर नजर ठेव.' खरें म्हटलें तर महावीर ध्यानस्थ होता. त्याला ह्यांतलें कांहीं समजलें नाहीं. तरी पण हा आपल्या बैलावर नजर ठेवील असें वाटून तो गोपाळ निघून गेला. इकडे त्याचा बैल कोठें निघून गेला. थोड्या वेळानें तो धनगर परत आला. पाहतो तों बैल कोठें दिसेना! गोपाळानें रागानें महावीराला विचारलें, 'काय रे, माझा बैल कोठें गेला?' पण तो उत्तर कसचें देणार! तो तर ध्यानमग्न होता! हा उत्तर देत नाहीं हें पाहून तो गोपाळ चिडला. त्यानें एक तीक्ष्ण गवताची काडी त्याच्या कानात घालून म्हटलें, 'कां बहिरोबा, ऐकू येतं का मी काय म्हणतों तें?' त्या काडीमुळें महावीराच्या कानास फार इजा झाली; पण त्यानें एक चकार शब्दही काढला नाहीं!

अशा रीतीनें त्यानें अनेक संकटें सोशिलीं. पण आपला तपश्चर्येचा मार्ग सोडला नाहीं. शेवटीं तो एका शेतांत एका शालवृक्षाखालीं ध्यान लावून बसला असतां त्याला आत्मज्ञान प्राप्त झालें. आपणांस सत्य-ज्ञानाची प्राप्ति झाल्यानंतर महावीर लोकांचा उद्धार करावा म्हणून सर्व देशभर तो फिरला. त्याला अनेक शिष्य मिळाले. कितीतरी



ठिकाणीं त्यानें आपल्या धर्माचे संघ स्थापिले. त्या संघांना तीर्थ असें म्हणतात आणि ह्या नांवावरून त्याला तीर्थंकर हें नांव मिळालें. राग, द्वेष आणि लोभ नाहींसे करून त्यानें आपलें मन ताब्यांत ठेवलें, ह्यावरून त्याला जिन हा शब्द लावतात. त्याचे शिष्य व धर्म ' जैन ' ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत.

यज्ञयागांनीं परमेश्वरप्राप्ति होत नाहीं; अहिंसा, सत्य हींच खरा धर्म होत; धर्मांत जातिभेद नाहीं वगैरे मतें जैन धर्मांत आहेत. महावीर आपल्या धर्माचा प्रसार करीत सुमारें तीस वर्षें फिरत होता. फिरतां फिरतां

शेवटीं तो पायापुरी येथें गेला आणि तेथें जमलेल्या लोकांना आपल्या धर्माची दीक्षा देऊन तो निर्वाण पावला. तो दिवाळीचा दिवस होता. त्याच्यासारखा दिव्यात्मा परलोकीं जाऊन ह्या लोकीं अंधार पडला म्हणून लोकांनीं लाखों दिवे लावले ! जैन लोक दिवाळीच्या सणाचे कारण असें सांगतात.

* * *

※

७

※

# सम्राट् चंद्रगुप्त

सुमारें तेवीसशें वर्षांपूर्वीं मगध देशावर महानंद नांवाचा राजा राज्य करीत होता. ह्याच वेळीं तक्षशिला नगरींत चाणक्य नांवाचा हुशार ब्राह्मण राहात होता. कांहीं कारणानें आपला गांव सोडून तो मगध राजाकडे आला. त्या वेळीं मगध राजाची राजधानी पाटलीपुत्र ही होती. महानंदानें चाणक्याचा सन्मान करून त्यास आपणांकडे राहविलें. पण एके दिवशीं एका राजकुमारानें राजमहालांत चाणक्याचा अपमान केला. चाणक्य हा अति रागीट आणि दीर्घद्वेषी होता. त्यानें तेथल्या तेथें प्रतिज्ञा केली, कीं नंदवंशाची पाळें-मुळें खणून सर्वांचा नाश करीन तरच नांवाचा चाणक्य !

अशी प्रतिज्ञा करून चाणक्य राजमहालांतून घराकडे निघाला. येतांना वाटेंत त्याला कांहीं मुलें खेळतांना दिसलीं. त्यांत एक मुलगा राजा झाला

होता. इतर मुलें कोणी भाट तर कोणी सैनिक म्हणून त्याच्यापुढें उभीं राहून राजाची स्तुति करीत होतीं. स्तुति ऐकून राजा संतुष्ट झाला व त्यांना दानें देऊं लागला. एकाला हजार मोहरा, तर दुसऱ्याला दोन हजार, तर तिसऱ्याला दहा गांवें ह्याप्रमाणें बक्षीस-वांटणी चालली होती!

चाणक्य तें सर्व दुरून ऐकत होता. मुलांची थोडी थट्टा करावी, असें वाटून तो एकदम पुढें झाला व त्यानें राजाच्या स्तुतिपर एक कविता म्हटली. त्याजबरोबर खेळांतला राजा म्हणाला, 'ह्या शहरांतील सर्व गाई तुम्ही घेऊन जा!' हें ऐकतांच चाणक्य म्हणाला, 'तूं दान दिलंस; पण या नगरीचा राजा काय झोपला आहे?' त्या मुलानें उत्तर दिलें, 'त्यांत काय मोठंसं! ज्याच्या मनगटांत जोर असेल तो केव्हांही राजा होईल! महानंद कांहीं अमर नाहीं!'

हें उत्तर ऐकून चाणक्याच्या मनांत त्या मुलाबद्दल कुतूहल उत्पन्न झालें. त्यानें त्याचा हात पाहून मनांत म्हटलें कीं, 'हा पुढेंमागें राजा होणार. ह्याच्या हातावर राजचिन्ह स्पष्टच आहे!'

झालें! तो तात्काळ त्या मुलाच्या आईबापांकडे गेला. खरें म्हणजे तो मुलगा महानंदाचा दासीपुत्र होता. त्याच्या आईचें नांव मुरा असें होतें. 'ह्या मुलाला माझ्या हवालीं कराल तर ह्याला मी खरा राजा करीन' असें त्या मुलाच्या घरच्या मंडळींस चाणक्यानें सांगितलें! चाणक्याच्या हुशारीबद्दल त्याची प्रसिद्धि झालेलीच होती. 'मुलगा राजा होणार! मग ह्याच्या हवाली कां न करा?' असा विचार करून आईनें त्याला चाणक्याच्या हातीं दिलें! त्याला घेऊन चाणक्य तावड-तोब पाटलीपुत्र सोडून चालता झाला.

चाणक्यानें त्या मुलाला शस्त्रविद्येचें शिक्षण दिलें आणि त्याच्या मदतीकरितां थोडें सैन्य पण जमा केलें. त्या सैन्यानिशीं त्या मुलानें—चंद्रगुप्तानें—पाटलीपुत्र शहरावर हल्ला केला. पण महानंद कांहीं कमी

नव्हता. त्याचें सैन्यही मोठें होतें आणि त्यांत खूप कसलेले शूर शिपाई होते. त्यांनीं चंद्रगुप्ताच्या सैन्याचा पराभव करून त्याला पळवून लावलें.

ह्यानंतर कित्येक वर्षें चंद्रगुप्त भटकत होता. हिमालयाच्या पायथ्याशीं एक लहानसें राज्य होतें. तेथील राजानें चंद्रगुप्ताला मदत करण्याचें कबूल केलें. त्यानें सैन्याची तयारी केली. दोघे मिळून जो मुलूख जिंकतील, तो अर्धा अर्धा वांटून घ्यावयाचा असा दोघांमध्यें करार झाला.



आतां चंद्रगुप्तानें मोठ्या धिटाईनें पाटलीपुत्र नगरीवर स्वारी केली. मोठें घनघोर युद्ध झालें आणि ह्या वेळीं महानंदाच्या सैन्याचा पराभव होऊन स्वतः राजा मारला गेला! अशा रीतीनें मगधाचें राज्य चंद्रगुप्ताच्या हातीं आलें! त्यांतील अर्धें राज्य त्या दुसऱ्या राजाला मिळावयाचें; पण चंद्रगुप्ताचें नशीबच जोरदार! तो राजा अपघातानें मरण पावला आणि अशा रीतीनें चंद्रगुप्ताचा वांटेकरी नाहींसा होऊन

त्याला सर्वच राज्य मिळालें ! आणि चाणक्याची प्रतिज्ञा पण पुरी झाली ! ह्यानंतर चंद्रगुप्तानें चाणक्याच्या मदतीनें आपलें राज्य खूप वाढविलें !

ह्याच सुमारास ग्रीक बादशाहाचा सेनापति हिंदुस्थानांत ग्रीक साम्राज्य स्थापण्याच्या उद्देशानें मोठें सैन्य घेऊन आला. ह्या सेनापतीचें नांव सेल्युकस असें होतें. सिकंदर बादशाहानें जसा जय मिळविला तसाच आपणांस मिळेल, अशी त्याला आशा वाटत होती. पण त्याला अनुभव अगदींच वेगळा आला तो स्वारी करून आला त्या वेळीं चंद्रगुप्त बराच प्रबळ झाला होता. त्यानें तयारी करून ह्या परकीय सैन्याचा चांगलाच पराभव केला, त्यामुळें सेल्युकस ह्यालाच शरण येऊन तह करावा लागला. त्यानें आपली सुंदर मुलगी हेलन ही चंद्र-गुप्ताला अर्पण करून त्याला आपला जांवई केलें. हेतु हा कीं एक तर चंद्रगुप्ताहून सर्व दृष्टींनीं श्रेष्ठ असा दुसरा जांवई मिळणें शक्य नाहीं आणि असा बलवान् जांवई मिळाला तर कधीं ना कधीं त्याची मदत सहज मिळूं शकेल ! असो. अशा रीतीनें चंद्रगुप्त सेल्युकसचा जांवई झाला.

चंद्रगुप्तानें जवळजवळ सर्व उत्तर हिंदुस्थान आपल्या ताब्यांत आणलें आणि ठिकठिकाणीं चांगला बंदोबस्त करून आपलें साम्राज्य मजबूत बनविलें. त्याच्याजवळ फार मोठें लष्कर असे. हजारों हत्ती, हजारों घोडेस्वार आणि लाखों पदाती ह्या लष्करांत असत. इतकें मोठें आणि बलवान् सैन्य असल्यावर राज्याचा बंदोबस्त करणें काय कठीण आहे ?

चंद्रगुप्ताच्या राज्यकारभारांत त्याला नेहमीं सल्लामसलत देणारा त्याचा गुरु चाणक्य हाच होता. चाणक्य हा मोठा हुशार आणि

राजकारणी पुरुष होता. ‘ अर्थशास्त्र ’ ह्या नांवाचें त्याचें एक पुस्तक आज उपलब्ध आहे. त्यांत राजकारणाविषयीं शास्त्रशुद्ध नियम दिले आहेत. त्यांवरून चाणक्याच्या श्रेष्ठपणाची कल्पना सहज होते. ह्या पुस्तकांतील राजनीतीप्रमाणेंच चंद्रगुप्तानें राज्य चालविलें होतें, म्हणून त्याचें राज्य भरभराटीला चढलें. राज्यकारभाराच्या सोयीसाठीं त्यानें अनेक खातीं पाडलीं होतीं. परदेशांशींही त्याचा पत्रव्यवहार होत होता. व्यापार व उद्योग ह्यांची भरभराट होती. नद्यांना कालवे काढून जमिनीस पाणी पुरविण्यांत आलें होतें. सारांश, प्रजेच्या अनेक प्रकारच्या सुख-सोयी त्याच्या राज्यांत केलेल्या होत्या आणि हा सगळा चाणक्याचा शहाणपणा.

आपली प्रतिज्ञा पुरी करणें एवढाच चाणक्याचा हेतु होता. त्यानें चंद्रगुप्ताला सर्वप्रकारें मदत केली; पण आपणांकडे कोणताच अधिकार घेतला नाहीं. राज्याची व्यवस्था नीट लागल्यावर तो राज्य सोडून आपल्या आश्रमांत गेला ! केवढा हा त्याग !

पुष्कळ वर्षें राज्य केल्यावर चंद्रगुप्तानें भद्रबाहु नांवाच्या एका जैन मुनीच्या उपदेशानें राज्यत्याग करण्याचें ठरविलें. एके दिवशीं आपला मुलगा बिंदुसार ह्याला सगळें राज्य देऊन तो स्वतः संन्यासी बनला आणि वनांत निघून गेला !

ह्या राजाचें चंद्रगुप्त असें नांव कां पडलें, ह्याविषयीं एक मोठी मनोरंजक दंतकथा आहे. ती अशी–ह्याची आई मुरा ही गरोदर असतांना तिला डोहाळे लागले, कीं चंद्रबिंबांतून निघणाऱ्या सुधारसाचें पान करावें ! पण हे डोहाळे पुरविणार कसे आणि कोण ? पण एका कल्पक गृहस्थानें मोठ्या चातुर्यानें तिचे हे डोहाळे पुरविले ! त्यानें आकाशांत पूर्ण चंद्र उगवला असतां घराच्या छपराला एक भोंक पाडून त्यांतून चंद्रकिरण आंत आणिले आणि त्याच्या खालींच नेमकें दुधाचें भांडें धरून तें तिला

पिण्यास दिलें. भांड्यांतील दूध संपतें तोंच तें छपराचें भोंक बंद करण्यांत आलें. अशा रीतीनें तिनें चंद्र गुप्तपणे प्राशन केला, तेव्हां पुढें जो पुत्र झाला त्याचें नांव चंद्रगुप्त असें पडलें.

हा राजा ' मुरा ' ह्या दासीचा मुलगा. वास्तविक तो नंद राजाचाच मुलगा होता. पण मुरा ह्या नावावरून ह्या वंशांतील राजांना पुढें मौर्य घराण्यांतील राजे असें नांव मिळालें.

* * *

आ. क्र. ९६२२—३५१८
विषय का वा

※

८

※

# चक्रवर्ती अशोक

सुमारें बावीसशें वर्षें झालीं. त्या वेळीं मगध देशावर बिंदुसार राजा राज्य करीत होता. त्या वेळच्या रिवाजाप्रमाणें त्याला अनेक राण्या होत्या. त्यांपासून त्याला तीन पुत्र झाले. मोठ्याचें नांव सुशीम, मधला अशोक आणि धाकटा वीतशोक.

ह्या तीन राजकुमारांत अशोक अगदीं कुरूप होता. त्यामुळें बिंदुसार राजाचा तो अगदीं नावडता होता. इतका कीं इतर राजपुत्रांशीं तो खेळूं लागला तर बिंदुसाराला फार राग येई! तथापि अशोक अति बुद्धिमान होता. नेहमीं हंसतमुख असून तो सर्वांशीं प्रेमानें वागे. त्यामुळें राजाचे प्रधान, सेनापति वगैरे लोकांचा त्याच्याकडे विशेष ओढा असे.

अशोक व सुशीम दोघेही वयांत आल्यावर राजा बिंदुसारानें त्यांना मोठ्या हुद्द्यावर नेमलें. पहिल्यानें त्यानें अशोकाला तक्षशिला म्हणजे हल्लीचा पंजाब ह्या प्रांतांत पाठविलें. त्या प्रांतांत राजाचा एक

अंमलदार होता. त्याच्या जुलमी वर्तनामुळें प्रजा कंटाळून गेली होती. शेवटी तेथील लोकांनीं बंड केलें. तें मोडण्यासाठीं अशोकाला धाडलें. अशोकाजवळ सैन्य थोडेंच होतें; पण तो डगमगला नाहीं. ' जे लोक राजनिष्ठ असतील त्यांस आपण शिक्षा करणार नाहीं, प्रजेच्या तक्रारी खऱ्या असतील तर आपण त्या दूर करूं ' अशा तऱ्हेचे संदेश प्रजेंत



पसरवून त्यानें आपणांविषयी प्रजेचें मत चांगलें बनविलें आणि त्यामुळें त्याला ती बंडाळी मोडतां आली. तेथील सर्व व्यवस्था नीट करून तो राजधानीस परत आला. त्याचा मोठा भाऊ सुशीम हा तेथेंच होता. कांहींतरी कारणानें त्याला दूर पाठवावें असें मुख्य प्रधान राधागुप्त ह्यानें ठरविलें; कारण त्याचें त्या राजपुत्राशीं बनत नसे. म्हणून ह्या प्रधानानेंच तक्षशिलेंत पुन्हा एकदां बंडाची चालना दिली आणि तिकडे अशोकाला न पाठवितां मुद्दामच राजपुत्र सुशीम ह्याला धाडिलें. त्याला तें बंड मुळींच मोडतां आलें नाहीं. इकडे राजा बिंदुसार आजारी पडला व थोड्याच दिवसांत मरण पावला. मुख्य मंत्री अशो-

अशोकाला अनुकूल होता. त्याच्या मदतीनें अशोक राजा झाला. अशोक स्वभावानें अति क्रूर होता. राज्यावर येतांच त्यानें झपाट्यानें सर्व बंधूंचा नाश केला.

अशोक राजा झाल्यानंतर आपलें राज्य वाढविण्याकडे त्याची दृष्टि वळली. कलिंग देश त्या वेळीं अत्यंत भरभराटींत होता. त्याचा पूर्वेकडील देशांशीं समुद्रमार्गानें व्यापार चाले. व्यापारामुळें तेथील लोक बरेच संपन्न झाले होते. असा हा संपन्न देश आपल्या अमलाखालीं असावा, असा लोभ त्याला सुटला. त्यानें ताबडतोब मोठ्या सैन्यानिशीं कलिंग देशावर स्वारी केली आणि राजाचा पराभव करून त्याला ठार मारलें ! नंतर तेथील लोकांचीं अति निर्दयपणें त्यानें कत्तल करविली ! सर्व कलिंग प्रांत उजाड झाला ! त्या वेळीं अनेक साधु, स्त्रिया, मुलें निष्कारण मारलीं गेलीं ! लाखों लोक प्राणांस मुकले ! विजयी होऊन अशोकानें या प्रांतांत प्रवेश केला, तेव्हां तो हत्याकांडाचा देखावा त्याच्या दृष्टीस पडला. त्यामुळें त्यालाही अत्यंत दुःख झालें. त्याला पश्चात्ताप झाला आणि त्यानें पुन्हा केव्हांच लढाई केली नाहीं.

अशोकाला पश्चात्ताप होण्याचें ह्याशिवाय दुसरेंही एक कारण सांगतात. तरुणपणीं अशोक राजा स्वभावानें क्रूर होता. जीवहत्या म्हणजे त्याला एक मौजेचा खेळ वाटे. आपल्या राज्यांतील गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठीं त्यानें एक कत्तलखाना बांधविला होता. त्यावरील अधिकारी पण एक अति क्रूर मनुष्य होता. त्या कत्तलखान्यांत इतक्या अमानुष शिक्षा दिल्या जात, कीं त्याला कोणी नरकस्थान असेंही म्हणत. रसरसलेल्या तेलाच्या कढईंत माणसाला टाकणें, तापून लाल झालेल्या लोहस्तंभाला माणसाकडून मिठी मारविणें ह्या व असल्या अनेक प्रकारच्या शिक्षा तेथें दिल्या जात ! तेथें एक दगडाचें जातें होतें, त्यांत अपराध्याला घालतांच त्याच्या हाडांचें पीठ होई. ह्या नरकगृहांत एकदां मनुष्य

गेला कीं तो बाहेर पडत नसे ! एकदां एक भिक्षु ह्या गृहाकडे चुकून गेला. तो अपराधी आहे कीं नाहीं, ह्याचा मुळींच विचार न करतां तेथील अधिकाऱ्यानें त्याला उचलून तापलेल्या तेलाच्या कढईंत टाकविलें ! पण काय आश्चर्य ! इतरांप्रमाणें तो साधु मरावा; पण तसें कांहीं न होतां तो कढईंतील तेलावर आनंदानें बसलेला दिसला ! त्याला बाहेर काढून पुन्हा विस्तवाचे खाईंत टाकलें. पण तेथेंही तोच प्रकार ! हें पाहतांच तो अधिकारी घाबरला. हां हां म्हणतां ही वार्ता सर्वत्र पसरली. स्वतः राजा अशोक तेथें गेला ! धगधगत्या खाईंत बसलेल्या भिक्षूला पाहून हा कोणी परमेश्वराचा अवतार आहे असें त्याला वाटलें व त्यानें तावडतोब त्याला बाहेर काढून नम्रपणानें वंदन केलें. भिक्षूनें राजाला आशीर्वाद देऊन उपदेश केला. आतां अशोक राजाला पूर्ण पश्चात्ताप होऊन त्यानें बौद्ध धर्माची दीक्षा घेतली आणि तें नरकगृह बंद करून त्यावरील दुष्ट अधिकाऱ्याला हद्दपार केलें !

ह्यानंतर अशोकाच्या वर्तनांत पराकाष्ठेचा फरक पडला. मांसाशन त्यानें सोडून दिलें. इतकेंच काय पण आपल्या राज्यांत कसल्याही जीवहत्येला त्यानें प्रतिबंध केला.

अशोकानें आपल्या प्रजेचें पालन फार चांगल्या रीतीनें केलें. प्रजेला सुख व्हावें, दुष्टांपासून तिचें रक्षण व्हावें, ह्यासाठीं त्यानें अति श्रम केलें. स्वतःला कोणीं भिऊं नये अशी त्याची इच्छा होती. म्हणून तो फार मायाळूपणें वागे. बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यानंतर त्या धर्माचा प्रसार करण्यासाठीं त्यानें शिलालेख लिहविले. मद्रास, डेहराडून, ओरिसा, पंजाब, काठेवाड, मुंबई ह्या सर्व प्रांतांत अजून ते शिलालेख उपलब्ध आहेत. त्या शिलालेखांवरून अशोकाच्या राज्याचा विस्तार फार मोठा होता आणि ग्रीस, मिसर वगैरे परदेशांतील राजे अशोकाचे मित्र होते असें दिसतें.

प्रजेला सुख व्हावें म्हणून त्यानें अनेक गोष्टी केल्या. राज्यांत प्रवास सुखाचा व्हावा म्हणून मोठमोठ्या सडका बांधून दोन्ही बाजूंना वटवृक्ष लाविले, आंबराया तयार केल्या, विहिरी खोदविल्या, धर्मशाळा बांधविल्या. अशा प्रकारें प्रजेच्या हिताचीं अनेक कामें त्यानें केलीं.

धर्मप्रसाराच्या बाबतींत त्यानें फार मोठी कामगिरी बजाविली. त्यानें राजकुमार महेंद्र ह्याला बौद्धधर्मप्रसारार्थ लंकेंत पाठविलें. पुत्राच्या मदतीसाठीं त्याच्याबरोबर भिक्षु दिले होते. शिवाय अशोकाचा नातू–मुलीचा मुलगा–सुमन हाही लंकेंत गेला. तेथील राजानें त्याचें स्वागत करून बौद्ध धर्म स्वीकारला. इतकेंच काय पण स्त्रियांतही ह्या धर्माचा प्रसार व्हावा म्हणून त्यानें अशोकाला विनंती करून त्याची कन्या संघमित्रा हिला बोलाविलें. त्यांनीं तिकडे बौद्ध धर्माचा प्रसार करण्यांत आपलें आयुष्य खर्च केलें.

धर्मासंबंधीं अनेक आज्ञा त्यानें शिलालेख लिहून लोकांपुढें ठेविल्या. ‘आईबापांची सेवा करावी, जीवहिंसा करूं नये, नोकरांशीं योग्य रीतीनें वागावें, भिक्षु आणि ब्राह्मण ह्यांना दान द्यावें हा धर्म होय. तसेंच खरें बोलावें, विद्यार्थ्यांनीं गुरूची सेवा करावी, सर्वांनीं गुण्यागोविंदानें राहावें, अशा रीतीनें राहिल्यास सर्व सुखी होऊन तेणेंकरून सर्व दीर्घायु होतील, हाच आपला खरा धर्म होय.’ अशा अनेक आज्ञा शिलास्तंभांवर लिहिलेल्या आढळतात.

तो स्वतः बौद्ध होता, बौद्ध धर्म प्रसाराचें कामही तो करीत होता; तरीपण इतर धर्मीयांशीं तो उदारपणें वागे. त्यानें कोणत्याही धर्मांतील लोकांचा छळ केला नाहीं.

राजा अशोकाला कुणाल नांवाचा एक मुलगा होता. राजाला फसवून त्याची तरुण राणी तिष्यरक्षिता हिनें आपल्या सावत्र मुलाबद्दल भलतीच कागाळी केली. त्या दुष्ट राणीनें राजमुद्रा हस्तगत केली आणि

तिचा उपयोग करून त्या राजपुत्राचे डोळे फोडविले. कुणाल अति सद्गुणी होता. तो गुप्तपणें भिकाऱ्याचा वेष घेऊन राजमहालाशीं येऊन गाणें गाऊं लागला. त्याचा आवाज अति गोड होता. तो आवाज कानीं पडतांच राजानें ओळखलें कीं, हा आवाज आपल्या मुलाचा. मग त्यानें गुप्तपणें चौकशी केली. तेव्हां त्याला राणीचा दुष्टपणा कळून आला. त्याला अतिशय राग आला. तो राणीचा वधच करणार होता, पण कुणालानें विनवणी करून राणीला क्षमा मिळवून दिली. त्याचा हा थोरपणा पाहून सर्व लोकांस कौतुक वाटलें.

अशोकानें १०० कोटि रुपये धर्मप्रसारार्थ खर्च करण्याचा बेत केला होता. त्या द्रव्यांतून त्यानें स्तूप, चैत्य, विहार बांधविले. आपल्या बेता-प्रमाणें त्यानें ऐशीं कोटि रुपये खर्च केले. पण पुढें त्याचे मंत्री त्याला तसें करूं देत ना. तोही पुढें आजारी पडला आणि त्याची इच्छा अपुरीच राहिली ! अशोक हा फार मोठा राजा होऊन गेला. त्याची माहिती देणारे शिलालेख आज पुष्कळ ठिकाणीं दिसतात.

* * *

※

१०

※

# शककर्ता शालिवाहन

महाराष्ट्रांत नवीन वर्ष-चैत्र शुद्ध प्रतिपदेला सुरू होतें. ह्या वर्षगणनेला शालिवाहन शक असें म्हणतात. वास्तविक ही वर्षगणाना कनिष्क राजानें सुरू केली, पण अजूनही कित्येक लोक ही वर्षगणना शालिवाहन राजांनीं सुरू केली आणि म्हणूनच हिला शालिवाहन शक असें नांव पडलें असें मानतात.

दक्षिण हिंदुस्थानांत सुमारें बावीसशें वर्षांपूर्वी आंध्रभृत्य राजे राज्य करीत होते. ते द्रविड वंशाचे होते. आंध्र घराण्याचें राज्य सुमारें पांचशें वर्षें चाललें होतें. त्या घराण्यांतील कांहीं राजे फार पराक्रमी होते. त्यांनीं मगध देशाचें राज्यही जिंकलें होतें. कोणी कोणी असें समजतात कीं शालि म्हणजे तांदूळ ह्या आंध्र राजांना फार आवडत म्हणून ते आपणांस शालिवाहन म्हणवूं लागले. कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं ह्या वंशांत शातकर्णी नांवाचा राजा झाला

त्यामुळें जिकडे तिकडे लहान लहान राज्यें निर्माण झालीं. वायव्य प्रांतांत तर लहान लहान तीन ग्रीक राज्यें होतीं. पण तीं फारशीं बलवान् नव्हतीं.



अशा वेळीं चीन देशांतून 'कुशान' जातीच्या पराक्रमी लोकांनीं वायव्य प्रांतावर हल्ला केला. ह्या वंशांत सम्राट् कनिष्क ह्या नांवाचा एक पराक्रमी राजा झाला. त्यानें इराण, अफगाणिस्तान हे प्रांत तर जिंकलेंच, शिवाय पूर्वेकडील प्रांत जिंकून चीनच्या राज्यांतील कांहीं भाग मिळविला. हा राजा मोठा महत्त्वाकांक्षी होता. त्यानें पुष्पपूर अथवा पुष्कलावती येथें आपली राजधानी केली. हें शहर आजचें पेशावर होय.

कुशान लोक पहिल्यानें कोणत्या धर्माचे होते कोण जाणे, पण कनिष्क राजानें बौद्ध धर्म स्वीकारला आणि त्या धर्माच्या प्रसारासाठीं अशोक राजाप्रमाणेंच फार महत्त्वाची कामगिरी केली. त्यानें बुद्ध भिक्षूंसाठीं मोठमोठे विहार बांधविले. बौद्ध धर्मांत कित्येक पंथ होऊन त्यांच्यांत कलह उत्पन्न झाला होता. तो नाहींसा करून त्या धर्मांतील सर्व लोकांची एकी करण्यासाठीं अनेक विद्वान् माणसांची सभा भरविली.

ह्या सभेला हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतून पांचशें प्रतिनिधि गेले होते. त्यांनीं वादविवाद करून बौद्ध धर्मांतील मुख्य तत्त्वें ' आज्ञा ' रूपानें तयार करून त्या ताम्रपटांवर खोदविल्या.

कनिष्कानें बुद्धधर्मीय अनेक पंडित आपल्या दरबारीं ठेवले होते. अश्वघोष नांवाचा एक कवि आणि नाटककार त्याच्या पदरीं होता. त्यानें एक नाटक लिहिलें. त्याचा विषय ' दोन साधूंनीं बुद्धधर्म कसा स्वीकारला ? ' हा आहे. बुद्धचरित्रावर त्यानें एक संस्कृत काव्यही रचिलें होतें. नागार्जुन नांवाचा दुसरा एक पंडितही कनिष्काच्या दरबारीं होता.

मंदिरें, पुतळे आणि विहार बांधण्याच्या बाबतींत कनिष्कानें खूपच कामगिरी केली. आपली राजधानी पेशावर येथें त्यानें खूप सुदर वाडे बांधविलें. बुद्धाचे पुतळे त्यानेंच तयार करविले. जातक कथांतील देखावे चित्ररूपानें तयार करून तीं चित्रें अनेक विहारांच्या भिंतींवर कोरून ठेवविलीं.

हिंदुस्थानाबाहेर तर त्याचें राज्य होतेंच, पण हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांतही माळवा व मगध हे दोन्ही प्रांत जिंकून ते त्यानें आपल्या राज्यास जोडिले. हळूंहळूं तो दक्षिणेकडे स्वाऱ्या करून आपलें राज्य वाढवूं लागला. शेवटीं त्यानें गुजराथ व महाराष्ट्र हे प्रांतही जिंकले. त्यानें आपल्या राज्यांत सोन्याचीं नाणीं पाडविलीं. त्यांवरील मजकूर इराणी भाषेंत, पण ग्रीक लिपींत लिहिला आहे.

ह्यानें चीन आणि रोम येथील बादशहांच्या दरबारांत आपले वकील ठेवले होते. ह्या दोन्ही देशांशीं त्याच्या राज्याचा व्यापार चालत असे. त्याच्या कारकीर्दींत देश समृद्ध होता आणि त्याची तिजोरी भरलेली होती. राजा कनिष्क ह्यांस इ. स. ७८ सालीं राज्याभिषेक

झाला व तो गादीवर बसला. त्या दिवसापासून 'शक' नांवाची वर्षगणना सुरू झाली. तीच आज आपल्या महाराष्ट्रांत चालू आहे.

ह्या पराक्रमी राजानें चाळीस वर्षें राज्य केलें. त्याच्या मृत्यूची हकीकत मोठी चमत्कारिक आहे. त्याची इच्छा, चारी दिशांना मुलूख जिंकून दिग्विजयी व्हावें अशी होती. म्हणून त्यानें आपल्या प्रधानाला फार मोठें सैन्य तयार करावयास सांगितलें. त्यांतलें कांहीं पश्चिमेला पाठविलें. त्यांनीं पश्चिमेकडील देश जिंकले नंतर त्यानें मोठें सैन्य पूर्वेकडे पाठविलें. त्यानेंही जय मिळविला. दक्षिणेकडे त्याचें कांहीं सैन्य गेलें, त्यानेंही मोठा पराक्रम गाजविला. अशा रीतीनें तिन्ही दिशांना जय मिळाल्यानें उत्तरेकडे मोठें सैन्य पाठवून राज्य मिळवावें अशी राजाला इच्छा झाली. पण ह्या वेळीं प्रधानांच्या मनांत दुष्ट बुद्धि उ पन्न झाली. राजाच्या आज्ञेप्रमाणें त्यानें मोठें सैन्य तयार केलें आणि तें उत्तरेकडे निघालेंही. सैनिकांनीं अनेक वर्षें लढाईचें काम चालविल्यामुळें त्यांना घरदार, नातेवाईक ह्यांना सोडून अनेक वर्षें दूर राहावें लागत असे. ह्या गोष्टीचा फायदा घेऊन त्यानें प्रजेच्या मनांत राजाविषयीं वितुष्ट उत्पन्न केलें. राजा राज्यलोभानें वेडा झाला आहे. त्याला प्रजेची किंमत नाहीं. हजारों सैनिक आजपर्यंत कामास आले हा त्याच्या लोभाचाच परिणाम! असें लोकांना सांगतांच लोक साहजिकच राजाच्या विरुद्ध झाले. ह्या सुमारास राजा आजारी पडला. तो एकटाच महालांत निजला आहे अशी संधि पाहून तो प्रधान राजमहालांत गेला. राजा अर्धवट झोपेंत होता. आजारीपणामुळें तो अगदीं अशक्त झाला होता हें पाहून त्या प्रधानानें त्याच्या अंगावरचें पांघरूण ओढलें आणि राजाचा गळा दाबून त्याचा जीव घेतला. अशा रीतीनें तो अशक्त झालेला शूर सम्राट् मरण पावला!

* * *

※

१

※

# महाराजा कनिष्क

आर्य लोक ज्या मार्गानें हिंदुस्थानांत आले त्याच मार्गानें आर्यांच्या मागून अनेक लोक हिंदुस्थानांत आले. पंजाबांत पराक्रमी राजा असला, कीं तो अशा लोकांना हिंदुस्थानांत येऊं देत नसे. पण दुर्बळ राजा दिसला कीं नाना जातींचे लोक टोळ्या करून हिंदुस्थानांत येत आणि येथेंच राज्य स्थापून राहात. अशा लोकांचा विशेष हा होता कीं ते पुढें हा देशच आपला समजत, येथील धर्माचा स्वीकार करीत आणि थोडक्याच काळांत येथील पूर्वींच्या लोकांत मिसळून जात.

तुम्हीं अशोकाची गोष्ट वाचली. तो मोठा पराक्रमी राजा होता. त्याच्या राज्याचा विस्तारही पूर्वपश्चिम मोठा होता. त्याच्या काळीं बाहेरच्या लोकांना हिंदुस्थानांत येणें शक्य झालें नाहीं; पण त्याच्यानंतर जे राजे गादीवर आले त्यांत कोणी पराक्रमी नव्हता.

व तो अति पराक्रमी होता म्हणून पुढील राजे ‘ शालिवाहन ’ ह्या नांवानें प्रसिद्धि पावले. त्या राजांची राजधानी नाशिक येथें होती.



ह्या आंध्रभृत्य अथवा शालिवाहन राजांमध्यें पुलुमायी नांवाचा एक महापराक्रमी राजा होऊन गेला. त्यानें शक लोकांचा अनेक ठिकाणीं पराभव करून त्यांचा मुलूख आपल्या राज्यास जोडला. एक लहानसें शक राज्य जुन्नर येथें होतें तेंही त्यानें जिंकलें. त्यानंतर त्यानें उज्जयिनीचा राजा रुद्रदामन ह्यावर स्वारी केली. हा रुद्रदामन शक वंशांतला होता. शक लोक हे हिंदुस्थानाबाहेरून येथें आले होते. अर्थात् त्यांना लोक परकी समजत. उज्जयिनीचें राज्य जिंकल्यामुळें राजा पुलुमायी ह्याची कीर्ति सर्वत्र पसरली. असें म्हणतात कीं ह्या राजानें ह्या आपल्या पराक्रमाच्या स्मरणार्थ नवी वर्ष-गणना सुरू केली आणि तिला ‘ शालिवाहन शक ’ असें नांव दिलें.

पुलुमायी राजाच्या कारकीर्दींत आपला देश समृद्ध होता. त्या काळीं

व्यापार फार चाले. भडोच बंदरांतून कापसाचा व्यापार फार मोठ्या प्रमाणांत चालत असे.

जलमार्गाचा उपयोग करून लोक इराण वगैरे परदेशाशींही व्यापार करीत. पैठण शहर हें दक्षिणेंतलें व्यापाराचें केंद्र मानलें होतें. व्यापारी अति श्रीमंत असून ते दानधर्मही बराच करीत. ह्या राजांच्या कारकीर्दींत धर्माच्या बाबतींत स्वातंत्र्य होतें. त्यामुळें बौद्ध आणि वैदिक अशा दोन्ही धर्मांची भरभराट होत होती. बौद्ध लोकांनीं ह्या काळांत बरींच लेणीं कोरविलीं. कार्लें येथें जीं लेणीं आढळतात तीं ह्याच काळचीं. ह्या लेण्यांत पुष्कळ शिलालेख आढळतात. त्यांवरून आपल्याला त्या वेळची माहिती मिळते.

पुलुमायी हा स्वतः विद्वान् होता. ग्रंथकार, कवि ह्यांना त्याचा मोठा आश्रय होता. विद्या शिकण्याकडे ह्यांचें लक्ष कसें लागलें ह्याविषयीं पुढील दंतकथा प्रचलित आहे. राजा आपल्या राणीसह जलक्रीडा करीत असतां ह्यानें तिच्या अंगावर पाणी उडविलें. जलविहारानें ती दमली होती म्हणून मोदकेन मां सिंचय असें ती म्हणाली. त्याचा अर्थ " मा उदकेन मां सिंचय " माझ्यावर पाणी उडवूं नको असा होता. राजाला वाटलें कीं मोदकेन ह्यावरून मोदक मजवर फेक असें ती म्हणत आहे. त्यानें मोदक आणून तिच्यावर फेकण्यास सुरवात केली. राजाचें हें अज्ञान पाहून ती हंसली. राजा खजिल झाला. पुढें शिकून तो उत्तम विद्वान् झाला.

पुलुमायी राजाविषयीं दुसरी एक दंतकथा प्रसिद्ध आहे ती अशी—

" उज्जयिनी येथील शक वंशांतील राजा रुद्रदामन ह्याच्या दरबारांत एक ज्योतिषी आला. त्यानें त्या राजाला सांगितलें कीं ' एका कुंभाराच्या घरीं एक मुलगा आहे. तो पुढें राजा होऊन तुझ्या जिवास धोका आणील ! ' हें भविष्य ऐकतांच रुद्रदामन राजानें अशा मुलाचा

फार बारकाईनें शोध चालविला. त्याच्या गुप्त हेरांनीं अशी बातमी आणिली कीं पैठण शहरांत कुंभाराच्या घरीं एक ब्राह्मण बाई राहात असून तिला एक मुलगा आहे. त्याच्या हातावर राजचिन्हें असल्यामुळें हा पुढें राजा होणार असा सर्वांचा समज आहे ! हें कळतांच त्या मुलास लहान वयांतच मारून टाकावें असा बेत करून थोडेंसें सैन्य घेऊन राजानें गुप्तपणानें त्यावर स्वारी केली. शालिवाहन पुलुमायी हा त्या वेळीं लहान मुलगा होता. त्यानें मातीचे घोडे, रथ, हत्ती व शिपाई केले. असें सांगतात कीं, हें मातीचें सैन्य पुलुमायीनें आज्ञा करतांच रुद्रदामन राजावर चाल करून गेलें ! उभय सैन्यांत मोठी लढाई झाली आणि तींत पुलुमायी यशस्वी झाला आणि रुद्रदामन मारला गेला ! कदाचित् असेंही असेल कीं, पुलुमायी कुंभाराकडे राहात होता त्यामुळें त्यानें कुंभार लोकांचेंच सैन्य जमवून त्या राजाचा पराभव केला.

शालिवाहन शक इ. स. ७८ व्या वर्षी सुरू झाला.

* * *

※

११

※

# विक्रमादित्य अथवा
# दुसरा चंद्रगुप्त

बौद्ध धर्माची स्थापना झाल्यावर त्याचा प्रसारही पुष्कळ झाला. अनेक मोठमोठ्या राजांनीं तो धर्म 'स्वीकारल्यामुळें त्याला मोठें पाठबळ मिळालें. त्यामुळें वैदिक धर्म हळूहळू मागें पडत चालला. अशी स्थिति असतां सुमारें सोळाशें वर्षांपूर्वीं पाटलिपुत्र नगरांत गुप्त वंशाचे राजे उदयास आले. ह्या राजांत समुद्रगुप्त हा मोठा पराक्रमी राजा झाला. त्यानें आपल्या राज्याची खूप वाढ केली. समुद्रगुप्ताचा मुलगा चंद्रगुप्त ( दुसरा ) हा विशेष प्रसिद्ध आहे.

त्या वेळीं उज्जयिनी येथें शक वंशाचे राजे राज्य करीत होते. कालांतरानें ते जुलूम करूं लागले. त्या वेळीं चंद्रगुप्त राजानें उज्जयिनीवर स्वारी केली आणि तेथल्या राजाशीं मोठ्या शौर्यानें लढून विजय संपादन केला आणि लौकरच त्यानें उज्जयिनी शहरीं आपली राजधानी आणिली. उज्जयिनीच्या राजाला जिंकल्यामुळे

त्याच्या ताब्यांतले माळवा व गुजराथ हे प्रांतही चंद्रगुप्ताला मिळाले. त्यामुळें त्याचें राज्य खूपच वाढलें आणि भरतखंडांत सगळीकडे त्याची कीर्ति पसरली. उज्जयिनीचें राज्य जिंकलें ह्या पराक्रमाच्या स्मरणार्थ त्यानें विक्रमादित्य असें नवें नांव धारण केलें आणि ह्याच नांवानें लोकांत तो प्रसिद्ध आहे. विक्रमाविषयीं अनेक दंतकथा सांगितल्या जातात, त्यावरून एवढी गोष्ट सिद्ध होते कीं तो पराक्रमी तर होताच पण शिवाय विद्वानांचा तो मोठा पुरस्कर्ता होता. त्याच्या दरबारीं अनेक विद्वान् माणसांना आश्रय मिळाला होता. असें सांगतात कीं



त्याच्या दरबारीं कालिदास वगैरे नऊ पंडित राहात होते. ते नवरत्नें म्हणून ओळखले जात. ह्याशिवाय इतर कवि, लेखक आणि पंडित ह्यांनाही मदत करावयास तो नेहमीं तयार असे. त्याच्या दरबारीं येऊन कोणीही विन्मुख होत नसे.

विक्रमादित्य अशी पदवी घेतल्यानंतर त्यानें 'विक्रम संवत्' चालू केला. त्याचें वर्ष कार्तिक शुद्ध प्रतिपदेस चालू होतें. त्यापुर्वी माळव्यांत

' मालव संवत् ' नांवाची वर्षगणना चालू होती. ती त्यानें बंद केली. विक्रमादित्य स्वतः वैदिक धर्माचा असून विष्णुभक्त होता. त्याला वैदिक धर्माचा अभिमान होता तरी त्यानें जैन अगर बौद्धधर्मी लोकांना कोणताही त्रास न देतां सर्व लोकांना आपआपल्या धर्माप्रमाणें वागण्याची पूर्ण परवानगी दिली होती.

विक्रमादित्य आपल्या प्रजेवर स्वतःच्या मुलाप्रमाणें प्रेम करी. लोकांना सुख व्हावें म्हणून त्यानें प्रजाहिताचीं अनेक कामें केलीं. आपली प्रजा श्रीमंत आणि सद्गुणी बनावी ह्यासाठीं त्यानें कसून प्रयत्न केले. प्रजेचें दारिद्र्य दूर व्हावें आणि दरिद्री लोकांना मदत मिळावी म्हणून तो आपल्या प्रधानांजवळ द्रव्य देऊन त्यांना सर्व राज्यांत ठिकठिकाणीं धाडीत असे. त्या वेळीं कोणत्याही ठिकाणीं दरिद्री मनुष्य भेटला तर त्याला द्रव्य द्यावयाचें, देवळें, धर्मशाळा पडीत असल्या तर त्यांचा जीर्णोद्धार करावयाचा अशी आज्ञा तो प्रधानांस देई. राजधानींत श्रीमंत लोकांच्या देणग्यांवर चालविलेलें एक रुग्णालय ( हॉस्पिटल ) होतें. त्यांत गरीब रोग्यांची सोय करण्यांत येई. देशांत सुबत्ता असल्यामुळें चोऱ्या, मारामाऱ्या वगैरे क्वचितच होत असत. ह्या राजाची न्यायदानाबद्दल विशेष प्रसिद्धि होती. त्याला शिकारीचा अतिशय नाद होता. त्याच्या काळचीं कांहीं नाणीं आज उपलब्ध झालीं आहेत. त्यांवर विक्रमाचें चित्र असून त्यांत तो सिंहाशीं लढत आहे असें दाखविलें आहे.

आपल्या राज्यांतील प्रजा सुखी आहे कीं नाहीं, तिला कोणतीं दुःखें आहेत, आपले अधिकारी आपलीं कामें बरोबर करतात कीं नाहीं, लोक कर्तव्यतत्पर आहेत कीं कसें हें समजण्यासाठीं तो गुप्तपणानें राज्यांत फिरे. ह्याविषयीं अनेक गोष्टी सांगतात त्यापैकीं एक अशी आहे—

एका रात्रीं तो राजधानींत वेष पालटून फिरत असतां एका घरापाशीं

आला. आंत थोडी कुजबूज ऐकूं आली म्हणून त्यानें हळूच आंत डोकावून पाहिलें. तों आंत एक तरुण मनुष्य आणि एक वृद्ध स्त्री आपसांत बोलत होतीं. त्यांच्या बोलण्यावरून त्याला असें समजलें कीं तीं दोघें विष पिऊन आत्महत्या करण्याच्या विचारांत आहेत. लागलीच त्यानें गृहांत प्रवेश करून त्यांना त्यांची हकीकत विचारिली. तो तरुण मनुष्य म्हणाला, "कांहीं दिवसांपूर्वीं आम्ही श्रीमंत होतों. माझा बाप थोड्याच दिवसांपूर्वीं वारला आणि दुर्दैवानें आमची संपत्ति एकाएकीं नष्ट झाली. मी श्रीमान् असतां दुसऱ्या एका श्रीमंत मनुष्यानें आपली मुलगी मला देण्याचें ठरविलें होतें. पण आतां मी गरीब झालों म्हणून तो मुलगी देत नाहीं. हा अपमान सहन करणें कठीण म्हणून मी आत्महत्या करीत होतों आणि एकुलता एक पुत्र मृत होऊन मग कशासाठीं जगावें म्हणून ही माझी आई पण आत्महत्या करावयास तयार झाली आहे."

हें ऐकून विक्रम राजानें त्या तरुणाला आश्वासन दिलें कीं, 'उद्यां मी तुझी व्यवस्था करतों.' नंतर दुसरे दिवशीं त्यानें त्या श्रीमंत मनुष्याला बोलावून आणिलें आणि दिलेल्या वचनाप्रमाणें त्याला आपली मुलगी त्या तरुणाला द्यावयास लाविलें. त्या तरुणालाही थोडें धन देऊन धंद्यास लाविलें.

तो अत्यंत न्यायप्रिय होता. इतका कीं तो ज्या सिंहासनावर बसून न्याय देई त्या सिंहासनालाच पवित्रपणा आला होता. ह्याविषयीं एक दंतकथा प्रचलित आहे.

ह्या राजानंतर त्याचें तें सिंहासन जमिनींत पुरलें गेलें. त्या जागेवर अरण्यच माजलें होतें. जवळपास गुराख्यांचीं मुलें खेळत असत. त्यांपैकीं एक मुलगा एकदां सिंहासन पुरलें होतें त्यावर नेमका उभा राहिला. तत्काळ त्यानें गांवांत चाललेल्या एका तंट्याचा निकाल सांगितला. ही हकीकत सर्वत्र पसरली तेव्हां लोकांनीं प्रचीति पाहिली.

जो कोणी त्या जागेवर नेमका उभा राही त्याला गांवांतले तंटे अगदीं योग्य रीतीनें तोडतां येत. होतां होतां ही वार्ता त्या देशाच्या राजाला समजली. त्यानें त्या जागीं खोल खणवून पाहिलें तों जमिनींत गाडलेलें एक सोन्याचें सिंहासन त्याला सांपडलें. तें सिंहासन बारा सिंहांच्या डोक्यांवर ठेविलें होत. ते सिंहही सोन्याचेच केले होते. तें सिंहासन पाहून राजाला त्यावर बसण्याची उत्कंठा लागली तो पुढें सरून सिंहासनावर पाय ठेवणार तोंच ते सिंह म्हणाले, 'राजा, न्यायप्रिय आणि शुद्धांतःकरण अशा विक्रमादित्याचें हें सिंहासन आहे; तुझें अंतःकरण त्याच्याप्रमाणेंच शुद्ध असेल तर ह्या सिंहासनावर खुशाल बैस; पण जर तें शुद्ध नसेल तर तुझा तात्काळ नाश होईल.' हें ऐकतांच त्या राजानें आपला पाय मागें घेतला!

* * *

※

१२

※

# क वि गु णा ढ्य

दक्षिणापथ म्हणजे महाराष्ट्र देशांत प्रतिष्ठान नांवाचें एक शहर आहे. त्या शहरीं सातवाहन नांवाचा राजा राज्य करीत होता. एकदां तो आपल्या राण्यांसह उद्यानांत विहार करीत असतां उद्यानांतील तलावांत जलक्रीडा करण्याची त्यास लहर आली. आपल्या राण्यांसह तो तलावांत उतरला. जलक्रीडा करतां करतां त्यांनीं एकमेकांच्या अंगावर पाणी उडविण्यास सुरवात केली. राजानें इतक्या जोर जोरानें पाणी उडविलें कीं, त्यात साऱ्या राण्या अगदीं श्रांत झाल्या. त्यांत एक राणी अगदीं कोमलांगी होती. तिला तो पाण्याचा मारा सहन होईना कीं तिला पळूनही जातां येईना.

ती अगदीं नम्रपणानें राजाला म्हणाली, ' महाराज, कृपा करा. मी हात जोडतें. माझ्यावर पाणी उडवू नका ती संस्कृत भाषेंत बोलत होती.

'मोदकैः ( मा उदकैः ) ताड्यताम्' असें ती म्हणाली. राजाला संस्कृत भाषेचें ज्ञान नसल्यानें त्याला वाटलें कीं, मोदकैः ताड्यताम् म्हणजे माझ्या अंगावर मोदक फेका असें ही म्हणत आहे. त्यानें नोकराला पाठवून मोदक म्हणजे लाडू आणविले आणि राणीच्या अंगावर लाडू फेकण्यास सुरुवात केली, तेव्हां ती म्हणाली, 'महाराज मोदकैः म्हणजे मा उदकैः' असें मी म्हणालें. माझ्यावर पाण्याचा मारा करूं नका अशी मी आपल्याला विनंती केली. एवढाही अर्थ आपणांस कळला नाहीं ना? मोदकैः म्हणजे लाडूंनीं असें आपल्या मनांत तरी कसें आलें? या ठिकाणीं लाडूंचा संबंधच काय? त्या ठिकाणीं लाडू आणलेला नोकरही होता. राणीच्या बोलण्यानें तोही हंसला!



राजाला फार फार वाईट वाटलें! आपल्या अज्ञानानें आपली फजीति झाली. राणीनें आपल्याला हिणविलें. नोकरही आपणांला हंसला. धिक्कार असो आपल्या अज्ञानीपणाला! अशा विचारानें खिन्न होऊन जलक्रीडा

संपवून राजा कोणाशींही न बोलतां राजवाड्यांत निघून गेला, आणि एकटाच आपल्या मंदिरांत उदासपणें बसून राहिला. तो कोणाशीं बोलेना, कोणाची भेट घेईना कीं कोणाला भेटेना. राजाला एकाएकीं काय झालें हें कोणालाच कळेना. त्यामुळें त्याचे सारे अमात्य मोठ्या चिंतेंत पडले !

राजाचे शर्ववर्मा आणि गुणाढ्य असे दोन मुख्यमंत्री होते. त्यांना राणीकडून झालेली हकीकत कळली. मोठ्या धिटाईनें ते राजाच्या महालांत गेले आणि नम्रपणानें त्यांनीं राजाला त्याच्या उदासीनतेचें कारण विचारलें. थोड्या वेळानें मौन सोडून तो म्हणाला, ' माझ्यासारख्या बुद्धिमंद माणसाला किती दिवसांत संस्कृत भाषेचें शिक्षण घेतां येईल ? ' गुणाढ्य म्हणाला, " महाराज, भाषा-शिक्षणांत मुख्य स्थान व्याकरणाला. तें शिकण्याला कमींत कमी बारा वर्षें तरी लागतात ! तरी पण आपणांला मी सहा वर्षांत संपूर्ण व्याकरण शिकवूं शकेन. "

शर्ववर्मा जवळच होता. राजाला खुश करण्यास ही संधि चांगली आहे असें पाहून तो म्हणाला, ' महाराज, सहा वर्षें हो कशाला पाहिजेत ! मी आपणांला केवळ सहा महिन्यांतच मोठा भाषापंडित करून सोडीन !

ही असंभाव्य गोष्ट ऐकून गुणाढ्याला राग आला. तो रागानें म्हणाला, ' जर ही असंभाव्य गोष्ट तूं करून दाखविलीस तर मी संस्कृत वा प्राकृत या दोन्ही भाषा बोलण्याचें सोडून देईन. ' शर्ववर्माही हट्टासच पेटला होता. तो म्हणाला, ' जर मी असें करूं शकलों नाहीं, तर मी बारा वर्षें तुझ्या पादुका आपल्या डोक्यावर धारण करीन ! '

एवढें बोलणें झाल्यावर दोघेही आपापल्या घरीं गेले. शर्ववर्मा घरी गेल्यावर आपली ही दुस्तर प्रतिज्ञा कशी पुरी करावी या विचारानें चिंताग्रस्त झाला. त्याचा उदासवाणा चेहरा पाहून त्याच्या पत्नीनें कारण विचारलें. शर्ववर्म्यानें राजमंदिरांत घडलेली सर्व हकीकत तिल

सांगितली. ती म्हणाली, "या संकटांतून पार पडण्याचा एकच उपाय आहे. तुम्ही कार्तिकेयाला शरण जा, त्याची आराधना करा, त्याच्या मूर्तीपुढें धरणें धरून बसा म्हणजे तोच तुमच्या अंगी असें सामर्थ्य आणील. त्याच्या योगानें तुम्ही राजाला सहा महिन्यांत पंडित करूं शकाल."

पत्नीचा हा सल्ला शर्ववर्म्याला पटला आणि तो कार्तिकेयाची आराधना करावयास निघून गेला. कार्तिकेयाच्या मूर्तीपुढें आसन घालून तो बसला. निराहार राहून त्यानें उग्र तपश्चर्या आरंभिली. ही सारी हकीकत गुणाढयानें राजाच्या कानावर घातली. शर्ववर्म्यानें केलेली प्रतिज्ञा कशी असंभाव्य आहे हें राजाला पटावें असा त्याचा हेतु होता.

थोडयाच दिवसांत शर्ववर्म्याच्या तपश्चर्येनें श्रीकार्तिकेय प्रसन्न झाले, आणि त्यांनीं शर्ववर्म्याला अभीष्ट असें वरदानही दिलें. लवकरच तो परत प्रतिष्ठान नगरींत आला आणि त्यानें राजाला संस्कृत व्याकरण शिकविण्याला सुरुवात केली. अन् काय चमत्कार ! राजानें सारें संस्कृत व्याकरण हां हां म्हणतां आत्मसात् केलें. शर्ववर्म्यानें आपली प्रतिज्ञा पूर्ण केली हें पाहून गुणाढयही राज्य सोडून विंध्य पर्वतावरील अरण्यांत निघून गेला. त्याने प्रतिज्ञेप्रमाणें संस्कृत वा प्राकृत भाषेंत बोलणें व लिहिणें सोडून दिलें. त्याच्याबरोबर त्याचें दोन शिष्यही गेले.

आपल्या पराभवामुळें जीवनाला विटलेला गुणाढय मनांत विचार करूं लागला, "मी मानवी भाषेचा त्याग केलाच आहें, मानवी संसर्ग सोडून या अरण्यांत मी येऊन राहिलों. या ठिकाणीं विंध्यवासिनी भगवती देवीच माझें रक्षण करो ! याशिवाय मला कोणाचा आधार आहे ?" त्यानें निराहार राहून उग्र तपश्चर्येला सुरुवात केली. बरेच्च दिवस झाले. दिवसेंदिवस त्याचें शरीर जास्त जास्तच क्षीण होत गेलें तरीही त्यानें तपश्चर्या सोडली नाहीं.

त्याच्या तपश्चर्येनें आणि भक्तीनें विंध्यवासिनी प्रसन्न झाली. एके दिवशीं त्याच्यापुढें प्रकट होऊन देवी म्हणाली, " भक्तवरा, आपल्या दृढभक्तीनें आणि खडतर तपश्चर्येनें तूं मला संतुष्ट केलें आहेस. तुझी इच्छा काय आहे तें मी जाणतें. पूर्वी तूं कोण होतास याचें स्मरण तुला नाहीं. तें मी पहिल्यानें तुला सांगतें. तूं गतजन्मी श्रीशंकराच्या गणांपैकीं एक होतास. श्रीशंकर-पार्वती एकान्तांत असतां तूं त्या ठिकाणीं गुप्तपणें राहिलास आणि शंकरानें पार्वतीला सांगितलेल्या दिव्य कथा तूं चोरून ऐकल्यास; पण तुझी ही लबाडी देवीनें ओळखली. तिनें शाप दिल्यामुळेंच तूं या मर्त्यलोकीं जन्माला आलास ! चोरून ऐकलेल्या त्या कथा तूं लोकांच्या मनोरंजनासाठीं लिहून काढ. त्या वाचून रसिकांना परमानंद होईल. आणि एवढें तूं केलेंस कीं माझ्या प्रसादानें तूं शापमुक्त होऊन पुन्हा शिवगण होऊन शिवलोकांत राहावयास जाशील. " इतकें बोलून विंध्यवासिनी देवी गुप्त झाली.

देवीच्या कृपेनें आणि आशीर्वादानें आपल्याला गतजन्माचें स्मरण झालें यामुळें गुणाढ्याला फार आनंद झाला. शिवमुखांतून ऐकलेल्या दिव्यकथाही त्याला आतां स्फुरूं लागल्या. त्या आपण लिहावयाच्या असेंही त्यानें ठरविलें. पण त्या कोणत्या भाषेंत लिहाव्या हेंच त्याला कळेना. संस्कृत आणि प्राकृत भाषा तर आपण वर्ज्य केल्या अशी त्यानें प्रतिज्ञा केली होती. बरें लिहावयाचें कशानें आणि कशावर हाही विचार होता !

शेवटीं विंध्यपर्वतांतील पक्षी, पशु अन् जंगली लोक यांत तो मिसळला. त्यांची भाषा ऐकून त्यानें आत्मसात् केली. आणि त्या पैशाची भाषेंत त्यानें श्लोकरचना करावयास सुरुवात केली, लिहिण्यासाठीं त्यानें भूर्जपत्रें मिळविलीं. शेवटी शाईवांचून अडूं नये म्हणून अंगच्या रक्तानें लिहावयाचें असें ठरविलें. त्यानें या कामीं सात वर्षें खर्च केलीं आणि

सात लक्ष श्लोक रचून ते लिहून काढले. आतां हे श्लोक कोणा रसिकाला दाखवावे याचा तो विचार करूं लागला.

त्याच्या दोन्ही शिष्यांनीं सुचविलें कीं, "आम्ही हे ग्रंथ घेऊन सातवाहनाकडेच जातों. तो राजा विद्वानांचा पुरस्कर्ता आहे. आपल्या या कृतीचें कौतुक करून आपल्याला योग्य पारितोषिक दिल्यावांचून राहणार नाहीं!" गुणाढयानें 'ठीक आहे' म्हणून शिष्यांना तसें करण्यास अनुज्ञा दिली.

शिष्य राजाकडे गेले आणि त्यांनीं तीं भूर्जपत्रें राजापुढें ठेवून त्याला सर्व हकीकत विदित केली. पण आपणांस सहा महिन्यात सर्व विद्या आली या गोष्टीचा त्याला फार गर्व झाला होता. गुणाढय तर ही विद्या येण्यास सहा वर्षें लागतील असें म्हणत होता. तो रागही राजाच्या मनांत होताच. राजानें तिरस्कारपूर्वक त्या ग्रंथाची हेटाळणी करीत म्हटलें, "छे, छे, ह्या भूर्जपत्रांना मी स्पर्शही करूं शकत नाहीं. हा ग्रंथ अपवित्र अशा पैशाची भाषेंत रचिला आणि रक्तांत लिहिला आहे. अशा या अपवित्र ग्रंथाची किंमत ती काय असणार! जा! हा ग्रंथ घेऊन निघून जा!"

ग्रंथ न वाचतांच त्याला दूषण देणाऱ्या राजाची त्यांना कींव आली आणि रागही आला. तो ग्रंथ त्यांनीं उचलला आणि मोठ्या निराशेनें ते गुणाढयाच्या निवासस्थानीं गेले! झालेली सर्व हकीकत त्यांनीं गुणाढयाला सांगितली! ती ऐकून तो अत्यंत कष्टी झाला! राजा विद्वान् झाला असून तो विद्वत्तेची कदर करूं इच्छित नाहीं असा विचार करून तो म्हणाला, 'छे! छे! ही आपलीच चूक! ह्या कथा दिव्यलोकच्या आहेत! दिव्य परमेश्वराच्या मुखांतूनच मी ऐकिल्या! दिव्य श्रोत्यानांच त्या आवडावयाच्या. त्या दिव्य लोकीं पाठवून देणेंच योग्य!'

असें म्हणून त्यानें मोठा होम तयार केला आणि आपल्या ग्रंथांतील

एकेक पान घेऊन तें तो मोठ्यानें वाचूं लागला. वाचून झाल्यावर तो तेंच पान अग्नये स्वाहा म्हणत पुढें पेटविलेल्या होमांत टाकी. अशा रीतीनें त्यानें त्या ग्रंथाची विल्हेवाट लावण्यास सुरुवात केली. त्याचें वाचन चालू होतांच त्याचें तें काव्य अरण्यांतील पशुपक्ष्यांच्या कानीं पडलें. त्यांच्याच भाषेंत तें लिहिलें असल्यानें त्यांना त्याचा गोड आणि दिव्य अर्थ कळला. त्यांचे मन इतकें आकृष्ट झालें कीं, पशुपक्षी यांनींही आहार विहार सोडून दिला आणि ते त्या जागींच काव्य ऐकत बसून राहिले !

आहार सोडल्यामुळें त्या अरण्यांतील पशु-पक्षी अगदीं कृश झाले ! गुणाढ्याला आपलाच ग्रंथ आपण अग्नींत टाकीत आहों याचें अत्यंत दुःख झालें आणि त्याचे डोळे पाण्यानें भरून आले !

पशु-पक्षी कृश झाल्यानें त्याची झळ राजालाही लागली. त्याला भोजनासाठीं मिळणारें मांस अगदीं शुष्क व नीरस मिळूं लागलें. त्यानें मांस पुरविणाऱ्या पारध्यांना बोलावून याचें कारण विचारलें. ते म्हणालें, "आम्ही काय करणार ? अरण्यांत कोणी एक पंडित पशु-पक्ष्यांच्या भाषेंत लिहिलेलें काव्य वाचीत आहे. त्याच्या त्या काव्यानें आकर्षित होऊन सारे पशु-पक्षी त्याच्याभोंवतीं जमा झाले आहेत. आहाराचाही त्यांनीं त्याग केल्यामुळें ते सारे अत्यंत कृश झाले आहेत. त्यामुळें आपणांला हें कृश पशूंचें शुष्क मांसच मिळत आहे। यांत आमचा कांहींही दोष नाहीं."

ही वार्ता ऐकून हा महापुरुष कोण आहे तें पाहावें असा विचार करून राजा स्वतःच अरण्यांत गेला. त्या ठिकाणीं त्याला काय आढळलें ? डोक्यावर जटाभार धारण केलेला, श्मश्रू वाढलेला प्रधान गुणाढ्यच एका मोठ्या होमाशीं बसून एक एक पानावरील काव्य गात आहे ! त्याचे डोळे अश्रूंनीं डबडबले आहेत आणि पानावरील काव्य गाऊन झाल्यावर तो तें पान "अग्नये स्वाहा" करीत आहे !

हें पाहून राजा चटकन् पुढें झाला आणि त्यानें ग्रंथ जाळूं नका अशी विनवणी करून ग्रंथाचा नाश थांबविला व म्हटलें "महापुरुषा, हें आपण काय चालविलें आहे? ग्रंथरचनेचे आपलेच श्रम अशा रीतीनें आपण कां वायां घालवीत आहां?"

गुणाढयानें सारी हकीकत त्याला निवेदन करून म्हटलें, "या प्रसंगीं याहून दुसरें मी काय करणार?" त्याची ती हकीकत ऐकून आपल्या वर्तनाचा राजाला पश्चात्ताप झाला. त्यानें गुणाढयाजवळ क्षमायाचना केली! आणि अग्नींत न पडलेला अवशिष्ट ग्रंथ त्याच्या जवळून मागून घेतला. मोठ्या आदरानें त्यानें तो राजधानीला नेला. त्या ठिकाणीं त्यानें पंडितांच्या साहाय्यानें त्या ग्रंथांतील कथांचा प्रसार होण्यासाठीं बृहत्कथासागर या नांवाचा ग्रंथ तयार केला. त्यांतील कथा अत्यंत लोकप्रियही झाल्या!

विंध्यवासिनी देवीच्या वराप्रमाणें गुणाढयानें कथालेखनाची कामगिरी पुरी केली. तो शापमुक्त झाला आणि श्रीशंकरांच्या कैलासांत पुन्हा त्यांचा गण होऊन तेथें जाऊन राहिला.

गुणाढयानें एक एक लक्ष श्लोकांचें एक अशीं सात पुस्तकें तयार केलीं होतीं. पण त्यांपैकीं सहा पुस्तकें त्याच्याच हातून अग्नये स्वाहा झालीं. फक्त एक लक्ष श्लोकांचें एकच पुस्तक मागें राहिलें. त्यावरून कथासरित्सागर आणि बृहत्कथामंजिरी या दोन ग्रंथांची संस्कृतांत रचना झाली. तेच ग्रंथ आज उपलब्ध आहेत. हा कवि चौथ्या शतकांत होऊन गेला असें मानतात.

* * *

*

१३

*

## पराक्रमी स्कंदगुप्त

आशियांतील मध्य भाग हें एक प्रचंड वाळवंट आहे. या भागांत राहणाऱ्या टोळ्यांतील लोक अगदीं रानटी आहेत. त्यांना हूण, शक अशीं नांवें आहेत. पांचव्या शतकाच्या सुमारास जे लोक येथें राहात होते ते मोठे शूर लढवय्ये असून स्वभावानें अगदीं क्रूर होते. या लोकांनीं आपल्या आक्रमणांनीं आणि स्वाऱ्यांनीं युरोपांतील अनेक देश अनेक वेळां उजाड करून सोडले ! गावांवर हल्ले करावे, धन-धान्याची लूट करावी. तेथील रहिवाशांची कत्तल करावी आणि शेवटीं गांवाला आग लावून लुटालूट करून मिळालेली संपत्ति घेऊन निघून जावें हा त्यांचा नित्याचा कार्यक्रमच होता.

याच लोकांनीं आपल्या स्वाऱ्यांनीं प्रसिद्ध रोमन साम्राज्य नष्ट केलें. तेथील संपत्ति, मोठमोठ्या इमारती सारें सारें यांनींच नेस्तनाबूद केलें. चीन

देशावरही यांनीं अनेक वेळां स्वाऱ्या करून तो देश लुटून फस्त केला. मोठी सेना घेऊनच हे हल्ला करीत आणि ज्या देशांवर हल्ला करीत



तेथें मोठा हाहाःकार माजवीत. द्रव्यहानि तर होतच होती पण जीवित-हानीही अपरंपार होई.

पांचव्या शतकांत भारतांत मगधाचे राजे हेच सम्राट् गणले जात. त्या काळीं गुप्त घराण्याचे राजे राज्य करीत होते. आपल्या पराक्रमानें त्यांनीं आजूबाजूचे देश जिंकून आपलें राज्य खूप वाढविलें होतें.

राजा कुमारगुप्त राज्य करीत असतां एक भयंकर वार्ता त्याच्या कानीं आली. हूण लोकांनीं खूप मोठें सैन्य जमा केलें असून हिमालय ओलांडून भारतावर स्वारी करावी असे त्यांचे बेत चालू आहेत. सम्राट् कुमारगुप्त या स्वारीला तोंड कसें द्यावें याचा आपल्या मंत्र्यांशीं विचारविनिमय

करीत होता. राणी अनंतदेवीपासून त्याला एक पुत्ररत्न लाभलें होतें. त्यानें अद्याप तारुण्यांतही पुरतें पाऊल टाकलें नव्हतें.

हूण लोकांची स्वारी आपल्या राज्यावर होणार ही वार्ता त्याला कळली मात्र तो स्वतःच आपल्या पित्याकडे गेला व पित्याला म्हणाला, 'पिताजी मीही आपणांबरोबर रणांगणावर येणार ! मला प्रतिबंध करूं नका. मला माझ्या शौर्याची आणि पराक्रमाची परीक्षा घेऊं द्या.'

महाराज कुमारगुप्त म्हणाले, 'स्कंदगुप्त, तूं अजून फार लहान आहेस. हूण लोक अत्यंत दुष्ट आणि निर्दय आहेत. ते कसलेही नियम पाळीत नाहींत. विश्वासघात, कपट कोणत्याही गोष्टीचा त्यांना विधिनिषेध नाहीं ! त्यांचें सैन्यही अफाट आहे. त्यांच्याशीं लढणें म्हणजे क्रूर यमराजाशीं लढणें होय. या तुझ्या कोंवळ्या वयांत मी तुला कशी बरें परवानगी देऊं !'

"पिताजी, आपला देश किंवा धर्म संकटांत सांपडला असतां त्याच्या रक्षणासाठीं लढणें हें क्षत्रियांचें कर्तव्यकर्म नाहीं का ? अशा तऱ्हेनें लढत असतां मरण येणें हें मोठें भाग्य आहे असें आपण समजत नाहीं का ? मी आपणांस अशी ग्वाही देतों कीं, या लुटारूंपासून आपण आपला देश खात्रीनें बचावूं !"

हें या छोट्या वीराचें बोलणें महाराजांना फार फार आवडलें. त्यांनीं त्याला हृदयाशीं धरून घट्ट मिठी मारली. त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागले. राजानें स्कंदगुप्ताला लढाईवर जाण्याची परवानगी दिली, स्वतः सम्राट्ही लढाईसाठीं सज्ज होऊन निघाला. त्यांच्याबरोबर दोन लाख सेना होती.

ही एवढी मोठी सेना राजधानींतून निघाली. पंजाबांतून ती सेना हिमालयाकडे वळली. बर्फाच्छादित अशा त्या हिमालयाच्या उंच जागीं चढून ते पर्वत ओलांडून पलीकडे जाऊं लागले. वाटेंत त्यांना फार कष्ट

सोसावे लागले. भयंकर थंडी, गार वारा, बर्फाचा मारा हीं सारीं संकटें सहन करून ते हूण लोकांवर हल्ला करावयास नेटानें पुढें गेले.

आतांपर्यंत हूण लोकांनीं दुसऱ्या लोकांच्या मुलुखावर स्वाऱ्या करून लुटालूट केली, जाळपोळ केली अन् भयंकर कत्तली केल्या पण त्यांच्या मुलुखावर स्वारी करणारा कोणी त्यांना आढळला नव्हता. त्यामुळें ते विजयोन्मादानें चढून गेले होते. पण या प्रसंगीं हिमालयासारखा दुर्लंघ्य पर्वत ओलांडून आपणांवरच कोणी स्वारी करीत आहे हें पाहून त्यांना फारच आश्चर्य वाटलें ! आणि त्यांतही अग्रभागीं हत्तीवर बसून एक पंधरा सोळा वर्षांचा कुमार हातांत तीक्ष्ण खड्ग घेऊन येत आहे हें पाहून तर ते थक्कच होऊन गेले !

हूण लोकांनींही मोठें सैन्य जमा केलें आणि आलेल्या शत्रुला तोंड देण्याची तयारी केली. भारतावर स्वारी करून तेथील संपत्ति लुटून आणावी असें त्यांच्या मनांत फार दिवस होतेच; कारण भारत ही सुवर्णभूमि आहे अशी त्याची कीर्ति त्यांच्या कानीं बरेच दिवस गेली होती. पण मध्यें दुर्लंघ्य हिमालय असल्यामुळें आतांपर्यंत त्यांनीं युरोपांतील देशांवर स्वाऱ्या करून भारताकडे दुर्लक्ष केलें होतें. त्याचा पूर्वेकडील शेजारी चीन यावरही त्यांनीं स्वाऱ्या करून लुटालूट केली होती. भारतीयांशीं लढण्याची संधि मिळण्याची ते वाटच पाहत होते. ती संधि आयतीच मिळाली म्हणून एक परीनें त्यांना आनंदच झाला होता. येथेंच भारतीयांना जिंकलें कीं त्यांचें राज्य अन् संपत्ति आपलीच. असें वाटून मोठ्या उत्साहानेंच त्यांनीं युद्धास तोंड दिलें !

युद्ध सुरू झालें आणि दोन्ही बाजूंच्या सैनिकांच्या तुकड्या मोठ्या आवेशानें एकमेकांवर चालून जाऊं लागल्या. हाणा, मारा, शत्रूला ठार करा अशा आरोळ्या सुरू झाल्या. थोडे दिवसांतच हूण सैन्याचा पराभव होणार असें दिसू लागलें. इतक्यांत सम्राट् कुमारगुप्त शत्रूच्या बाणांनीं

विद्ध झाला आणि मृत होऊन हत्तीवरून खालीं पडला. मगध राजाच्या सैन्यांत हाहाकार उडाला ! ते आतां पळूं लागतात कीं काय अशी भीति वाटूं लागली !

या वेळीं स्कंदगुप्त पुढें झाला. पित्याचें शव शत्रूच्या हातीं लागूं न देतां त्यानें मोठ्या सन्मानानें अग्निसंस्कार केला. आलेले दुःखाश्रु बाजूला सारून त्यानें सैनिकांत नवचैतन्य आणिलें. तो म्हणाला, ' वीरहो, पित्याच्या मरणानें घाबरून जाऊं नका. युद्धांत आपलीच सरशी होत आहे हें विसरूं नका ! आपण शत्रूचा केवढा नाश केला आहे हें तुम्हीं पाहिलेंच आहे. आतां विनाकारण पळूं लागलां तर शत्रु तुमच्यावर क्रूरपणानें सूड उगविल्यावांचून राहणार नाहीं. पळत पळत शत्रूच्या तलवारींना बळी पडण्यापेक्षां शत्रूंच्या शस्त्रांशीं शस्त्रें भिडवून शत्रूंना मारणें कीं स्वतः बळी पडणें यांत जास्त श्रेयस्कर काय ? पूज्य पिताजींचें तुमच्यावरील प्रेम लक्षांत आणा. शत्रूनें रणांगणांत त्यांचा बळी घेतला याचा सूड घेणें तुमचें कर्तव्यच नाहीं का ? विचार करा ! भारतीय वीरांची कीर्ति राखणें तुमच्या हातीं आहे. आज तुम्ही पळालां तर भारतीय क्षत्रियांची परदेशीं कायमची अपकीर्ति होईल ! भारतांत शत्रु सहज प्रवेश करून, लुटालूट, जाळपोळ करून ते आपला देश बेचिराख करतील ! आपलीं बायकामुलें, नातेवाईक यांच्यावर केवढा मोठा प्रसंग गुदरेल याचा विचार करा ! शत्रूचा पूर्ण पराजय करूनच विजयी म्हणून भारतांत मिरवत जाऊं असा निश्चय करा ! चला शत्रूवर तुटून पडा ! '

बाल स्कंदगुप्ताच्या या उत्साही भाषणानें सैनिकांना जोर चढला. खूप उत्साहानें निकरानेंच ते लढले. शत्रूचा पूर्ण पराभव करण्याला त्यांना दोन तीन महिने लढावें लागलें पण ते डरले नाहींत. शत्रूचा पराभव करून हूण लोकांना त्यांच्याच देशांत भारतीयांचें शौर्य

दाखवून स्कंदगुप्ताची स्वारी ससैन्य हिमालयांतून परतली. ही वार्ता राजधानीला पोहोंचतांच जनतेला मोठा आनंद झाला. त्यांच्या स्वागता-साठीं खूप जोरानें तयारी सुरू झाली. राजधानीपासून पांच कोसपर्यंत रस्ते शृंगारले. जागोजाग या सैन्याचें लोकांनीं मोठ्या उत्साहानें स्वागत केलें. राजा राजधानीला पोहोंचला त्या दिवशीं मोठा उत्सव करण्यांत आला. साऱ्या शहरांत गुढया-तोरणें उभारलीं. नाच गीतांच्या कार्य-क्रमानें सारें शहर भरून गेलें. जिकडे तिकडे आनंदी आनंद बहरला !

स्कंदगुप्ताच्या या पराक्रमानें आजूबाजूच्या देशांवर त्याचा चांगलाच वचक बसला. आणखी थोडयाच दिवसांत राजानें इराण व अफगाणिस्तान या देशांवर स्वारी करून ते देश जिंकले आणि आपल्या राज्यास जोडले ! पांडवादि थोर राजांच्या परंपरेला अनुसरून आपण सम्राट् झालों हें जाहीर करण्यासाठीं त्यानें अश्वमेध यज्ञ केला. त्या प्रसंगी त्यानें विद्वानांचा आणि रणशूरांचा सन्मान करून सर्वांना पारितोषिकें दिलीं.

यानें विक्रमादित्य, राजाधिराज, महाराजाधिराज वगैरे अनेक पदव्या आपल्या नांवास जोडल्या होत्या असें इतिहास सांगतो. यानें इ. स. ४५५ ते ४८० म्हणजे सुमारें पंचवीस वर्षें राज्य केलें. याचे अनेक शिलालेख आणि सोन्याचांदीचीं नाणीं आज उपलब्ध आहेत. याच्या कारकीर्दीच्या शेवटच्या दहा वर्षांत याला श्वेत हूणांशीं लढावें लागलें.

स्कंदगुप्त जसा शूर तसाच मोठा धर्मात्मा होता. दयाळू आणि न्यायी अशी त्याची कीर्ति सगळीकडे पसरली होती.

* * *

१४

# कविकुलगुरु कालिदास

कविवर कालिदास ह्याचें नांव त्याच्या सुंदर काव्य-नाटकांनीं अजरामर केलें आहे तरीपण त्या प्रथितयश कवीचा काल आणि स्थळ ह्यांची निश्चित माहिती कोणालाहि नाहीं. त्याचें साहित्य, नाटकें व काव्यें, त्यांतील कथानक व त्याच्या नांवाचा इतर ग्रंथांत असलेला उल्लेख ह्यांवरून तो इ. स. ३८७ ते ४१३ ह्या कालांत होऊन गेला असें दिसतें. ह्याच्या चरित्राविषयींही निश्चित माहिती नाहीं. त्याच्याविषयीं अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं एक अशी आहे:

कालिदास हा एका ब्राह्मणाचा मुलगा. पांच सहा महिन्यांचा होतांच त्याचे आई-वडील निधन पावले व हा पोरका झाला. त्यामुळें शेजारच्या एका गवळ्यानें ह्याचें पालनपोषण केलें. अठरा वर्षांचा झाला तरी त्याला कसलेंच शिक्षण मिळालें नव्हतें. त्या देशाच्या

राजाला एक मुलगी होती. ती उपवर झाली म्हणून तिच्या लग्नाची तयारी चालविली पण कोणताच राजपुत्र तिला पसंत पडेना. त्यामुळें प्रधान तिच्या-वर रागावला. ह्या पोरीची बरोबर खोड मोडावयाची असा त्यानें निश्चय केला. त्यानें त्या गवळ्याच्या घरीं वाढलेल्या अशिक्षित पण दिसायला सुंदर अशा तरुणाला तिजकडे पाठविलें. बरोबर कांहीं पंडितही दिले. राजकन्येनें विचारलेल्या प्रश्नांची उत्तरें त्या पंडितांनीं परस्पर दिल्यानें त्या तरुणाचा मूर्खपणा तिच्या नजरेस आला नाहीं. हा राजपुत्र पति होण्यास लायक आहे असें ठरवून तिनें त्याला पसंत केलें. लवकरच तिचें त्याच्याशीं लग्नही लागलें. लग्नानंतर त्याचा तिच्याशीं प्रत्यक्ष संबंध येतांच त्याचें सर्व बिंग उघडकीला आलें. पण लग्न होऊन चुकल्यामुळें आतां त्याला उपाय नव्हता. राजकन्येनें पतीला सुचविलें कीं, त्यानें कालिमातेची उपासना करून वर प्राप्त करून घ्यावा. त्यानें देवीच्या दाराशी धरणें धरलें. शेवटीं स्वतःचा शिरच्छेद करण्याची त्यानें तयारी केली. तेव्हां कालिमाता प्रसन्न होऊन तिनें त्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेवला आणि तूं विद्वान् व प्रतिभावान् कवि होशील असें त्याला सांगितलें.

देवीचा वर मिळतांच तो राजकन्येकडे परत आला. त्याची विद्वत्ता पाहून राजकन्याही त्याला मानूं लागली. पण राजकन्येनें आपल्याला उन्नतीचा मार्ग दाखविला अर्थात् ती आपला गुरु होय असें गुरुत्वाचें नातें त्यानें तिच्याशीं जोडलें म्हणून तिला राग आला. व तिनें तूं स्त्रीच्याच हातून मरशील असा त्याला शाप दिला. ह्यामुळें पुढें त्याला वेश्यांचा नाद लागला. पुढें तो आपला मित्र जानकीहरण काव्याचा कर्ता राजा कुमारदास ह्याला भेटण्यासाठीं लंकेला गेला. तेथें तो एका वेश्येच्या नादी लागला. तेथील राजानें एक समस्या पूर्ण करण्यासाठीं खूप मोठें बक्षीस जाहीर केलें होतें. ही समस्या-पूर्ति करणारा श्लोक कालिदासानें रचला व त्या वेश्येला म्हणून दाखविला. हा श्लोक राजाला

दाखवून आपणच तें मोठें बक्षीस उपटावें असें तिच्या मनांत आलें. तिनें कपटानें कालिदासाजवळून तो श्लोक लिहून घेतला व त्याला ठार मारलें. कुमारदासाला त्या वेश्येचा संशय आला. तिला धमकी देतांच तिनें आपला गुन्हा कबूल केला. आपल्या प्रिय मित्राचा अशा रीतीनें अंत झाला हें पाहून राजाला इतकें वाईट वाटलें कीं त्यानें कालिदासाच्या चितेवरच आपणांस जाळून घेतलें ! त्यांना जाळल्याची जागा लंकेंत लोक अद्याप दाखवितात !

कालिदास हा उत्तम कवि होता, त्याचा अभिमान सर्व प्रांतांतील लोकांना असणें स्वाभाविक आहे. बंगाली लोक हा बंगाल्यांतील होता असें सांगतात कारण काली देवीचें माहात्म्य ह्याच प्रांतांत जास्त आहे. 'ऋतुसंहार' ह्या काव्यामध्यें ह्यानें ग्रीष्म ऋतूपासून



सुरवात केली आहे. तसेंच मेघदूतांतील 'आषाढस्य प्रथम दिवसे' हीं वर्णनें बंगाल प्रांताला जास्त जुळतात. त्यांच्या मतें मुर्शिदाबाद

जिल्ह्यांतील गडा शिंगरूं ह्या गांवीं त्याचा जन्म झाला. त्या ठिकाणीं कालिदासाचें स्मारक म्हणून एक कालिदास पाठशाळा चालविली आहे. कालिदासाला तीन स्त्रिया होत्या. त्यांच्या सहवासांत तो तीन ठिकाणीं काळ घालवीत असे. विद्युन्माला ह्या स्त्रीबरोबर तो कांहीं दिवस ऋक्षातीतला ह्या गांवीं राहात असे. श्रीपाट दोगाझिया ह्या गांवीं त्याची दुसरी स्त्री राहत असे.

दिल्ली युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर लक्ष्मीधर कल्ला ह्यांनीं कालिदासाची जन्मभूमि ह्या विषयावर एक इंग्रजी पुस्तक लिहिलें आहे. त्या पुस्तकांत त्यांनीं प्रतिपादिलें कीं कालिदास हा काश्मीरांत जन्मला असावा. त्याचें म्हणणें असें आहे कीं, ह्याच्या सर्वच ग्रंथांत हिमालयाचें सुंदर व यथार्थ वर्णन आहे. शिवाय काश्मीरांत घडणाऱ्या दुसऱ्या अनेक गोष्टी त्याच्या ग्रंथांत वर्णिल्या आहेत. कै. हरदासशास्त्री व प्रो. शि. म. परांजपे ह्यांचें मतें हा मंदसोर येथें जन्मला होता.

काव्यें व नाटकें मिळून ह्याचे सात ग्रंथ प्रसिद्ध आहेत. आठवा ग्रंथ कुंतलेश्वर दौत्य नाटक हा अनुपलब्ध आहे. पण बाकी मालविकाग्निमित्र, शाकुंतल, विक्रमोर्वशीय हीं नाटकें व ऋतुसंहार, रघुवंश, कुमारसंभव व मेघदूत हीं चार काव्यें सुप्रसिद्ध आहेत. ह्या ग्रंथांचीं इंग्रजी, जर्मन वगैरे भाषांत भाषांतरें झाली आहेत. सुप्रसिद्ध जर्मन कवि गटे हा शाकुंतल नाटकांतील वर्णनें वाचून कालिदासावर खुश झाला व तो महाकवि होता असें त्यानें मत दिलें. कालिदासाचीं काव्यें शेक्सपिअरच्या काव्यांप्रमाणेंच सुंदर आहेत म्हणून कालिदासाला संस्कृत भाषेंतला शेक्सपिअर असें म्हणतात. हा कवि राजा विक्रमादित्य म्हणजे दुसरा चंद्रगुप्त ह्याच्या पदरीं होता. इतकेंच काय पण राजघराण्यांशीं ह्याचा संबंध असल्यानें विक्रमादित्यानें ह्याला अनेक वेळां महत्त्वाच्या कामगिरीवर पाठविलें होतें.

ह्याच्या चातुर्याबद्दल अनेक आख्यायिका आहेत. त्यांपैकीं पुढील दोन दंतकथा त्याचें चातुर्य चांगल्याप्रकारें दाखवितात.

एका पंडितानें राजसभेंत येऊन पुढील ओळ म्हटली. 'अम्बाधिर्जलधिः पयोधिरुदधिर्वारानिधिर्वारिधिः' ह्यांत समुद्र अर्थाचे फक्त सहा शब्द आहेत. राजसभेंतील पंडितांनीं ही समस्या पूर्ण करावी असें त्यानें आव्हान दिलें. कोणीही पंडित ती समस्या पूर्ण करण्यासाठीं पुढें येईना. अर्थात ज्यानें ती घातली त्याला अजिंक्यपत्र देणार तोंच कालिदास पुढे झाला व त्यानें पुढील चार चरण म्हणून ती समस्या पूर्ण करून दाखविली.

> अम्बा कुप्यति तात, मूर्ध्नि विधता गङ्गेयमुत्सृच्यताम्
> विद्वान् षण्मुख सन्ततं मयि रता तस्या गतिः का वद ।।
> कोपारोपशवाद्विवृद्ध वदनः प्रत्युत्तरं दत्तवान्
> अम्बोधिर्जलधिः पयोधिरुदधिर्वारानिधिर्वारिधिः ।।

ह्या श्लोकाचा अर्थ असा आहे कीं, एके दिवशीं कुमार कार्तिकेयानें शंकराला म्हटलें, 'बाबा, तुम्ही ह्या गंगेला डोक्यावर चढविली त्यामुळें आईला फार राग आला आहे.' श्रीशंकर म्हणाले, 'अरे, पण जी माझ्यावर सदैव प्रेम करते तिनें जावं कोठें ?' त्याबरोबर कार्तिकेयाला राग आला. तो म्हणाला, 'तिनें समुद्रांत जावं !'

आपल्या चातुर्यानें आणि प्रतिभेनें काव्यद्वारां तो इतरांना विशेषतः गरिबांना मदत करीत असे. एकदां एक ब्राह्मण राजसभेंत आला. त्याला पुरुषसूक्त ह्या स्तोत्राचा फक्त पहिला एक चरण येत होता. तेवढा त्यानें म्हणून दाखविला ! पण राजा विद्वान् होता. तो ह्या एकाच ओळीनें कसा संतुष्ट होणार ! कालिदासानें पाहिलें, ब्राह्मणाला कांहीं येत नाहीं. तेव्हां तो पुढें होऊन म्हणाला, 'महाराज, कविराजानें हा चरण म्हणून आपली स्तुतीच केली आहे. तो म्हणतो,

सहस्रशीर्षा: पुरुष: सहस्राक्ष: सहस्रपात्
चलित: चकित: छन्नस्तव सैन्ये प्रधावति ॥

राजा, आपलें सैन्य शत्रूवर चाल करून गेलें हें पाहून शेष पृथ्वीच्या भारानें आपलें स्थान सोडून पळाला, इंद्र चकित झाला आणि सूर्य तर धुळीनें झाकून गेला. हें ऐकून राजा खुश झाला व त्याने त्या ब्राह्मणाची योग्य संभावना केली.

कालिदासाचें काव्य हृदयंगम आहे. वर्णनें अगदीं स्वाभाविक आणि यथार्थ. शब्दरचना गोड असून नाना अलंकारांनी परिप्लुत आहे. उपमा देण्यांत कालिदासाइतका कोणताही कवि प्रसिद्ध नाही. आपल्या गोड काव्यांनीं तो अमर झाला आहे. हा इतका मोठा होता कीं त्याच्या तोडीचा दुसरा कोणी कवि नाहीं असें एका कवीनें पुढील श्लोकांत मोठ्या खुबीने म्हटलें आहे.

पुरा कवीनां गणनाप्रसंगे कनिष्ठिकाधिष्ठित कालिदास:।
अद्यापि तत्तुल्यकवेरभावात् अनामिका सार्थवती बभूव ॥

* * *

※

१५

※

# सम्राट हर्षवर्धन

राजा आणि तो लेखक किंवा प्रतिभावान् कवि असें क्वचितच आढळतें. ह्याचें कारण लक्ष्मी आणि सरस्वती ह्यांना एकमेकांचा सहवास रुचत नाहीं हें असावें. पण सम्राट् हर्षवर्धन हा ह्या गोष्टीला अपवाद होता. तो जसा शूर आणि युद्धकलानिपुण होता तसाच कुशल नाटककार आणि जन्मजात कवि होता.

सहाव्या शतकांत हिंदुस्थानांत अनेक लहान लहान राजे होते. आसामांत एक, तर बंगाल्यांत दुसरा; स्थानेश्वर येथें तिसरा, तर महाराष्ट्रांत चौथाच. असे अनेक राजे आहेत असें पाहून हूण लोकांनीं प्रजेला त्रास द्यावयास सुरवात केली. कोणताच राजा बलवान् नव्हता. त्यामुळें त्या लोकांचें चांगलेंच फावलें. पण तशाही स्थितींत शेवटीं स्थानेश्वराचा राजा प्रभाकरवर्धन पुढें आला. शौर्यानें लढून त्यानें मोठा पराक्रम केला

आणि हूण लोकांचा पराभव करून त्यांना हाकून लावलें. आपल्या पराक्रमानें त्यानें आपले राज्यही थोडेंफार वाढविलें.

त्याला तीन मुलें होतीं. दोन पुत्र आणि एक कन्या. वडील राजपुत्राचें नांव राज्यवर्धन असून धाकटयाचें नांव हर्षवर्धन असें होतें. राजकुमारीचें नांव जयश्री ठेविलें होतें. राजकन्या जयश्री हिचें लग्न कनोजचा राजा गृहवर्मा ह्याच्याशीं झालें.




राजा प्रभाकरवर्धन वृद्ध होतांच त्यानें राज्यवर्धनाला राजा केलें. इतक्यांत उत्तरेकडून अशी बातमी आली की हूण लोकांनीं पुन्हा बंड केलें आहे. त्यांचा बंदोबस्त न केला तर राज्यास अपाय होईल हे जाणून राज्यवर्धन स्वतःच मोठी सेना घेऊन निघाला. त्याच्याबरोबर त्याचा धाकटा भाऊ हर्षवर्धनही निघाला. स्वारी हिमालयाजवळ आल्यावर राज्यवर्धनानें हर्षवर्धनाला तेथेंच ठेवलें आणि आपण सैन्य घेऊन पुढें गेला. राज्यवर्धन पुढें जातो न जातो तोंच स्थानेश्वराहून राजा प्रभाकर-वर्धन आजारी आहे अशी बातमी आली. त्याबरोबर हर्षवर्धन राजधानीस

परत आला. राजाची प्रकृति अत्यवस्थ आहे असें पाहून हर्षानें वडील भावाला निरोप धाडला, पण इतक्यांत राजा मृत्यु पावला.

तिकडे राज्यवर्धनानें हूणांचा पूर्ण पराभव केला आणि त्यांची दाणादाण करून सोडली. इतक्यांत राजा आजारी असल्याचें कळल्यामुळें तो राजधानीस परत आला. पण तेथें येतो तों राजा मृत झाला व महाराणी त्याजबरोबर सती गेली असें त्याला कळलें.

ते राजपुत्र अशा दुःखांत असतां उत्तर मालवच्या राजानें कनोजच्या राजाचा खून करून त्याची पत्नी म्हणजे त्या राजपुत्रांची बहीण जयश्री हिला पळवून नेलें, अशी भयंकर वार्ता त्यांना समजली. त्या वार्तेनें त्यांचें अंतःकरण फाटून गेलें. राज्यवर्धनाला अति क्रोध आला आणि मोठें सैन्य घेऊन तो मालव राजावर स्वारी करण्यास निघाला. त्याच्या हल्ल्यानें मालवराजा जेरीस आला. त्याचा मित्र शशांक–बंगालचा राजा–ह्यानें राज्यवर्धनाला आपली सुंदर कन्या अर्पण करण्याच्या मिषानें स्वतःच्या महालांत बोलावून तेथें त्याचा कपटानें वध केला !

ही बातमी हर्षवर्धनाला समजतांच त्याच्यावर आभाळच कोसळल्या–सारखें झालें ! इतक्यांत इतर सर्व लहान राजांनीं जूट करून स्थानेश्वरचें राज्य घेण्याचा बेत केला ! पण इतक्या सर्व संकटांस न जुमानतां स्वतःच्या प्रजेला उत्साहित करून त्यानें मोठें सैन्य जमा केलें व आपल्या शत्रूंवर तो तुटून पडला. एकामागून एक राजांस जिंकीत तो चालला. वाटेंत राज्यवर्धनाचें सैन्य त्याला येऊन मिळालें. त्यानें हें युद्ध सहा वर्षेंपर्यंत चालविलें. सर्व शत्रूंना नामोहरम करून त्यांना आपले मांडलिक बनविलें आणि आपली बहीण जयश्री हिचा शोध लावून दिग्विजयी बनून स्वतःच्या राजधानीस परत आला. त्यानंतर त्यानें स्वतःला राज्याभिषेक करवून घेतला. सर्व शत्रूंचा पाडाव करी–पर्यंत डाव्या हातानें जेवेन अशी प्रतिज्ञा करून ती त्यानें पाळिली.

आतांपर्यंत जरी हर्षराजानें अनेक राजांचा पाडाव करून त्यांना मांडलिक बनविलें होतें तरी त्या राजांवर त्याला पूर्ण विश्वास ठेवतां येईना. त्यामुळें राज्याभिषेकानंतरही हर्षराजास राज्याचें रक्षण करण्याकरितां फारच काळजीपूर्वक वागावें लागलें. त्यासाठीं त्याला सैन्य घेऊन वर्षांतून बरेच दिवस राजधानीबाहेर काढावे लागले.

राजा हर्षवर्धन विद्वान् आणि रसिक होता. स्वतः कवि असून लेखक व कवि ह्यांचा तो पुरस्कर्ता होता. लढाईसाठीं तो हिमालयाच्या पायथ्याजवळ छावणी देऊन राहिला असतां हिमालयांतील सृष्टिसौंदर्य पाहून त्याचें हृदय उचंबळून येई; पण त्या वेळीं काळ अनुकूल नसल्याने त्याची सर्व कविता मनांतल्या मनांत राही. राज्याभिषेक होतांच त्याचें साहित्यप्रेम जोमदार स्वरूपांत बाहेर पडलें. त्यानें अनेक लेखकांना व कवींना बोलावून मुद्दाम दरबारांत आश्रय दिला. कादंबरीकर्ता बाण, दशकुमारचरिताचा लेखक दण्डी, वासवदत्ता नाटकाचा लेखक सुबंधु वगैरे अनेक सुप्रसिद्ध साहित्यसेवक, लेखक, कवि वगैरे त्याच्या दरबारांत होते. तो स्वतः कवि आणि नाटककार होता. प्रियदर्शिका, नागानन्द व रत्नावली हीं त्याचीं नाटकें प्रसिद्ध आहेत.

त्यानंतर त्यानें पुन्हां एकदा लढाई करून आजूबाजूचीं राज्यें जिंकलीं. महाराष्ट्रांतील राजा पुलकेशी ह्याच्याशीं लढून त्याचा पराजय केला आणि त्याचे मित्र गुजराथ आणि मालव देशचे राजे ह्यांचाही पराभव करून त्यांना त्यानें आपले मांडलिक बनविलें. त्यानें वलभीपूरच्या राजाचा पराजय करून त्याला कैद केलें; पण पुढें त्याला आपली मुलगी देऊन कायमचा मित्र बनवून सोडलें. अशा रीतीनें अनेक राज्यें जिंकून तो खरोखर ' सम्राट् ' म्हणवून घेण्यास पात्र ठरला.

सम्राट् हर्षवर्धन नांवाप्रमाणें हर्षवर्धन म्हणजे आनंदाची वृद्धि करणारा होता. राज्यांत नानाप्रकारचे उत्सव आणि समारंभ करण्याची चाल

पाहून त्यानें सर्व लोकांना आनंद व्हावा म्हणून अनेक योजना केल्या.

सर्व धर्मांवर त्याची सारखी दृष्टि असून विद्वान् माणसें शोधून काढून त्यांना देणग्या देण्यास तो नेहमीं उत्सुक असे. दर पांच वर्षांनीं तो मोठा उत्सव करीत असे. ह्या उत्सवाला निरनिराळ्या देशांतून असंख्य विद्वान् येत असत. हा पंचवार्षिक उत्सव बरेच दिवस चाले आणि त्या उत्सवांत राजा आपल्या खजिन्यांतील सर्व शिल्लक दान करीत असे.

बौद्ध धर्मावर त्याचें प्रेम होतें. त्यानें इ. स. ६४३ मध्यें कनोज शहरीं एक मोठी सभा भरवली. अनेक बौद्धधर्मीय साधु ह्या परिषदेला आले होते. ह्या सभेला प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएनत्संग हा आला होता. ह्या परिषदेनंतर जो पंचवार्षिक उत्सव झाला त्याला लाखों माणसें आलीं होतीं. ह्या उत्सवाच्या पहिल्या दिवशीं त्यानें बुद्धाचा पुतळा उभारला, दुसऱ्या दिवशीं सूर्याची प्रतिमा व तिसऱ्या दिवशीं शिवाची प्रतिमा स्थापन केली असें चिनी प्रवासी ह्युएनत्संगनें लिहून ठेवलें आहे. हर्षवर्धनानें अपरिमित द्रव्यदान केलें. ह्यामुळें त्याची कीर्ति सर्वत्र पसरली. तो स्वतः शिवभक्त होता. सूर्यदेवता हें त्याचें कुलदैवत होतें.

बासष्ट वर्षांचा होऊन हा राजा इ. स. ६४८ सालीं मरण पावला.

* * *

9822
विषय

१६

# राजा दाहीर

भारतीय संस्कृति अति श्रेष्ठ आहे हें खरें. सद्गुणां-करितां भारतीय लोक अति प्रसिद्ध आहेत. पण त्यांचें शौर्य, विद्वत्ता, परोपकारित्व, सदयता, हीं सगळीं त्यांच्यांतील 'फितुरी' ह्या दोषामुळें व्यर्थ ठरलीं. कितीतरी बलाढ्य राजे फितुरीमुळें धुळीस मिळाले आणि वेळोवेळीं परकीयांची गुलामगिरी भारतीयांच्या नशिबीं आली !

सिंध प्रांताचा पराक्रमी राजा दाहीर ह्याचा शेवट फितुरीमुळेंच झाला.

इ. स. ७१२ पर्यंत हिंदुस्थानांत मुसलमानांचा प्रवेश झाला नव्हता. ह्या वेळेपर्यंत उत्तरेकडून विदेशी लोकांच्या अनेक टोळ्या इकडे आल्या; पण ते लोक येथें आल्यावर त्यांनीं येथलाच धर्म स्वीकारला आणि ते हिंदुस्थानीच बनले. इ. स. ७१२ सालीं सिंध प्रांतावर दाहीर नांवाचा राजा राज्य करीत होता.

महंमद कासिम ह्याच्या मनांत सिंध प्रांत घेऊन तेथें आपलें राज्य स्थापन करावें असें होतें. शिवाय धर्मप्रसार हें तर मुसलमान राजे आपलें कर्तव्यच मानीत. सिंध प्रांतावर स्वारी करण्यासाठीं तो कांहींतरी निमित्त शोधीत होता. तोंच त्याला बातमी कळली कीं कित्येक मुसलमान यात्रेकरू सिलोनहून मक्केला निघाले होते. वाटेंत त्या लोकांचें गलबत लुटारूंनीं लुटलें. समुद्रावर लुटालूट करणारांना ' चांचे ' असें म्हणतात. ह्या यात्रेकरूंना लुटणारे चांचे देवल बंदरांतले राहणारे होते. हें देवल बंदर सिंध प्रांतांत अर्थातच दाहीर राजाच्या ताब्यांत होतें. चांचे लोकांनीं उतारूंना लुटून त्यांना कैद करून नेलें होतें. त्यांची सुटका व्हावी अशी महंमद कासिमची इच्छा होती. म्हणून त्यानें सिंधचा राजा दाहीर ह्याला पत्र लिहिलें. पण त्या पत्राचा दाहीर राजानें जबाबही दिला नाहीं किंवा त्या यात्रेकरूंची सुटकाही केली नाहीं. ह्या गोष्टींत लक्ष घालण्याची जरूरी नाहीं असें त्याला वाटलें. पण त्या योगानें महंमद कासिम ह्याला फार राग आला. त्यानें सिंध प्रांतावर स्वारी केली आणि एकदम देवल बंदरावरच हल्ला केला. दाहीर राजाची कांहींच तयारी नव्हती. शिवाय तेथील लोकांचा मंत्रतंत्रावर विशेष भरंवसा होता. त्या बंदरांतील किल्ल्यावर एक निशाण होतें तें मंत्रानें भारविलेलें असून तें अजिंक्य आहे असा लोकांचा समज होता. पण महंमद कासिमनें दगडांचा मारा करून तें निशाण खालीं पाडलें ! तें खालीं पडतांच लोक घाबरून गेले ! त्यांची लढण्याची तयारी मुळींच नव्हती. त्यामुळें तें बंदर महंमद कासिमनें हां हां म्हणतां जिंकलें. मग साहजिकच जास्त मुलूख जिंकावा अशी त्याला इच्छा झाली !

देवल बंदराच्या आजूबाजूच्या मुलुखावर दाहीरचा भाऊ राज्य करीत होता. लोकांनी बौद्धधर्माचा स्वीकार केला होता, त्यामुळें लढाईंत शत्रूंना ठार मारणें ही हिंसा होय आणि ही हिंसा करणें आपल्या

धर्माच्या विरुद्ध आहे असा विचार करून राजाला लोकांनीं मदत केली नाहीं. ह्यामुळें त्या राजाच्या अगदीं थोडक्या सैन्याचा पराजय झाला. आणि महंमद कासिमनें तो प्रांत जिंकला.



ह्या विजयामुळें महंमद कासिमला विशेष हुरूप आला. दाहीर राजाचे बरेच नातेवाईक आणि सरदार त्याच्या शत्रूला वश झाले. त्यामुळें महंमद कासिमचें काम अगदींच सोपें झालें! सिंधु नदींत एक बेट होतें. तेथील अधिकाऱ्यानें तर स्वतःच पत्र लिहून आपलें राज्य महंमद कासिमला अर्पण केलें. कासिमनें त्याला आपला नोकर म्हणून त्या बेटाचा अधिकारी नेमलें! अशा रीतीनें राजा दाहीर सर्वच बाजूंनीं पेंचांत सांपडला; तरी पण कासिमशीं एक निकराची लढाई द्यावयाची असा त्यानें निश्चय केला. त्यानें मोठी खटपट करून लहानसें सैन्य जमविलें. त्यांत फितुरी लोकही होतेच. त्या सैन्याची 'झीम' गांवीं कासिमच्या सैन्याशीं गांठ पडली. दाहीरनें जोराचा सामना दिला. तो

हत्तीवरून लढत होता. लढाई जोरांत असतां शत्रुपक्षानें एक जळता बाण दाहीर राजाच्या अंबारीवर टाकला. त्याबरोबर अंबारी पेटली. अंबारी पेटतांच हत्तीचें अंग जळूं लागलें. ती आग असह्य झाल्यानें हत्ती पळत सुटला आणि जवळच्या नदींत शिरला. अंबारी जळाल्यानें राजा व माहूत हे पाण्यांत फेकले गेले. स्वतःला सावरून राजा पाण्याबाहेर येतो तोंच अरबांनीं त्याला गराडा घातला आणि तलवारींनीं त्याचीं खांडोळीं उडविलीं ! राजा मरण्याचाच काय तो अवकाश, त्याच्या सर्व सैन्याची वाताहत झाली ! कित्येक मारले गेले आणि कित्येक पळून गेले !

इतकें झालें तरी दाहीर राजाची राणी ' राऊर ' किल्ल्यावर होती. तिनें कासिमशीं लढाई देण्याचें ठरविलें. दाहीरचा पराभव झाल्यावर कासिमनें किल्ल्यालाच वेढा घातला. राऊर स्त्री असूनही शौर्यानें लढली. पण सैन्यांत फितुरी माजलेली ! मग राणीच्या शौर्याचा काय उपयोग ? राणीचा पराभव झाला. आतां शत्रूच्या हातांत सांपडून अप्रतिष्ठा करून घेण्यापेक्षां मरून जाणें काय वाईट, असा विचार करून राजघराण्यांतील व इतर सरदारांच्या कुटुंबांतील सर्व स्त्रियांनीं जोहार करण्याचें ठरविलें. त्या एका बंद केलेल्या घरांत शिरल्या आणि त्या घराला त्यांनींच आग लावली ! त्या आगींत त्या सर्व स्त्रिया जळून गेल्या !

दाहीर राजाच्या दोन तरुण मुली होत्या. त्या अति सुंदर होत्या. ' जोहार ' करण्यापूर्वीं आपल्या शत्रूचा सूड घ्यावयाचा असा त्यांनीं निश्चय केला होता. पण दुर्दैवानें त्या महंमद कासिमच्या हातीं लागल्या. महंमद कासिमनें असा विचार केला कीं त्या दोन सुंदर मुली खलिफाला भेट म्हणून द्यावयाच्या. त्याप्रमाणें त्या दोन मुलींची रवानगी त्यानें खलिफाकडे केली. त्या मुली शूर आणि धूर्त होत्या. खलिफाशीं लग्न लावण्यापूर्वीं त्या खलिफाला म्हणाल्या, " महंमद कासिम लबाड आहे. त्यानें प्रथम आमच्याशीं लग्न केलें आणि आतां त्यानें आम्हांला तुम्हांला

नजर केलें. हा तर तुमचा धडधडीत अपमान आहे ! " हें ऐकतांच खलिफाला फार राग आला ! पोत्यांत जिवंत भरून महंमद कासिमला मारावें असा त्यानें हुकूम सोडला ! मग काय ! कासिमला पोत्यांत भरून तें पोतें खलिफाकडे पाठविण्यांत आलें ! त्याचें प्रेत पाहून भर-दरबारांत त्या मुली म्हणाल्या, " आमच्या प्रिय वडिलांना ह्या नीचानें ठार मारलें ! त्याचा आम्ही सूड उगवला ! "

आतां ह्यापुढें जगलें असतां आपली विटंबना होईल, परधर्म स्वीकारावा लागेल, त्यापेक्षां मरण चांगलें असा विचार करून त्या दोघी बहिणींनीं कट्यारीनें परस्परांना एकदम मारलें ! अशा रीतीनें त्यांनीं आपलें शील राखलें !

* * *

※

१७

※

# बाप्पा रावळ

गुजराथेंत ज्या भागांत ईडर संस्थान आहे त्या भागांत फार वर्षांपूर्वीं भिल्ल लोक राहत असत. ते लोक स्वतंत्र वृत्तीचे, पण मागासलेले होते. ग्रहादित्य नांवाच्या एका राजानें तेथील भिल्लांवर आपलें राज्य स्थापलें. पहिल्यानें भिल्लांनी त्याला कांहीं विरोध केला नाहीं; पण कांहीं दिवसांनीं त्यांना असें वाटूं लागलें कीं राजाच पाहिजे असेल तर आपल्या भिल्ल लोकांतील एखाद्या माणसाला आपण राजा करावें. एखाद्या बाहेरच्या माणसानें आपल्यावर हुकमत गाजवावी हें त्या स्वतंत्र वृत्तीच्या भिल्लांना पसंत पडेना. त्या लोकांनीं बंड केलें आणि ग्रहादित्यास ठार मारलें. त्याला दोन तीन वर्षांचा एक लहान मुलगा होता. त्यालाही ते ठार मारणार होते, पण मोठ्या शिकस्तीनें राजाच्या उपाध्यायानें त्याला गुप्तपणानें पळवून नेलें व आपल्या घरांत ठेवून एका लहानशा

खेड्यांत त्याचें लालनपालन केलें. त्या मुलाचें नांव बाप्पा रावळ असें होतें.

ब्राह्मणाच्या घरांत राहिल्यानें त्याला क्षात्रधर्माचें शिक्षण मिळणें शक्य नव्हतें. शिवाय तो कोणाचा मुलगा हें उघडीस आलें तर त्याच्या जिवाला अपाय होण्याचा संभव होता. त्या ब्राह्मणानें त्याला आपलीं गुरें राखण्याचें काम दिलें. गुरें घेऊन तो रोज रानांत जाई. इतर गुराख्यांच्या संगतींतच त्याचा काळ जाऊं लागला. तो ज्या रानांत गुरें चरविण्यास जाई त्या रानांत एक देऊळ होतें. त्या देवळांत हारीतस्वामी नांवाचे एक साधु राहात असत. अरण्यांत गेल्यावर दररोज गुरें चरत असतांना हा मुलगा कमळें जमवी आणि नियमानें तीं देवळांत नेऊन श्रीशंकरास वाही. हा लहानसा मुलगा न विसरतां दररोज देवळांत येतो आणि श्रद्धेनें देवाला कमळें वाहतो हें त्या स्वामीच्या ध्यानांत आलें. त्यांनीं त्याच्याकडे विशेष निरखून पाहतांच हा मुलगा पुढें राजा होणार असें त्यांना आढळून आलें. एके दिवशीं त्यांनीं शंकराचा प्रसाद म्हणून त्याला एक सोन्याचें कडें बक्षीस दिलें आणि ' तूं महापराक्रमी राजा होशील ' असा आशीर्वाद दिला. बाप्पाचा वचनावर दृढ विश्वास बसला.

पुढें कांहीं दिवसांनीं त्या मुलाला नागदा गांवीं राहावयास जावें लागलें. तेथें एकदां एक चमत्कारिक गोष्ट घडून आली. हा मुलगा व त्या गांवचीं इतर मुलें एकत्र खेळत होतीं. त्यांत त्या गांवच्या ठाकुराची मुलगी होती. खेळतां खेळतां त्या मुलांनीं त्या मुलीचें ह्या मुलाशीं खेळांत लग्न लावलें. ही गोष्ट त्या ठाकुरास कळतांच त्याला राग आला. आपण क्षत्रिय तेव्हां आपली मुलगी एका ब्राह्मणाच्या मुलास देणें कधींच शक्य नाहीं. पण थोड्या चौकशीअंतीं त्याला असें कळलें कीं बाप्पा हा क्षत्रिय कुळांत जन्मलेला राजपुत्र आहे. हें समजतांच

त्याला फार आनंद झाला. मग त्यानें आपण होऊन त्याला आपली मुलगी देऊन शिवाय बरेंच द्रव्यही दिलें. बाप्पा मोठा झाल्यावर चितोडच्या राजाच्या पदरीं नोकरीस राहिला. थोड्याच दिवसांत तो स्वपराक्रमानें पुढें आला व मोठ्या योग्यतेस चढला.

ह्याच सुमारास महंमद कासिम नांवाच्या अरब सरदारानें सिंध प्रांतावर स्वारी केली. त्यानें सिंधचा राजा दाहीर ह्याचा पराजय



करून तो प्रांत आपल्या राज्यास जोडला. यापुढें एक एक प्रांत जिंकून हिंदुस्थानांत आपलें राज्य वाढवावें असा त्याचा बेत होता. आपला देश परके लोक जिंकणार ह्या विचारानें बाप्पा चिडून गेला. त्यानें महंमद कासिमला निकरानें तोंड दिलें आणि इतर सर्व रजपूत राजांना पुढें येणाऱ्या संकटाची सूचना देऊन जागें केलें. मग सर्व रजपूत लोकांनीं बाप्पाच्या हाताखालीं एकवटून अरबांशीं टक्कर देऊन त्यांचा पराभव केला. त्यांनीं सिंध प्रांतसुद्धां परत घेतला. अशा रीतीनें परकीय शत्रूला अटकाव करून बाप्पानें आपल्या देशाचें स्वातंत्र्य

कायम राखलें. ह्या त्याच्या पराक्रमानें त्याचा बहुमान तर झालाच; पण इतिहासांत त्याचें नांव अजरामर झालें. बाप्पाचा पराक्रम पाहून लोकांनीं त्याला चितोडचा राजा केलें. त्याला 'हिंदूका सूरज' असें लोक सन्मानानें म्हणत.

आपणांस मोठेपणा प्राप्त झाला तो सर्व लहानपणीं पूजा केलेल्या त्या शंकराच्या प्रसादामुळें असा बाप्पाचा दृढ विश्वास होता. हल्लीं तो देव भगवान् एकलिंगजी ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. उदेपूरचे राजे तेव्हांपासून आपल्याला भगवान् एकलिंगजीचे प्रतिनिधि अथवा दिवाण असें म्हणवून घेण्यांत भूषण मानतात.

* * *

※

१८

※

# आद्य शंकराचार्य

बौद्ध व जैन धर्मप्रसारामुळें वैदिक धर्म मागें पडूं लागला. वैदिक धर्मांतील यज्ञयाग, जातिभेद वगैरे गोष्टींवर परधर्मीयांनी हल्ला चढविल्यामुळें त्याची लोकप्रियता कमी होऊं लागली. अशा प्रसंगीं ज्यांनीं वैदिक धर्माची बाजू घेऊन वादविवादानें त्या धर्माची थोरवी सिद्ध केली त्या आद्य श्रीशंकराचार्यांची महती काय वर्णावी ?

मलबार प्रांतांत कालदी म्हणून एक गांव आहे. तेथें शिवगुरु नांवाचा एक नंबुद्री ब्राह्मण राहत होता. त्याच्या बायकोचें नांव श्रीअंबिका असें होतें. ती साध्वी आणि सुशील स्त्री होती. पतिपत्नी उभयतांना वैदिक धर्माचा मोठा अभिमान होता. त्यामुळें त्यांच्या घरीं यज्ञ, होमहवन हीं नेहमीं आस्थापूर्वक केलीं जात. बरेच दिवस त्यांना मूल झालें नाहीं म्हणून त्यांनीं श्रीशंकराची आराधना केली. तेव्हां श्रीअंबिकेस एक

मुलगा झाला. श्रीशंकराच्या कृपेनें हा मुलगा झाला म्हणून त्यांनीं त्याचें नांव ' शंकर ' असें ठेवलें.



शंकर अति बुद्धिमान् होता. त्याची स्मरणशक्ति त होती. कोणताही धडा एकदां वाचला कीं तो त्याचा पाठ होई. मुलाचे गुण आणि अलौकिक बुद्धि पाहून आईबापांना फार आनंद वाटत असे. दुर्दैवानें शिवगुरु लवकरच वारला. त्यावेळीं शंकर फक्त चार वर्षांचा होता. बाप वारल्यामुळें त्याच्या पालनपोषणाची सर्व जबाबदारी त्याच्या आईवरच पडली. तिनें त्याची मुंज करून पांचव्या वर्षीं त्याला गुरुगृहीं पाठविलें. शंकरानें एकदोन वर्षांतच सर्व विद्या संपादन केली. मुख्य दशग्रंथांचा अभ्यास एका वर्षांत करून दुसऱ्या वर्षांत राहिलेलीं सहा शास्त्रें तो शिकला. अशा रीतीनें सातव्या वर्षींच तो वेदशास्त्रसंपन्न होऊन गुरुगृहाहून घरीं परत आला.

लहानपणापासूनच परमेश्वर आणि सृष्टि ह्यांविषयीं तो विचार करी. परमेश्वर सर्वत्र भरलेला आहे ही गोष्ट त्याच्या मनावर पूर्ण बिंबली होती. त्यामुळें संन्यास घेऊन आपण तप करावें म्हणजे परमेश्वरदर्शन होईल असें त्याच्या मनानें घेतलें. 'मीं संन्यास घेऊं का?' असें त्यानें आईला विचारलें. तो प्रश्न ऐकूनच तिला अति दुःख झालें. शंकरानें लग्न करून संसार करावा अशी तिची इच्छा होती. आपला एकुलता एक मुलगा संन्यासी होऊन दूर जावा असें तिला कसें वाटणार?

एकदां शिवरात्रीच्या निमित्तानें शंकर नदीवर स्नानास गेला. त्या नदींत पुष्कळ मगर होते. अंघोळ करीत असतां त्याचा पाय एका मगरानें तोंडांत धरला हें पाहून तो ओरडूं लागला. त्याची आई धांवत आली; दुसरे लोकही जमा झाले; सर्वांनीं शंकराला ओढून त्याचा पाय सोडविण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ! शेवटीं शंकर म्हणाला, "आई, मी एवीं तेवीं मरणारच, तर मला संन्यास घेण्याची परवानगी दे." आईनें तें कबूल केलें! तोंच काय चमत्कार, त्या मगरानें शंकराचा पाय सोडला!

शंकर घरीं आल्यावर त्याची आई त्याला म्हणाली, 'तूं संन्यासी झालास कीं तुझं माझं नातं तुटलं; पण माझी इच्छा आहे कीं मी मरतांना तूं मला भेटावंस.' शंकरानें ही गोष्ट कबूल केली. तो म्हणाला, 'तूं केव्हांही माझं स्मरण कर कीं मी कुठेंही असलों तरी तत्क्षणीं तुला भेटेन.' नंतर आपल्या आईच्या निर्वाहाची व्यवस्था करून त्यानें संन्यास घेतला.

त्यानंतर तो गुरु करण्यासाठीं गोविंदनाथस्वामींकडे गेला. हे स्वामी नर्मदा नदीच्या किनाऱ्यावर राहत असत. त्यांच्याकडे जातांच 'तूं कोण?' असा स्वामींनीं शंकराला प्रश्न केला. तो म्हणाला, 'मी शिव आहें.' हें ऐकतांच स्वामींनीं त्याला आश्रमांत राहवून घेतलें व थोड्याच काळांत त्याला अनुग्रह दिला. त्याचें 'भगवत्पूज्यपाद' असें नांव ठेवलें.

शंकराला सिद्धि प्राप्त झाली असें पाहून हिंदुस्थानभर 'उपदेश करून ज्ञानमार्गाचा प्रसार कर, अशी स्वामींनीं त्याला आज्ञा दिली. नंतर त्यानें ठिकठिकाणच्या मोठ्या पंडितांशीं वाद करून 'अजिंक्यपत्र' मिळविलें. त्या वेळीं मंडनमिश्र नांवाचा एक पंडित होता. यज्ञ करावे, देवांसाठीं हवन करावें, मंत्रद्वारां देवांना संतुष्ट करून संसार करावा म्हणजे देव पावतो असें त्याचें म्हणणें होतें. संन्यास घेऊनच परमेश्वर-प्राप्ति होते, त्याला संसाराची जरूरी नाहीं असें शंकराचार्यांचें मत होतें. मंडनमिश्राजवळ वाद करून त्याला जिंकावें असें त्यांनीं ठरविलें. मंडनमिश्र वेदांमध्यें इतका प्रवीण होता कीं त्याच्या घरची मैनासुद्धां वेद मुखोद्गत म्हणत असे! मंडनमिश्राची पत्नी उभयभारती हिला त्यांनीं पंच निवडलें, कारण तीही मोठी पंडिता होती. सात दिवस वादविवाद चालू होता. वाद संपतांच तिनें 'शंकरानें जिंकलें' असा निकाल दिला. पण ती म्हणाली, "मी मंडनमिश्राची अर्धांगी, तेव्हा तुम्ही मला जिंकल्या-शिवाय मंडनमिश्राला पूर्णपणें जिंकलं असं होणार नाहीं! तेव्हां माझ्या-बरोबरच वाद करून मला जिंका." शंकरानें ती गोष्ट कबूल करतांच तिनें त्याला गृहस्थाश्रमाविषयींच प्रश्न विचारले. शंकरानें तर गृहस्था-श्रमाचा स्वीकारच केला नव्हता. त्यानें एक महिना मुदत घेऊन त्यानंतर तिच्या प्रश्नांचीं उत्तरें दिलीं. शेवटीं तिनेंही हरल्याचें कबूल केलें! मंडनमिश्रानें संन्यास घेतला व तो त्याचा शिष्य बनला! ह्या विजयामुळें लोक त्याला शंकराचार्य म्हणूं लागले.

त्यानंतर त्यांनीं अनेक ग्रंथ लिहिले. ते सर्व अर्थातच तत्त्वज्ञानपर आहेत. त्यांनीं आपल्या शिष्यांना ग्रंथ लिहिण्याची आज्ञा केली आणि त्यांच्याकडून अनेक ग्रंथ लिहविले.

इतक्यांत त्यांची आई आजारी पडली. आतां आपला अंतकाळ समीप आला असें समजून तिनें शंकराचार्यांचें स्मरण केलें. क्षणांत शंकराचार्य तेथें हजर झाले. पाहतात तों आपली आई रोगानें जर्जर

होऊन अंथरुणांत डोळे मिटून पडली आहे. तिला हांक मारतांच डोळे उघडून तिनें त्यांच्याकडे पाहिलें. तिचा आनंद गगनांत मावेना. ती अधीरतेनें म्हणाली, 'बाळ, तूं जगाला तारावयास जन्मलास तर आधीं मलाच तार !'

लागलीच शंकराचार्यांनीं तिला ज्ञानोपदेश केला. ती दुःख विसरून आनंदमय झाली आणि तिचा प्राण देह सोडून निघून गेला. तिची अंत्यक्रिया करण्यासाठीं त्यांनीं आपल्या नातेवाईकांना बोलाविलें; पण त्यांपैकीं कोणी आले नाहींत. त्यामुळें त्यांनीं संन्यासी असूनही मातेच्या देहाला अग्निसंस्कार केला ! शंकराचार्यांचा असा अपमान केला म्हणून त्या वेळेपासून कालदीच्या ब्राह्मणांना वेदबाह्य मानतात. त्यानंतर शिष्यांसह ते दिग्विजयार्थ निघाले. त्यांनीं जवळजवळ सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला.

काश्मीर प्रांतांत एक शारदेचें देऊळ होतें. त्याचें द्वार बंद होतें. ज्याला खरें ज्ञान झालें असेल त्यालाच तो दरवाजा उघडेल आणि तोच मनुष्य आंतील उच्चासनावर बसण्यास लायक होय असें लोक म्हणत. अनेक पंडितांनी तो दरवाजा उघडण्याचा यत्न केला. पण व्यर्थ ! शेवटीं शंकराचार्य तेथें गेले. त्यांनीं दाराला हात लावतांच दार उघडलें. आचार्य तेथील दिव्यासनावर विराजमान झाले आणि नंतर सर्व लोकांनीं त्यांची पूजा केली.

त्यानंतर त्यांनीं चार दिशांना चार मठ स्थापन केले. गोवर्धन, द्वारका, ज्योतिर्मठ आणि शृंगेरी हीं चार ठिकाणें पसंत करून तेथें त्यांनीं आपल्या चार शिष्यांना अधिकारी नेमलें.

इतकें झाल्यानंतर त्यांनीं शिष्यांना शेवटचा ज्ञानोपदेश केला आणि ते वयाच्या बत्तिसाव्या वर्षी समाधिस्थ झाले. त्यांचा जन्म इ. स. ७८८ त झाला आणि ते इ. स. ८२० मध्यें परब्रह्मांत विलीन झाले असें लोक मानतात.

* * *

१९

# राजा भोज

सुमारें अकराशें वर्षांपूर्वी माळव्यांत मुंजराज राज्य करीत होता. त्याच्यापूर्वी तेथें सिंहदत्त नांवाचा राजा गादीवर होता. मुंज हा सिंहदत्त राजाचा खरा मुलगा नव्हता तरी त्या राजाला प्रथम मुलगा नसल्यानें त्यानें 'मुंज' राजा खरा वारस असें जाहीर केलें, पुढें त्या राजाला सिंधुल नांवाचा एक मुलगा झाला. तरी पण त्याचें कांहीं चालूं न देतां मुंजराजानें राजपद मिळविलें. पुढेंमागें राज्य मिळविण्यासाठीं सिंधुल कांहीं खटपटी करील अशी मुंजराजाला धास्ती होतीच. त्यामुळें त्याला नाहींसा करण्यांसाठीं मुंजराजानें अनेक युक्त्या योजिल्या. पण तो राजाच्या हातीं न सांपडतां पळून गेला आणि अज्ञातवासांत दिवस घालवूं लागला. पुढें दुर्दैवानें सिंधुलाचा मुलगा भोज मुंजराजाच्या हातांत सांपडला.

मालवपति मुंजराजाच्या दरबारांत एक सुप्रसिद्ध

ज्योतिषी आला असतां आपणामागें गादीवर कोण बसणार असें राजानें त्याला विचारलें. त्याला भोज राजपुत्राची कुंडली पण त्यानें दाखविली. तीवरून हाच पुढें प्रसिद्ध राजा होणार आणि पन्नास वर्षें राज्य करणार; मोठें सुख भोगून आपलें नांव हा अजरामर करणार असें त्यानें भविष्य वर्तविलें. पण तें भविष्य ऐकून मुंजराजा अतिशय रागावला ! भोज पुढें राजा होणार मग स्वतःच्या मुलाचें काय होणार अशी चिंता त्याला वाटूं लागली ! कांहींतरी करून हा कांटा नाहींसा केलाच पाहिजे असें त्यानें ठरविलें. भोजराज लहान आहे तोंच गुप्तपणें त्याला ठार मारवावें असा विचार करून आपला प्रधान वत्सराज ह्याला बोलावून त्याला तें काम गुप्तपणें करण्याची त्यानें आज्ञा केली. वत्सराजानें नाइलाजास्तव ती पाळण्याचें कबूल केलें व मग भोज राजपुत्रास घेऊन तो घोर वनांत गेला. रानांत पोहोंचतांच त्यानें भोज राजकुमाराला मुंजराजानें केलेली आज्ञा निवेदन केली. भोज म्हणाला, 'प्रधानजी, राजाची आज्ञा तुम्ही खुशाल पाळा; मात्र मला मारल्यावर माझा एवढा निरोप राजाला कळवा.'

वत्सराजानें त्याला मारलें नाहीं. कारण तें क्रूर कृत्य त्याच्यानें होणे शक्य नव्हतें. त्यानें त्याला लपवून गुप्त ठिकाणीं ठेवू दिलें आणि मेणाचें एक बनावट डोकें करून तें बकऱ्याच्या रक्तांत भिजवून मुंजराजाला दाखविलें. मुंजराजा पहिल्यानें आनंद वाटला. पण भोज राजकुमाराचा निरोप ऐकून त्याला पश्चात्ताप झाला. तो निरोप एका संस्कृत श्लोकांत होता—

**" मान्धता स महीपतिः कृतयुगालङ्कारभूपो गतः**
**सेतुर्येन महोदधौ विरचितः क्वासौ दशास्यान्तकः**
**अन्ये चापि युधिष्ठिरप्रभृतयो याता दिवं भूपते**
**नैकेनापि समं गता–वसुमती मुन्ज त्वया–यास्यति ? "**

कृतयुगांतला अति प्रसिद्ध राजा मांधाता, रावणाला मारणारा राम याचप्रमाणे धर्म वगैरे अति प्रसिद्ध राजे सर्वच मृत्युमुखीं पडले. पृथ्वी

किंवा राज्य कोणाबरोबर गेलें नाहीं ! मुंजराज, तें राज्य तुमच्याबरोबर येणार असें तुम्हांला वाटतें काय ?

राजाला पश्चात्ताप झाला आहे हें पाहताच प्रधानानें आपण खरोखर राजपुत्राचा वध केला नाहीं असें सांगून राजाची माफी मागून राजकुमाराला पुन्हा राजवाड्यांत आणविलें ! प्रधानाच्या त्या कृत्यानें राजाला आनंद झाला !

त्यानंतर लवकरच मुंजराजानें दक्षिणेकडे स्वारी केली. तैलंग देश जिंकावा अशी त्याची इच्छा होती. पण दुर्दैवानें शत्रूचें सैन्य फार मोठें होतें. लढाईची त्यांची तयारीही उत्कृष्ट होती. ह्यामुळें मुंजराजा शत्रूच्या हातांत सांपडला. तेथें त्याचा वध करण्यांत आला. पुढें सिंधुल गादीवर बसला. त्याच्यामागून इ. स. ८४० मध्यें भोज राजा गादीवर आला.

भोज राजा स्वतः विद्वान् होता आणि विद्वानांचा पुरस्कर्ताही होता. विद्वान् लोकांना बक्षिसें देण्यांत त्यानें कधीं माघार घेतली नाहीं. विद्वान् मग तो कोणत्याही जातीचा असो, तो सन्माननीय असें तो मानीत असे. त्यानें अनेक ग्रंथ लिहविले आहेत. त्याची पत्नी राणी लीलावती ही पण सद्गुणी, सुंदर आणि विद्याप्रेमी होती. भोज राजाचा दरबार म्हणजे विद्वानांचें माहेरघर असें सर्वांना वाटत असे.

एकदां एक विद्वान् राजद्वारीं आला आणि त्यानें आंत निरोप धाडला कीं "तुमचा मावसभाऊ बाहेर आला आहे !" राजानें तत्काळ त्याला आंत बोलाविलें आणि मोठ्या कौतुकानें त्याला विचारलें, "मावशीबाईची प्रकृति ठीक आहे ना ?" तो म्हणाला, "त्या आत्तांच मरण पावल्या !" हें ऐकतांच राजाला वाटलें. ह्याची आई वारल्यामुळें हा कांहींतरी मागण्यासाठीं आपल्याकडे आला आहे. त्याला विन्मुख दवडणें योग्य नाहीं. तेव्हां त्यानें न सांगतांच राजानें त्याला एक हजार मोहरा देण्याचा हुकूम केला. पण तो जमिनीकडेच पाहूं लागला.

त्यामुळें राजानें त्याला दोन हजार मोहरा देण्याची आज्ञा केली. ती ऐकून तो वर पाहू लागला. " हा वेडा तर नाहीं ! " अशी एका



पंडिताला शंका आली. तो त्याला म्हणाला, " अहो, राजदरबारीं तुम्ही असं काय वर्तन चालवलं आहे ! " तो विद्वान् म्हणाला, " ह्यांत चुकलं कुठें ? राजा लक्ष्मीचा पुत्र, मी अलक्ष्मीचा पुत्र. त्या दोघी बहिणी. अर्थात् आम्ही मावसभाऊ नाही काय ? बरं, ह्या राजदरबारांत प्रवेश म्हणजे दारिद्र्य अथवा अलक्ष्मीचं निर्मूलन. अर्थात् महाराजांनीं पुसतांच मीं तसं उत्तर दिलं ! बरं एक हजार मोहरा तर पाताळांतील-बळीराजा देतो म्हणून मीं खालीं पाहिलं ! दोन हजार मोहरा कर्णराज देत असत. ते सध्यां स्वर्गांत आहेत म्हणून मीं वर पाहिलं, ह्यांत माझं काय चुकलं ? " हें ऐकून राजानें त्याला अगणित द्रव्य दिलें !

कोणीहि विद्वान् येवो, त्याला भरपूर द्रव्य हें मिळावयाचें हें पाहून राजाच्या खजिनदाराला भीति वाटूं लागली कीं " खजिना रिकामा झाला तर राज्य कसं चालणार ! " एकदां एक पंडित राजाज्ञा घेऊन गेला असतां खजिनदारानें त्याला कांहीं न देतां उलट राजाला निरोप धाडला कीं ' आपदर्थे धनं रक्षेत ' असें वचन आहे त्याचा विचार करावा ! भोजराजा रागावला आणि त्यानें उलट निरोप धाडला कीं ' श्रीमतः कुत आपदः ' ( श्रीमंताला आपत्ति कशी येणार ? ) ह्यावर

पुन्हा खजिनदारानें निरोप धाडला कीं कदाचित् 'कुपितो दैवः' (दैव उलटलें तर!) भोजराजानें ताबडतोब लिहिलें कीं, 'समूलं च विनश्यति!' दैव उलटलें तर समूळच नाश होतो, मग द्रव्य कसें राहणार? म्हणून राजाज्ञेप्रमाणें धन देऊन टाक! खजिनदारानें अर्थातच पंडिताला देणगी देऊन टाकली. विद्वानांचा सन्मान करण्यांत तो इतका उदार होता कीं विद्वानांच्या पुरस्कर्त्याला भोजराजाची उपमा देण्याचा कायमचा प्रघात पडला आहे!

पहिल्यानें त्याची राजधानी उज्जयिनी शहरीं होती. पण त्यानें धारानगरीची पुन्हा रचना करून तेथें मोठमोठीं मंदिरें व राजप्रासाद बांधविले आणि नंतर तो त्या ठिकाणीं राहूं लागला.

विद्वत्तेप्रमाणें शूरपणाही त्याच्या अंगीं होता. त्याच्या राज्याच्या दक्षिण दिशेला गांगेय तैलप ह्या राजाचें राज्य होतें. ह्यानेंच मुंजराजाचा वध करविला होता. त्यानें भोजराजाचा एका प्रसंगीं आपमान करविला. तेव्हां ह्या अपमानाचा व आपला चुलता मुंज ह्याच्या वधाचाही सूड घेण्याचें ठरवून त्यानें तैलप राजावर स्वारी केली आणि त्याला जिंकून त्या विजयाच्या स्मरणार्थ त्यानें एक जयस्तंभ उभारिला. ह्याच्याविषयीं पुढील आख्यायिका सांगतात. काश्मीरचा राजा अनंतदेव ह्यानें भोजराजाला सोनें नजर केलें. तें काश्मीरांत परत पाठवून कपटेश्वरकुंड नांवाचें तीर्थ भोजानें बांधविलें व नियम केला कीं त्याच तीर्थाच्या पवित्र पाण्यानें रोज तोंड धुवावयाचें. हा त्याचा नेम अखंड चालावा म्हणून अनंतदेवानें त्याला कुप्यांतून पाणी पाठविण्याची व्यवस्था केली होती.

त्याशिवाय गुजराथेंतील कर्ण व भीमदेव ह्या राजांनाही त्यानें जिंकलें होतें. ह्याप्रमाणें आपलें नांव अजरामर करून वृद्ध वयांत हा राजा मृत्यु पावला.

* * *

२०

# राजा कुमारपाळ

राजपुत्र तर नव्हेच पण राजकुलांतही जन्म न होतां आयुष्याचीं पन्नास वर्षे अति अडचणींत घालवून नंतर राज्यपदाची प्राप्ति होणें ही केवढी भाग्याची गोष्ट आहे! अर्थात् अंगांत तसें कर्तत्व पाहिजेच, तरच मनुष्य परिस्थितीशीं झगडूं शकतो. गुजराथचा वैभवशाली राजा कुमारपाळ हा ह्याचें उत्तम उदाहरण आहे.

सुमारें नऊशें वर्षे झालीं. त्या वेळीं गुजराथेंत एक वैभवशाली आणि पराक्रमी राजा राज्य करीत होता. त्याचें नांव महाराजा सिद्धराज जयसिंह असून त्याची राजधानी अणहिलपूर म्हणजे आजचें पाटण ही होती. पाटण शहरांत त्या वेळीं शेंकडों कोट्याधीश होते, ह्यावरून त्या संपत्तीची आणि त्या राज्यांतील सुबत्तेची कल्पना येईल. गुर्जरेश जयसिंहाला सर्व अनुकूल होतें; पण त्यांत एकच व्यंग परमेश्वरानें ठेविलें

होतें तें म्हणजे संतान नसणें हें होय. राजा वैभवांत असूनही आपल्या मागें गादी कोणाला मिळणार ह्या विचारानें तो नेहमीं चिंतामग्न असलेला दिसे.

एका वेळीं एका प्रसिद्ध ज्योतिष्यानें राजाला सांगितलें कीं, तुमच्या मागें ‘ कुमारपाळ ’ राजा होणार. हा कुमारपाळ शुद्ध राजकुलांत जन्मला नव्हता; तर त्याचा पणजोबा एका नर्तकीच्या पोटीं जन्मास आला होता. ह्यामुळें त्याला हीन कुलांतला समजून आपल्या मागें हा हीन-कुलोत्पन्न राजा होणार हें ऐकून जयसिंहाला राग आला आणि कसेंही करून ह्या कुमारपाळाला ठार मारावें असा त्यानें निश्चय केला.

राजाची आपणांवर गैरमर्जी झाली आहे हें समजतांच कुमारपाळानें विचार केला कीं ह्यापुढें पाटण येथें राहणें फार धोक्याचें आहे. त्याचा बाप त्रिभुवनपाल हा शूर वीर म्हणून प्रसिद्ध होता. कुमारपाळानें आपल्या मेहुण्याचा सल्ला घेतला आणि राजाचे गुप्त हेर आपला घात करतील, त्यापेक्षां पाटणबाहेर पळून जावें असें ठरवून तो गुप्तपणें निघून गेला. ही बातमी राजाच्या गुप्त हेरांनीं त्याला सांगतांच राजानें कुमार-पाळाचा पाठलाग करून त्याला पकडून आणण्यासाठीं कांहीं शिपाई पाठविले. त्यांनीं त्याचा खूप पाठलाग केला, पण नाना युक्त्या करून तो लपून राहिला आणि त्या शिपायांना हात हालवीत परत यावें लागलें. इतकें झालें तरी त्याचा पत्ता काढण्याच्या कामावर महाराजा जयसिंहानें आपले गुप्त हेर नेमले होते. ह्यामुळें कित्येक दिवस तो सारखा भटकतच राहिला. कारण कोठेंही जास्त दिवस राहणे धोक्याचें होतें. भटकत असतां त्याचे फार हाल झाले. कित्येक वेळां अन्नाशिवाय त्याला राहावें लागलें.

अशा रीतीनें भटकत देवळी नांवाच्या गांवांत गुप्तपणानें एका कुंभाराकडे तो राहूं लागला. पण त्या ठिकाणीं जयसिंहाचे गुप्त हेर येऊन

पोहोंचतांच त्याची पांचावर धारण बसली. त्या वेळी त्या कुंभारानें त्याला भट्टींत लपवून त्याचा जीव वांचविला.

पुढें तेथून तो भटकत माळव्याकडे गेला. तेथें भिक्षा मागून तो एका ब्राह्मणाकडे राहत असे. पण पुढें तेथूनही त्याला जावें लागले. उज्जयिनीहून तो पुन्हा खंभात येथें आला. तेथील मंत्री उदयन ह्याच्याशीं ओळख करून तो त्याच्या आश्रयानें तेथेंच राहू लागला.

हेमचंद्राचार्य नांवाचे एक अतिप्रसिद्ध जैन साधु त्या वेळी खंभात येथे राहत असत. भाविक भक्त दररोज त्यांचें दर्शन घेऊन त्यांना वंदन करीत. ते महाविद्वान् होते. असें सांगतात कीं ते त्रिकालज्ञ होते. मंत्री उदयन हा त्यांचा मोठा भक्त होता. तो नित्य त्यांच्या दर्शनास जाई. एके दिवशीं त्यांच्या बरोबर कुमारपाळ हाही गेला. त्याला पाहतांच हेमचंद्राचार्यांनीं त्याला 'चक्रवर्ती' अशी हांक मारली. ती हांक ऐकतांच कुमारपाळ दचकला. हे साधु महाराज आपली थट्टा करतात कीं काय, असें त्याला वाटलें. पण ते साधु महाज्ञानी होते. आपण थट्टा करीत नाहीं अशी त्यांनीं दोघांची खात्री केली. मंत्री उदयन ह्याला ही गोष्ट अर्थातच आवडली नाहीं. नंतर बरेच दिवस कुमारपाळ त्या साधूच्या संगतींत राहिला. त्यांनीं त्याला 'राजधर्मा'चा उपदेश करून राजा झाल्यावर प्रजापालन कसें करावें ह्याचें विवेचन केलें. पण कांहीं दिवसांनीं जयसिंहाच्या गुप्त हेरांनीं तेथेंही त्याला घेरलें. त्या ठिकाणीं मंत्री उदयनानें त्याला लपवून त्याचा बचाव केला. नंतर तो खंभात सोडून पळून गेला.

थोड्याच दिवसांत राजा जयसिंह मरण पावला. हें ऐकतांच कुमारपाळ त्वरेनें पाटण येथें आला. जयसिंहानें मरणापूर्वी मंत्री उदयनाचा मुलगा दत्तक घेतला होता; अर्थातच त्याला राज्य मिळावयाचें. पण कुमारपाळ हा शूर होता. आपले नातेवाईक व इष्टमित्र ह्यांची मदत

घेऊन त्यानें लष्करी तयारी केली आणि तो गादीवर बसला. त्या वेळीं त्याचें वय पन्नास वर्षांचें होतें. अशा प्रकारें त्या जैन साधूचें भविष्य खरें होतांच कुमारपाळानें त्याला आपला गुरु केलें. आपल्या कष्टकाळांत ज्यांनीं ज्यांनीं मदत केली होती त्या सर्वांचा त्यानें योग्य परामर्श घेतला. मंत्री उदयन ह्याला त्यानें आपला दिवाण बनविलें. अशा रीतीनें त्याची कारकीर्द सुरू झाली.

पण त्याला अनेक शत्रू होते. जुने प्रधान त्याच्या विरुद्ध होते. राजाचा दत्तक मुलगा तर त्याच्या विरुद्ध होताच, शिवाय ज्यांना त्यानें आपले मदतगार नेमलें होतें तेही त्याला विशेष मानीत नसत. त्याचा मेहुणा तर मनांत असें समजत असे कीं कुमारपाळ केवळ आपल्या मदतीवरच राजा झाला आहे. त्यामुळें तो राजाचा वारंवार अपमान



करी. वेळींच त्याचा बंदोबस्त केला नाहीं तर तो डोईजड होणार असा विचार करून त्यानें आपल्या मेहुण्याला कैदेंत घातलें. इतर मगरूर सरदारांना कडक शिक्षा दिल्या. त्यामुळें घरचे शत्रु नष्ट झाले.

त्यानंतर त्याला चार दोन राजांशीं लढावें लागलें. त्यानें लढाईत मोठा पराक्रम करून त्या राजांचा पराजय केला. त्यानें चितोड काबीज केलें आणि तिकडील सर्व मुलूख आपल्या राज्याला जोडला. त्या वेळीं त्याला कोट्यावधि रुपये मिळाले. त्याने सुमारें दहा वर्षें लढाईचेंच काम केलें. पण त्या मुदतींत आजूबाजूच्या सर्व राजांची त्यानें खात्री केली कीं महाराज कुमारपाळ ह्याच्याशीं वैर करणें व्यर्थ होय. एकदां त्याच्या मंत्रिमंडळानें त्याचा खून करण्याची गुप्त मसलत केली. ती उघडकीस येतांच त्यानें सर्वांना अशी जबरदस्त शिक्षा केली कीं त्याच्या विरुद्ध खटपटी करण्याचें कोणाला धैर्यच होऊं नये. त्याच्या पराक्रमानें भारतवर्षांत त्याला सम्राट्पद प्राप्त झालें आणि त्याच्या राज्याचा विस्तार खूप वाढला. तो शिवभक्त होता आणि प्रथम मद्यमांसाचा उपयोगही तो करीत असे. पण पुढें हेमचंद्राचार्यांचा शिष्य झाल्यावर त्यानें मद्यमांस सर्व सोडून दिलें. ह्यापुढें गुरूपदेश घेऊन त्यानें जैन धर्माचा स्वीकार केला. त्यानंतर जैन धर्मानुसार राज्यांत जीवहत्या होऊं नये असा त्यानें कायदा केला. त्याप्रमाणेंच जैन धर्मांतील उत्तम तत्त्वें पाळलीं जावींत ह्यासाठीं त्यानें पुष्कळ खटपट केली. त्यानें जैन धर्माचा स्वीकार केला होता तरी इतर धर्मीयांना मुळींच त्रास दिला नाहीं कीं कुणाचा अपमान केला नाहीं. सोमनाथ महादेव येथील देवळाचा त्यानें जीर्णोद्धार केला. स्वतः धार्मिक वृत्तीचा असल्यानें जैनांचें पवित्र क्षेत्र जें शत्रुंजय तेथें तो सात वेळां यात्रेकरितां गेला होता.

त्यानें प्रजाहिताचीं अनेक कामें केलीं. राज्यांत ठिकठिकाणीं सदावर्तें घातलीं, दवाखाने उघडले, अनेक मंदिरें बांधविली. जुगार व दारू ह्यांची बंदी केली. विद्वानांचा तो मोठा पुरस्कर्ता होता. त्याच्या आश्रयाखालीं अनेक ग्रंथ तयार झाले. ठिकठिकाणीं त्यानें ग्रंथालयें पण स्थापिलीं.

असा हा भाग्यशाली महाराजा तीस वर्षें राज्य करून ८० वर्षांचा होऊन मरण पावला.

शिसोदिया वंशांतील एका राजकन्येशीं ह्यानें विवाह केला होता. हा राजा झाल्यावर हेमचंद्रांच्या उपदेशानें ह्यानें जैन धर्म स्वीकारला. त्या धर्माची दीक्षा आपणांला घ्यावी लागेल म्हणून ती राणी राजधानीस जाईना. पुढें तिला राजाकडून आश्वासन मिळालें कीं तिच्यावर जैन धर्माची सक्ती करण्यांत येणार नाहीं, म्हणून ती त्याच्या बरोबर गेली. पण पुढें हेमचंद्रानें तिला दीक्षा देण्याचा तगादा लाविला. तेव्हां ती पळून गेली. राजाच्या लोकांनीं तिचा पाठलाग केला. शेवटीं ती त्यांच्या हातीं लागली. आपणांस जैन धर्म स्वीकारावा लागेल ह्या भीतीनें तिनें आत्महत्या केली.

* * *

## २१

# राणी दिद्दा

दहाव्या शतकांत काश्मीरवर हिंदू राजेच राज्य करीत होते. तरी त्या अगोदरच मुसलमानांनीं भारतांत प्रवेश केला होता. त्या वेळीं दिद्दा नांवाची एक कर्तृत्ववान राणी तेथें राज्य करीत होती.

लोहरचा राजा सिंहराज याची ती कन्या आणि उद्‌भांडपूरचा राजा भीम अथवा भीमपाल याची ती नात होती. काश्मीरचा राजा क्षेमगुप्त याच्याशीं तिचा विवाह इ. स. ९५० या वर्षी झाला.

राजतरंगिणीकार कल्हण आपल्या ग्रंथांत लिहितों कीं, या राणीचा तिच्या पतीवर एवढा पगडा बसला होता कीं, राजाला लोक दिद्दाक्षेम या नांवानेंच ओळखीत. क्षेमगुप्ताच्या कारकीर्दींतलीं कांहीं नाणींही उपलब्ध झालीं आहेत. त्यांवरही दि-क्षेम अशी राजमुद्रा कोरलेली दिसते. यावरून या म्हणण्याला पुष्टीच मिळते. कारण दि-क्षेम हें दिद्दाक्षेम याचें संक्षिप्त रूप आहे यांत शंकाच नाहीं.

विवाहानंतर आठ वर्षें तिला सौभाग्य लाभलें. नंतर इ. स. ९५८ सालीं राजा क्षेमगुप्त मरण पावला. यानंतर आपला अल्पवयी मुलगा अभिमन्यु याला गादीवर बसवून राणीनें पालक या नात्यानें राज्यकारभार पाहण्यास सुरुवात केली. या वेळीं फल्गुन हा राजाचा मुख्य मंत्री होता. त्यानें आपलें वजन राजा क्षेमगुप्तावर राहावें म्हणून अनेक युक्त्या योजिल्या होत्या. त्यांपैकीं एक म्हणजे आपली मुलगी राजाला देऊन त्यानें आपलें राजाशीं नातें जोडलें होतें, पण यामुळें राणी दिद्दा हिला मोठें वैषम्य वाटून ती फल्गुनाचा द्वेष करूं लागली. राजा क्षेमगुप्त जिवंत असेतों तिला कांहीं करतां आलें नाहीं. पण राजा अभिमन्यु गादीवर येतांच राणीनें त्याला मंत्रिपदावरून दूर केलें आणि त्याला राज्याबाहेर जाणें भाग पाडलें !

यानंतर तिला राज्यांतील दुसऱ्या शत्रूंचा परामर्श घ्यावा लागला. राज्यांत महिमन आणि पाटल या नांवाचे दोन बलाढ्य सरदार होते. काश्मीरचें राज्य बळकावून आपण राजे व्हावें असा त्यांनीं बेत केला.

त्यांच्या चालल्लेल्या कटाचा राणीला सुगावा लागतांच राणीनें त्यांना भर दरबारांतून हांकून लाविलें. त्यांनीं बंड केलें. राणीनें मोठ्या शहाण-पणानें त्यांच्या सहकाऱ्यांना मोठमोठ्या रकमांचे आमिष दाखवून त्यांच्यांत फूट पाडली आणि त्या बंडखोरांचा पुरा मोड केला! या वेळीं तिनें त्या बंडवाल्यांपैकीं यशोधर नांवाच्या सरदाराला आपल्या बाजूस वळवून त्यालाच आपला सेनापति नेमलें. त्यानें मोठ्या हिरि-रीनें राणीच्या बाजूनें कार्य केलें. आणि बंडाचा बीमोड करून शांतता प्रस्थापित केली. इतक्यांत ठक्कनच्या मांडलिक राजानें काश्मीरची सत्ता झुगारून देण्याचा प्रयत्न केला. त्याचाही त्यानें पराभव केला. अशा रीतीनें दिद्दा राणीची बाजू चांगलीच सावरली.

पण राणी मोठी संशयी स्वभावाची होती. यशोधराचा जिकडे तिकडे बोलबाला होऊं लागला हें तिला सहन झालें नाहीं. तिनें यशो-धराकडून सेनाधिकार काढून घेतांच सैन्यानें बंड केलें आणि तिलाच उलट नजरकैदेंत ठेवलें. पण तिनें नरवाहन नांवाच्या मंत्र्याच्या साहा-य्यानें उठाव करून पुन्हा सर्वाधिकार ताब्यांत घेतले आणि यशोधराचें बंड तिनें मोडून काढलें. याप्रसंगीं 'एकांग' या नांवानें ओळखला जाणारा सैन्य विभाग तिच्या उपयोगी पडला.

कल्हणाच्या इतिहासावरून आपल्याला कळून येतें कीं, इ. स. ९०१-०२ पासून साठ वर्षांत तेथील मंत्र्यांनीं विश्वासघातानें अनेक राजांना पदच्युत करविलें पण दिद्दा राणी त्या साऱ्यांना पुरून उरली. तिनें केवळ चुटकीसारखा बंदोवस्त केला. यशोधराचें बंड मोडून काढल्याबद्दल दिद्दानें नरवाहनाचा मोठा सन्मान करून त्याला 'राजानक' अशी पदवी दिली. आणि आपला प्रमुख सल्लागार म्हणून त्याची नेमणूक केली.

थोडया दिवसांनीं तिला अशी शंका आली कीं, नरवाहनच सर्वाधिकार ताब्यांत घेऊन आपलें राज्य हिरावून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. लागलीच तो तिच्या मर्जीतून उतरला. राणीचा आपणावरील विश्वास उडाला याचें त्याला अत्यंत दुःख झालें. तरी पण राणीविरुद्ध त्यानें कांहीं खटपटी लटपटी केल्या नाहींत. या संकटांतून मुक्त होण्यासाठीं त्यानें आत्महत्या करून सर्व विटंबना टाळली !

यानंतर लवकरच एका खेड्यांतील सरदारांनीं बंड करून तिची सत्ता झुगारून देण्याचा प्रयत्न केला ! यावेळीं तिनें फल्गुन या जुन्या काळच्या अमात्याची मदत मिळविली आणि तीं बंडें मोडून काढलीं.

यानंतर तिचा मुलगा राजा अभिमन्यु मरण पावला. पुत्रमरणाचा तिला फार मोठा धक्का बसला. तिनें आपला नातू नंदिगुप्त याला गादीवर बसविलें आणि प्रधानादिकांच्या साहाय्याने तिनें स्वतःच्या हातीं पालक म्हणून पुन्हा अधिकार घेतला.

या आपत्तीमुळें आपण कांहीं पुण्य-संचयार्थ दानधर्म केला पाहिजे असा विचार करून तिनें अनेक देवळें बांधविलीं. मठही स्थापन करून ते साधुसंतांना राहावयासाठीं दिले. देवळांत पूजाअर्चा नीट चालावी म्हणून त्यांना पैसा दिला. अन्नदानाची व्यवस्था केली. या कामीं तिनें लाखो रुपये खर्च केले !

तिचे तीनही नातू अल्पायुषी झाले आणि इ. स. ९८१ मध्यें ती पुन्हा गादीवर बसली. मंत्रतंत्राच्या साहाय्यानें आणि राजसत्तेच्या लोभानें तिनेंच नातवांचा कांटा काढला असाही प्रवाद आहे. तिच्या चारित्र्याविषयींही लोकमत चांगलें नव्हतें.

तुंग नांवाच्या खालच्या जातीच्या माणसाशीं तिनें विशेष सख्य केलें. तें न आवडून मुख्यमंत्री व इतर सरदार यांनीं तिच्या विरुद्ध मोठी चळवळ सुरू केली. तिच्या भावाचा मुलगा विग्रहराज यानें मोठें

बंड करून राज्यांतील सर्वच लोकांना तिच्या विरुद्ध चिथावणी दिली. त्यानें ब्राह्मणांनीं तिच्या विरुद्ध आमरण उपोषण करावें अशी उठावणी केली. या वेळीं दिद्दाने ब्राह्मणांना मोठी दक्षणा देऊन संतुष्ट केलें आणि हा प्रसंग टाळला.

या वेळीं तुंगाने तिला मोठीच मदत केली. त्यानें मोठें सैन्य जमा केलें आणि तो विग्रह राजावर चालून गेला. विग्रह राजाचा त्यानें पुरा मोड केला आणि त्याची बंडाळी नाहींशीं केली. याच वेळीं राजपुरीचा राजा पृथ्वीपाल यानेंही मुख्य राजसत्तेविरुद्ध उठाव केला. तुंगानें त्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला आणि त्याच्याकडून मोठी खंडणी वसूल केली. याच वेळीं खेडयांतील सरदारांनीं बंडें केलीं. या सरदारांना धामर असें म्हणत असत आणि या राज्यांत धामरांचें विशेष प्राबल्य होतें. त्यांचीं बंडेंही तुंगानें मोडून टाकलीं. तुंगाचें हे कर्तृत्व पाहून राणीनें त्याला आपला प्रमुख सेनाधिकारी नेमलें.

आपला मरणकाल जवळ आला असें पाहून राणीनें लोहरचा संग्रामराज याला आपल्या मागें गादीचा वारस ठरवून तसें जाहीर केलें. संग्रामराज हा तिच्या भावाचा मुलगा होता. ही मोठी धूर्त आणि हुशार राजकारणी स्त्री होती. ती इ. स. १००३ या वर्षी मरण पावली.

काश्मीरच्या राज्यांत या काळांत स्त्रियांना खूप स्वातंत्र्य होतें. कित्येक स्त्रिया तर सैन्य जमा करून त्याचें सेनापतिपद आपणांकडे घेऊन मोठमोठ्या लढायाही करीत. आपल्या शौर्यानें अनेक स्त्री सेनापतींनीं मोठमोठे विजयही मिळविले आणि राजकारणेंही केलीं.

---

BVBK-0401622

9622 3.1.20